# संत लूक ह्याचे शुभवर्तमान

१ ज्याअर्थी पुष्कळ जणांनी आपल्यात
घडलेल्या गोष्टींचा वृत्तान्त लिहून काढण्याचे हाती
घेतले आहे, [२]आणि जे प्रारंभापासून त्याचे प्रत्यक्ष साक्षी
होते आणि वचनाचे सेवक झाले, त्यांनी तशाच त्या
आपल्या हाती दिल्या आहेत, [३]आणि मीही सर्व गोष्टींचा
प्रारंभापासून शोध केला आहे, त्याअर्थी, अहो थिओफिल
महाराज, मीही आपल्यासाठी त्या क्रमवार लिहाव्यात हे
मला बरे वाटले, [४]म्हणजे आपल्याला ज्या गोष्टींत शिक्षण
मिळाले आहे त्यांचा निश्चितपणा आपल्याला कळावा.

[५]यहुदियाचा राजा हेरोद ह्याच्या दिवसांत
अबियाच्या वर्गातला, एक जखर्या नावाचा याजक झाला;
त्याची बायको अहरोनाच्या मुलींतली होती व तिचे नाव
अलिशिबा होते. [६]आणि दोघेही देवापुढे नीतिमान राहून
प्रभूच्या सर्व आज्ञांत व निर्बंधांत निर्दोषपणे चालत असत.
[७]आणि त्यांना मूलबाळ नव्हते, कारण अलिशिबा वांझ
होती, आणि आता दोघांचे वय होऊन गेले होते.

[८]आणि असे झाले की, तो आपल्या वर्गाच्या
क्रमाप्रमाणे देवापुढे याजक म्हणून काम करीत असता,
[९]याजकाच्या कामाच्या परिपाठाप्रमाणे त्याची प्रभूच्या
पवित्र स्थानात जाऊन धूप जाळण्याची पाळी होती,
[१०]आणि लोकांचा सगळा जमाव बाहेर, धुपाच्या वेळी,
प्रार्थना करीत होता.

[११]आणि, त्याला धुपाच्या वेदीच्या उजवीकडे प्रभूचा
दूत तेथे उभा असलेला दिसला. [१२]जखर्याने त्याला
बघितले तेव्हा तो अस्वस्थ झाला आणि त्याच्यावर
थरकाप आला.

[१३]पण देवदूत त्याला म्हणाला,

"जखर्या, भिऊ नको, कारण तुझी प्रार्थना ऐकण्यात
आली आहे; कारण तुझी बायको अलिशिबा ही तुला
मुलगा देईल आणि तू त्याचे नाव योहान ठेव.

[१४]"तुला आनंद आणि हर्ष होईल आणि पुष्कळ
त्याच्या जन्मामुळे आनंद करतील. [१५]कारण, तो प्रभूपुढं
महान होईल. तो द्राक्षारस किंवा मादक पेय पिणार नाही.
आणि त्याच्या आईच्या उदरापासून तो पवित्र आत्म्यानं
भरलेला असेल. [१६]तो इस्राएलाच्या पुत्रांतील पुष्कळ
जणांना त्यांचा देव परमेश्वर ह्याच्याकडे वळवील. [१७]तो
बापांची मनं मुलांकडे आणि अवमान करणाऱ्यांना
नीतिमानांच्या विचारांकडे वळवून प्रभूसाठी तयार केलेली
प्रजा उभी करावी म्हणून तो एलियाच्या आत्म्यानं आणि
सामर्थ्यानं त्याच्यापुढं चालेल."

[१८]तेव्हा जखर्या देवदूताला म्हणाला,

"मला हे कशावरून समजेल? कारण मी वृद्ध आहे,
आणि माझी बायको वयातीत आहे."

[१९]देवदूताने त्याला उत्तर देऊन म्हटले,

"मी देवाच्या समक्षतेत उभा राहणारा गब्रिएल आहे.
आणि मी तुझ्याशी बोलून तुला ह्या गोष्टीची सुवार्ता
सांगावी म्हणून मला पाठवण्यात आलं. [२०]आणि बघ, हे
होईल त्या दिवसांपर्यंत तू मुका होशील; आणि तुला
बोलता येणार नाही. कारण ही माझी वचनं त्यांच्या
काळात पूर्ण होणार आहेत, त्यांवर तू विश्वास ठेवला
नाहीस."

[२१]आणि लोक जखर्याची वाट पहात राहिले, आणि
तो एवढा वेळ पवित्र स्थानात राहिला ह्याचे त्यांनी
आश्चर्य केले. [२२]आणि तो बाहेर आल्यावर त्याला
त्यांच्याशी बोलता येईना, तेव्हा त्यांनी ओळखले की,
त्याला पवित्र स्थानात दर्शन घडले; आणि तो त्यांना
खुणावीत राहून अबोल राहिला. [२३]आणि असे झाले की,
त्याच्या सेवेचे दिवस पूर्ण होताच तो आपल्या घरी गेला.

[२४]आणि त्या दिवसानंतर त्याची पत्नी अलिशिबा
गरोदर राहिली, आणि तिने पाच महिने स्वतःला लपवून
घेतले. आणि ती म्हणत असे, [२५]'लोकांतली माझी निंदा
दूर करायला प्रभूनं जेव्हा खाली पाहिलं त्या दिवसांत त्यानं
हे माझ्यासाठी केलं.'

[२६-२७]आणि देवाकडून गब्रिएल दूताला सहाव्या
महिन्यात, गालिलातील नासरेथ नावाच्या एका गावी,
दाविदाच्या घराण्यातील योसेफ नावाच्या एका मनुष्याला
वाग्दत्त असलेल्या एका कुमारिकेकडे पाठविण्यात आले.
[२८]आणि देवदूत तिच्याकडे आत येऊन म्हणाला,

"जयजय! कृपायुक्ते, प्रभू तुझ्याबरोबर आहे."
[२९]पण त्याच्या बोलण्याने ती अस्वस्थ झाली व ती विचार
करू लागली की, हे अभिवादन काय असेल? [३०]आणि
देवदूत तिला म्हणाला,

"मरिये, भिऊ नको, कारण देवाची कृपा तुझ्यावर
झाली आहे. [३१]आणि बघ, तुझ्या पोटी गर्भ राहील, आणि
तुला पुत्र होईल; आणि तू त्याचे येशू हे नाव ठेव. [३२]तो
महान होईल आणि त्याला परात्पराचा पुत्र म्हणतील.
आणि परमेश्वर देव त्याला त्याचा पूर्वज दावीद ह्याचं
राजासन देईल. [३३]तो याकोबाच्या घराण्यावर युगानुयुग
राज्य करील आणि त्याच्या राज्याचा अंत होणार नाही."

[३४]तेव्हा मरिया देवदूताला म्हणाली,

"हे कसं होईल? कारण माझा पुरुषाशी संबंध नाही."
[३५]तेव्हा देवदूत तिला उत्तर देऊन म्हणाला,

"पवित्र आत्मा तुझ्यावर उतरेल, आणि परात्पराची
शक्ती तुझ्यावर छाया करील. आणि म्हणून ज्याचा जन्म
होईल त्याला पवित्र देवाचा पुत्र म्हणतील. [३६]आणि बघ,
तुझी नातलग जी अलिशिबा तिलाही तिच्या म्हातारपणी
मुलाचा गर्भ राहिला आहे. आणि जिला वांझ म्हटलं जाई
तिला हा सहावा महिना आहे. [३७]कारण देवाचं कोणतंही
वचन अशक्य होईल असं होणार नाही."
[३८]आणि मरिया म्हणाली,

"बघा, मी प्रभूची दासी, मला आपल्या वचनानुसार
होवो."
मग देवदूत तिला सोडून गेला.

[३९]**आणि त्या दिवसांत मरिया** निघाली, आणि
घाईने, यहुदाच्या डोंगराळ प्रदेशात एका नगरात आली,
[४०]आणि जखर्याच्या घरात जाऊन, तिने अलिशिबेला
अभिवादन केले. [४१]आणि असे झाले की, अलिशिबेने
मरियेचे अभिवादन ऐकले तेव्हा बाळाने तिच्या उदरात
उडी मारली; आणि अलिशिबा पवित्र आत्म्याने भरून
[४२]मोठ्या आवाजात ओरडून म्हणाली,

"स्त्रियांत तू धन्य! आणि तुझ्या पोटचं फळ धन्य!
[४३]आणि माझ्या प्रभूच्या आईनं माझ्याकडे यावं हे मला
कुठून? [४४]कारण बघ, माझ्या कानी तुझ्या अभिवादनाचा
आवाज आला, तेव्हा बाळानं माझ्या उदरात हर्षानं उडी
मारली. [४५]जिनं विश्वास ठेवला ती धन्य, कारण तिला
प्रभूकडून जे सांगण्यात आलं त्याची पूर्णता होईल."

[४६]**आणि मरिया म्हणाली,**

"माझा जीव प्रभूला थोर मानतो,
[४७]आणि माझा आत्मा माझ्या तारक देवामुळं
उल्लासला आहे.
[४८]कारण त्यानं आपल्या दासीच्या
दैन्यावस्थेकडे पाहिलं आहे,
कारण पहा, आतापासून सर्व पिढ्या
मला धन्य म्हणतील.
[४९]कारण, जो समर्थ आहे त्यानं माझ्यासाठी
मोठ्या गोष्टी केल्यात.
त्याचं नाव पवित्र आहे.
[५०]आणि त्याला भिणाऱ्यांवर त्याची दया
पिढ्यान्‌पिढ्या असते.
[५१]त्यानं आपल्या बाहूनं आपलं बळ
दाखवलं आहे.
गर्विष्ठांना त्यांच्या मनांतल्या कल्पनेनं
पांगवलं आहे.
[५२]अधिपतींना आसनांवरून
उतरवलं आहे.
आणि दीन अवस्थेत असलेल्यांना
वर उचललं आहे.
[५३]त्यानं भुकेल्यांना उत्तम पदार्थांनी
तृप्त केलं आहे.
आणि सधन असलेल्यांना
रिकामं पाठवून दिलं आहे.
[५४-५५]त्यानं आपल्या पूर्वजांना म्हटल्याप्रमाणं
अब्राहामावरील आणि त्याच्या संतानावरील
सर्वकाळची दया स्मरून
आपला सेवक इस्राएल ह्याला
साहाय्य केलं आहे."

[५६]मग मरिया सुमारे तीन महिने तिच्याजवळ राहिली
आणि आपल्या घरी परत आली.

[५७]**अलिशिबेचा प्रसूत व्हायचा काळ** पूर्ण होऊन
तिला मुलगा झाला, [५८]आणि प्रभूने कशा प्रकारे तिच्यावर
मोठी दया केली हे तिच्या शेजाऱ्यांनी व नातलगांनी ऐकले
तेव्हा ते तिच्याबरोबर आनंद करू लागले.

[५९]आणि असे झाले की, मुलाची सुनत करण्याकरता
ते आठव्या दिवशी आले, आणि त्याच्या बापाच्या

नावावरून ते त्याला जखर्या हे नाव ठेवणार होते. [६०]तेव्हा त्याच्या आईने उत्तर देऊन म्हटले,

"तसं नाही, पण त्याचं नाव योहान ठेवायचं."

[६१]आणि ते तिला म्हणाले,

"हे नाव असलेला तुझ्या नातलगांत कोणी नाही."

[६२]आणि त्यांनी त्याच्या बापाला खुणावले की, त्याची त्याचे काय नाव ठेवायची इच्छा होती. [६३]तेव्हा त्याने पाटी मागितली आणि लिहून सांगितले, 'त्याचं नाव योहान आहे'. आणि त्या सर्वांनी आश्‍चर्य केले. [६४]आणि लगेच, त्याचे तोंड उघडले, त्याची जीभ मोकळी झाली, आणि तो बोलू लागला, आणि देवाचा धन्यवाद गाऊ लागला.

[६५]तेव्हा त्यांच्या सभोवती राहणाऱ्या सर्वांवर धाक आला, आणि सर्व यहुदियाच्या डोंगराळ प्रदेशात ह्या गोष्टी बोलण्यात येऊ लागल्या. [६६]आणि ऐकणारे सर्व जण त्या मनांत ठेवून म्हणत, 'हा मुलगा काय होणार आहे?', कारण प्रभूचा हात त्याच्याबरोबर होता.

[६७]आणि त्याचा बाप जखर्या पवित्र आत्म्याने भरला आणि संदेश देत म्हणाला,

[६८]"इस्राएलाचा देव परमेश्‍वर धन्यवादित असो.
कारण त्यानं आपल्या लोकांची भेट घेऊन
सुटका केली आहे;
[६९]त्यानं आपला सेवक दावीद ह्याच्या घराण्यात
आमच्यासाठी एक तारणाचं शिंग उभारलं आहे.
[७०]हे त्यानं युगादीपासून आपल्या
पवित्र संदेष्ट्याच्या मुखाद्वारे सांगितलं होतं;
[७१]ते ह्यासाठी की, आमची आमच्या
वैऱ्यांपासून आणि आमचा द्वेष करणाऱ्या
सर्वांच्या हातून सुटका व्हावी.
[७२-७३]म्हणजे त्यानं आमच्या पूर्वजांवर
दया करून
आणि आपला पवित्र करार
म्हणजे आमचा पिता अब्राहाम ह्याला
शपथ घेऊन दिलेलं वचन स्मरून
[७४]त्यानं आम्हाला असं द्यावं की,
आमची आमच्या वैऱ्यांच्या हातून
सुटका होऊन
[७५]आम्ही आमच्या सर्व दिवसांत
पावित्र्यानं आणि नीतिमत्वानं त्याच्यासमोर
त्याची सेवा करावी.
[७६]आणि बाळ, तुला परात्पराचा संदेष्टा
म्हणतील.
कारण तू प्रभूसमोर त्याचे मार्ग
तयार करावेस म्हणून त्याच्यापुढं चालशील;
[७७]आणि तू त्याच्या लोकांना त्यांच्या
पापांच्या क्षमेच्या द्वारे तारणाचं ज्ञान देशील.
[७८]कारण आमच्या देवाच्या दयेच्या
कळवळ्यामुळं वरून उदयप्रकाश
आमच्यावर येईल.
[७९]ह्यासाठी की, त्यानं जे अंधारात
आणि मृत्यूच्या छायेत बसलेत
त्यांना प्रकाश द्यावा,
आणि आमचे पाय शांतीच्या मार्गाकडे न्यावेत."

[८०]आणि मुलगा वाढला, आत्म्याने बलवान झाला व इस्राएलात प्रकट व्हायच्या दिवसापर्यंत रानात राहिला.

२ आणि त्या दिवसांत असे झाले की, सर्व जगाची नावनिशी लिहिली जावी अशी कैसर औगुस्त ह्याची आज्ञा झाली. [२]क्विरीनियस सूरियाचा सुभेदार असताना ही पहिली नावनिशी झाली. [३]आणि प्रत्येक जण स्वतःच्या गावी, असे सर्व जण आपली नावनिशी लिहून द्यायला गेले.

[४-५]आणि योसेफदेखील गालिलातून, नासरेथ गावाहून, आपली वाग्दत्त पत्नी मरिया ही गरोदर असताना, आपली नावनिशी लिहून द्यायला, तिच्याबरोबर यहुदियात, बेथलेहेम नावाच्या दाविदाच्या नगरास वर गेला; कारण तो दाविदाच्या घराण्यातला आणि कुळातला होता.

[६]आणि असे झाले की, ते तेथे असताना तिचे प्रसूत व्हायचे दिवस पूर्ण होऊन, [७]तिने आपल्या प्रथम पुत्राला जन्म दिला; आणि त्याला बाळंत्यांत गुंडाळून गव्हाणीत ठेवले, कारण त्यांना उतारशाळेत जागा नव्हती.

[८]आणि त्याच प्रांतात मेंढपाळ रानात रहात होते व आपल्या कळपांवर रात्रीचा पहारा करीत होते. [९]आणि परमेश्‍वराचा दूत त्यांच्याजवळ उभा राहिला, आणि परमेश्‍वराचे तेज त्यांच्या सभोवती प्रकाशले व ते फार भयभीत झाले. [१०]तेव्हा देवदूत त्यांना म्हणाला,

"भिऊ नका, कारण बघा, सर्व लोकांना जो मोठा आनंद होईल त्याची मी तुम्हाला सुवार्ता सांगतो; [११]कारण आज, दाविदाच्या नगरात, तुमच्यासाठी तारणारा जन्मला आहे; तो ख्रिस्त प्रभू आहे. [१२]आणि तुम्हाला खूण ही की, बाळंत्यांत गुंडाळून गव्हाणीत ठेवलेलं बाळ तुम्हाला आढळेल."

[१३]आणि अकस्मात्, त्या देवदूताजवळ, एक स्वर्गीय सैन्याचा समुदाय आला, आणि त्यांनी देवाचे स्तवन करीत म्हटले,

[१४]"ऊर्ध्वलोकी देवाला गौरव,
आणि पृथ्वीवर शांती,
मनुष्यांवर कृपा."

[१५]आणि असे झाले की, देवदूत त्यांच्याजवळून आकाशात निघून गेल्यावर ते मेंढपाळ एकमेकांना म्हणाले,

"आपण आताच बेथलेहेमला जाऊ, आणि ही जी गोष्ट घडली आहे, आणि प्रभूनं आपल्याला कळवली आहे ती आपण बघू या."

[१६]तेव्हा ते घाईने आले, आणि त्यांना मरिया व योसेफ आणि गव्हाणीत ठेवलेले बाळ आढळले. [१७]आणि त्यांनी त्यांना बघितले तेव्हा त्यांना ह्या मुलाविषयी जी गोष्ट सांगण्यात आली होती ती त्यांनी तेथे सांगितली; [१८]आणि मेंढपाळांनी सांगितलेल्या गोष्टींवरून त्या ऐकणाऱ्या सर्वांनी आश्चर्य केले. [१९]पण मरियेने त्या सर्व गोष्टी आपल्या मनात साठवून त्यांवर मनन केले. [२०]आणि मेंढपाळ त्यांना सांगितल्याप्रमाणे, त्या सर्व गोष्टी ऐकून व बघून, देवाचे गौरव व स्तवन करीत परत गेले.

[२१]**आणि त्याची सुनत** करण्याकरता आठ दिवस पूर्ण झाल्यावर त्याचे नाव येशू ठेवण्यात आले; तो पोटी संभवण्याआधी देवदूताने त्याचे ते नाव ठेवले होते.

[२२]**आणि, मोशेच्या** नियमशास्त्रानुसार ते आपल्या शुद्धिकरणाचे दिवस पूर्ण झाल्याबरोबर त्याला यरुशलेमला घेऊन आले, ह्यासाठी की, त्याला परमेश्वराला समर्पण करावे; [२३](कारण परमेश्वराच्या नियमशास्त्रात असे लिहिले आहे की, गर्भाशय उघडणारा प्रत्येक नरवत्स परमेश्वरासाठी पवित्र म्हटला जावा;) [२४]आणि, परमेश्वराच्या नियमशास्त्रात म्हटल्याप्रमाणे 'होल्यांची एक जोडी किंवा पारव्यांची दोन पिले' ह्यांचे बलिदान अर्पण करावे.

[२५]तेव्हा बघा, यरुशलेमात शिमोन नावाचा एक मनुष्य होता; आणि तो नीतिमान व भक्तिमान मनुष्य इस्राएलाच्या सांत्वनाची प्रतीक्षा करीत होता; आणि पवित्र आत्मा त्याच्यावर होता. [२६]आणि तो प्रभूच्या अभिषिक्ताला बघण्याअगोदर मरण बघणार नाही, अशी त्याला पवित्र आत्म्याकडून सूचना मिळाली होती. [२७]तो आत्म्याने प्रेरित होऊन मंदिरात आला; आणि, जेव्हा आईबाप बाळ येशूला नियमशास्त्राच्या रीतीप्रमाणे त्याच्यासाठी करण्याकरता, आत घेऊन आले, [२८]तेव्हा त्याने त्याला आपल्या हातांवर घेतले आणि देवाचा धन्यवाद गाऊन म्हटले,

[२९]"स्वामी, तू आपल्या वचनानुसार आता,
आपल्या दासाला शांतीनं जाऊ देत आहेस.
[३०-३१]कारण जे तुझं तारण,
तू सर्व राष्ट्रांसमोर सिद्ध केलं आहेस,
ते माझ्या डोळ्यांनी बघितलं आहे.
[३२]ते इतर राष्ट्रांना प्रकटीकरणासाठी प्रकाश,
आणि तुझ्या राष्ट्राचं, इस्राएलाचं गौरव आहे."

[३३]आणि त्याच्याविषयी बोलण्यात आलेल्या गोष्टींवरून त्याच्या बापाने व त्याच्या आईने आश्चर्य केले. [३४]आणि शिमोनाने त्याला आशीर्वाद दिला व त्याची आई मरिया हिला तो म्हणाला,

"बघ, ह्याला इस्राएलातल्या पुष्कळ जणांच्या पडण्यासाठी आणि पुन्हा उठण्यासाठी, आणि ज्याच्या विरुद्ध बोलतील असं चिन्ह म्हणून, नेमलं आहे. [३५]आणि शिवाय, एक तरवार तुझ्या जिवातून पार जाईल, म्हणजे पुष्कळ मनांचे विचार प्रगट होतील."

[३६]आणि तेथे हन्ना ही एक संदेष्ट्री होती. ती आशेर वंशातील फनुएलाची कन्या होती. ती फार वयातीत होती व आपल्या कौमार्यकाळापासून ती आपल्या पतीबरोबर सात वर्षे राहिली होती. [३७]ती आता, चौऱ्याऐंशी वर्षांची विधवा होती आणि मंदिर सोडून जात नसे. पण ती उपास व प्रार्थना करून सेवा करी. [३८]ती त्याच घटकेस पुढे आली; तिने देवाचे उपकार मानले व जे यरुशलेमच्या मुक्तीची प्रतीक्षा करीत होते अशा सर्वांबरोबर ती त्याच्याविषयी बोलली.

[३९]आणि परमेश्वराच्या नियमशास्त्रानुसार त्यांनी सर्व
पूर्ण केल्यावर, ते गालिलात आपल्या नासरेथ गावी परत
आले.
[४०]आणि मुलगा वाढला, बलवान झाला व
ज्ञानीपणाने भरला; आणि देवाची कृपा त्याच्यावर होती.

[४१]**आणि त्याचे आईबाप** प्रत्येक वर्षी वल्हांडण
सणाला यरुशलेमला जात असत. [४२]आणि त्या सणाच्या
परिपाठाप्रमाणे तो बारा वर्षांचा झाला तेव्हा ते वर गेले.
[४३]आणि, त्यांनी ते दिवस पूर्ण केल्यावर ते परत निघाले,
तेव्हा, तो मुलगा येशू यरुशलेमला मागे राहिला हे त्याच्या
आईबापांना कळले नाही. [४४]पण तो वाटसरू मंडळीत
असेल असे समजून ते एक दिवसाची वाट चालले, आणि
त्यांनी आपल्या आप्तांत व ओळखीच्यांत त्याचा शोध
केला; [४५]आणि तो त्यांना सापडला नाही, तेव्हा त्याचा
शोध करीत ते यरुशलेमकडे निघाले.
[४६]आणि असे झाले की, तीन दिवसांनी, त्यांना तो
मंदिरात, गुरुजनांच्या मध्यभागी, त्यांचे ऐकत व त्यांना
प्रश्न विचारीत बसलेला आढळला. [४७]आणि जे त्याचे
ऐकत होते ते सर्व त्याच्या बुद्धीमुळे व उत्तरांमुळे चकित
होत होते.
[४८]आणि त्यांनी त्याला बघितले तेव्हा ते
आश्चर्यचकित झाले, आणि त्याची आई त्याला म्हणाली,
"बाळ, तू आमच्याशी असा का वागलास? बघ,
तुझे पिता आणि मी दुःखित होऊन तुला शोधीत होतो."
[४९]आणि तो त्यांना म्हणाला,
"तुम्ही मला शोधीत होता हे कसं? मी माझ्या
पित्याच्या घरात असलो पाहिजे हे तुम्ही ओळखलं नाही
काय?"
[५०]पण तो जे त्यांना बोलला ते बोलणे त्यांना समजले
नाही.

[५१]**मग तो त्यांच्याबरोबर** खाली गेला, आणि
नासरेथला राहिला; आणि त्यांना आज्ञांकित राहिला. पण
त्याच्या आईने ह्या सर्व गोष्टी आपल्या मनात बाळगल्या.
[५२]आणि येशू ज्ञानीपणात व शारीरिक वाढीत आणि
देवाच्या व मनुष्यांच्या कृपेत वाढत गेला.

३ **आता कैसर तिबिर्यस** ह्याच्या राज्याच्या
पंधराव्या वर्षी पंतय पिलात हा यहुदियाचा सुभेदार
होता, हेरोद गालिलाचा मांडलिक होता; त्याचा भाऊ
फिलिप हा इत्तुरियाचा व त्राखोनिती प्रांताचा मांडलिक
होता, आणि लुसुनियस हा अबिलेनेचा मांडलिक होता,
[२]आणि हन्ना व कयफा हे श्रेष्ठ याजक होते. तेव्हा
जखर्याचा पुत्र योहान ह्याला अरण्यात देवाचे वचन प्राप्त
झाले; [३]आणि यार्देनेच्या आसपासच्या सर्व प्रांतात तो
पापांच्या क्षमेसाठी पश्चात्तापाच्या बाप्तिस्म्याची घोषणा
करीत प्रगट झाला. [४]यशया संदेष्ट्याच्या वचनांच्या
पुस्तकात लिहिल्याप्रमाणे,

'तो रानात ओरडणाऱ्याचा आवाज:
प्रभूचा मार्ग तयार करा,
त्याच्या वाटा नीट करा;
[५]प्रत्येक दरी भरली जाईल,
प्रत्येक डोंगर आणि टेकडी पाडण्यात येईल,
वाकडे नीट होतील,
आणि खडबडीत मार्ग सपाट होतील,
[६]आणि सर्व देही देवाचे तारण पाहतील.'

[७]म्हणून जे लोकांचे घोळके त्याच्याकडून बाप्तिस्मा
घ्यायला येत त्यांना तो म्हणत असे,
"अहो तुम्ही सर्पिणींच्या पिलांनो, येणाऱ्या
क्रोधापासून पळायला कोणी तुम्हाला सावध केलं? [८]तर
पश्चात्तापाला शोभतील अशी फळं द्या, आणि अब्राहाम
आमचा पिता आहे असं आपल्या मनात म्हणायला लागू
नका. कारण मी तुम्हाला सांगतो की, देव ह्या दगडांमधून
अब्राहामाची मुलं उठवायला समर्थ आहे. [९]आणि,
आताच, झाडांच्या मुळांशी कुऱ्हाड ठेवलेली आहे;
म्हणून जे चांगलं फळ देत नाही ते प्रत्येक झाड तोडून
अग्नीत टाकलं जाईल."
[१०]तेव्हा लोक त्याला विचारीत आणि म्हणत,
"तर मग आम्ही काय करावं?"
[११]आणि तो त्यांना उत्तर देऊन म्हणे,
"ज्याच्याजवळ दोन झगे आहेत त्यानं ज्याच्याजवळ
एकही नाही त्याला द्यावा; आणि ज्याच्याजवळ अन्न आहे
त्यानंही तसंच करावं."
[१२]आणि जकातदारही बाप्तिस्मा घ्यायला येत, आणि
ते त्याला म्हणत,
"गुरू, आम्ही काय करावं?"
[१३]आणि तो त्यांना म्हणे,

"तुम्हाला ठरवण्यात आलं असेल त्यापेक्षा अधिक
घेऊ नका."

[१४]आणि शिपाईही त्याला प्रश्न करून म्हणत,

"आणि आम्ही काय करावं?"

आणि तो त्यांना म्हणे,

"कोणावर जुलुम करू नका, किंवा खोटा आरोप
करू नका, पण तुमच्या पगारात संतुष्ट रहा."

[१५]आणि लोक वाट पहात असता, आणि सर्व लोक
आपल्या मनात, योहानाविषयी, 'हाच ख्रिस्त असेल
काय?', असा विचार करीत असता, योहान सर्वांना उत्तर
देऊन म्हणे,

"मी तर तुमचा बाप्तिस्मा पाण्यानं करतो, पण जो
येणार आहे तो माझ्यापेक्षा समर्थ आहे; [१६]मी त्याच्या
वहाणा काढायला लायक नाही. तो तुमचा बाप्तिस्मा पवित्र
आत्म्यानं आणि अग्नीनं करील. [१७]आपलं खळं नीट
स्वच्छ करायला आणि गहू आपल्या कोठारात
साठवायला त्याच्या हातात त्याचं सूप आहे; पण भूस तो
न विझणाऱ्या अग्नीत जाळील."

[१८]तो दुसऱ्या पुष्कळ बोधाच्या गोष्टींद्वारे लोकांना
अशा प्रकारे सुवार्ता सांगत असे.

[१९]पण त्याने हेरोद मांडलिकाला त्याच्या भावाची
बायको हेरोदिया हिच्याविषयी व हेरोदाने केल्या होत्या
त्या सर्व वाईट गोष्टींविषयी दोष लावला असल्यामुळे,
[२०]त्याने सर्वांत ही आणखी भर घातली की, त्याने
योहानाला तुरुंगात कोंडले.

[२१]आता, असे झाले की, सर्व लोकांचा बाप्तिस्मा
झाल्यावर येशूचाही बाप्तिस्मा झाला आणि, तो प्रार्थना
करीत असता आकाश उघडले, [२२]आणि पवित्र आत्मा
कबुतरासारखा, शारीरिक रूपात, त्याच्यावर उतरला,
आणि आकाशातून वाणी झाली,

'तू माझा प्रिय पुत्र आहेस.'

[२३]आणि येशूने सेवेला आरंभ केला, तेव्हा तो
सुमारे तीस वर्षांचा होता. तो योसेफाचा पुत्र होता असे
समजत. तो एलीचा, [२४]तो मत्थाताचा, तो लेवीचा, तो
मलखीचा, तो यन्नायाचा, तो योसेफाचा, [२५]तो
मत्तथ्याचा, तो आमोसाचा, तो नहूमाचा, तो हेस्लीचा, तो
नग्गयाचा, [२६]तो महथाचा, तो मत्तथ्याचा, तो शमेनाचा,
तो योसेखाचा, तो योदाचा, [२७]तो योहानानाचा, तो
रेशाचा, तो जरुब्बाबेलाचा, तो शल्तीएलाचा, तो नेरीचा,
[२८]तो मलखीचा, तो अद्दीचा, तो कोसामाचा, तो
एल्मदामाचा, तो एराचा, [२९]तो येशूचा, तो एलिएझराचा,
तो योरिमाचा, तो मत्थाताचा, तो लेवीचा, [३०]तो
शिमोनाचा, तो यहुदाचा, तो योसेफाचा, तो योनामाचा, तो
एल्याकिमाचा, [३१]तो मलआचा, तो मन्नाचा, तो
मत्ताथाचा, तो नाथानाचा, तो दाविदाचा,

[३२]तो इशायाचा, तो ओबेदाचा, तो बवाजाचा, तो
सलमोनाचा, तो नहशोनाचा, [३३]तो अम्मिनादाबाचा, तो
अद्मिनाचा, तो अर्णयाचा, तो हेस्रोनाचा, तो पेरेसाचा, तो
यहुदाचा, [३४]तो याकोबाचा, तो इसहाकाचा, तो
अब्राहामाचा, तो तेरहाचा, तो नाहोराचा, [३५]तो सरूगाचा,
तो रऊचा, तो पेलेगाचा, तो एबराचा, तो शेलहाचा, [३६]तो
केनानाचा, तो अर्पक्षदाचा, तो शेमाचा, तो नोहाचा, तो
लामेखाचा, [३७]तो मथूशलहाचा, तो हनोखाचा, तो
यारेदाचा, तो महललेलाचा, तो केनानाचा, [३८]तो
अनोशाचा, तो शेथाचा, तो आदामाचा होता, तो देवाचा
होता.

४ आणि, पवित्र आत्म्याने भरलेला येशू
यार्देनेकडून परतला व आत्म्याने त्याला रानात नेले;
[२]आणि चाळीस दिवस सैतानाकडून त्याची परीक्षा झाली.
त्या दिवसांत त्याने काही खाल्ले नाही, आणि ते पूर्ण
झाल्यावर त्याला त्यानंतर भूक लागली.

[३]आणि सैतान त्याला म्हणाला,

"तू जर देवाचा पुत्र आहेस, तर ह्या दगडाची भाकर
व्हावी म्हणून ह्याला आज्ञा कर."

[४]आणि येशूने त्याला उत्तर दिले,

" 'मनुष्य केवळ भाकरीने वाचणार नाही', असं
लिहिलं आहे."

[५]आणि त्याने त्याला वर नेले व त्याला काळाच्या
एका निमिषात जगातली सर्व राष्ट्रे दाखवली. [६]आणि
सैतान त्याला म्हणाला,

"मी तुला ही सर्व सत्ता आणि ह्यांचं वैभव देईन,
कारण ती माझ्या हाती दिलेली आहे, आणि मला वाटेल
त्याला मी ती देतो. [७]तू जर माझ्यापुढं नमन करशील तर
मी तुला हे सर्व देईन."

[८]आणि येशूने त्याला उत्तर देऊन म्हटले,

" 'तू आपला देव परमेश्वर ह्याला नमन कर आणि
केवळ त्याचीच उपासना कर', असं लिहिलं आहे."
[९]तेव्हा त्याने त्याला यरुशलेमला नेले व मंदिराच्या
एका वरच्या टोकावर उभे केले, आणि त्याला म्हटले,
"तू जर देवाचा पुत्र आहेस तर इथून खाली उडी टाक;
[१०]कारण असं लिहिलं आहे की, 'तो तुझे रक्षण करायला
तुझ्याविषयी आपल्या दिव्य दूतांना आज्ञा देईल, [११]आणि
तू आपला पाय दगडावर आदळू नयेस म्हणून ते तुला
आपल्या हातांवर घेतील.' "
[१२]आणि येशूने त्याला उत्तर देऊन म्हटले,
" 'तू आपला देव परमेश्वर ह्याची परीक्षा करू
नकोस', असं म्हटलं आहे."
[१३]आणि सैतानाने सर्व परीक्षा पूर्ण केल्यावर तो
त्याला काही काळ सोडून गेला.

[१४]**आणि येशू आत्म्याच्या सामर्थ्याने** गालिलास
आला व आसपासच्या सर्व प्रांतात त्याची कीर्ती पसरली.
[१५]त्याने त्यांच्या सभास्थानांत शिकविले आणि सर्वांकडून
त्याचे गौरव झाले.

[१६]**आणि जेथे त्याचे पालनपोषण** झाले त्या
नासरेथला तो आला; आणि तो आपल्या परिपाठाप्रमाणे
शब्बाथ दिवशी सभास्थानात जाऊन वाचायला उभा
राहिला. [१७]आणि तेथे त्याला यशया संदेष्ट्याचे पुस्तक
देण्यात आले, आणि त्याने ते पुस्तक उघडून जे स्थळ
काढले तेथे असे लिहिले होते,

[१८]'प्रभूचा आत्मा माझ्यावर आहे.
कारण मी दीनांना सुवार्ता सांगावी
ह्याकरता त्याने मला अभिषेक केला आहे.
आणि ह्याकरता पाठविले आहे की,
मी अटकेतल्यांना सुटका
आणि अंधळ्यांना दृष्टी विदित करावी;
जे ठेचले जात आहेत त्यांना सोडवावे;
[१९]प्रभूचे अनुकूल वर्ष गाजवावे.'

[२०]मग त्याने ते पुस्तक मिटले आणि कामदाराला
परत दिले, आणि तो खाली बसला. आणि जे सर्व जण
सभास्थानात होते त्यांचे डोळे त्याच्याकडे लागले.
[२१]आणि तो त्यांच्याशी बोलू लागला की, 'आज तुमच्या
श्रवणात हा शास्त्रलेख पूर्ण झाला आहे'. [२२]आणि सर्वांनी
त्याला ग्वाही दिली, आणि त्याच्या मुखावाटे जी कृपेची
वचने निघाली त्यांवरून त्यांनी आश्चर्य केले; आणि ते
म्हणाले,
"हा योसेफाचा मुलगा नाही काय?"
[२३]आणि तो त्यांना म्हणाला,
"तुम्ही निश्चित ही म्हण मला लावाल, 'वैद्या,
स्वतःला बरं कर; जे कपर्णहूमला झालं म्हणून ऐकलं, ते
इथं स्वतःच्या देशात कर.' "
[२४]आणि तो म्हणाला,
"मी तुम्हाला सत्य सांगतो, कोणीही संदेष्टा त्याच्या
स्वतःच्या देशात कधी मान्य होत नाही. [२५]पण मी
तुम्हाला खरं सांगतो, एलियाच्या दिवसांत साडेतीन वर्षं
आकाश बंद होतं. आणि सर्व देशभर मोठा दुष्काळ
उद्भवला, तेव्हा इस्राएलात पुष्कळ विधवा होत्या; [२६]तरी
एलियाला त्यांच्यातल्या एकीकडेही नाही पण
सिदोनातल्या सारफथला, एका विधवा बाईकडे धाडलं
होतं. [२७]तसेच अलीशा संदेष्ट्याच्या काळात इस्राएलात
पुष्कळ कुष्ठरोगी होते; तरी सूरियातल्या नामानाशिवाय
त्यांच्यातला एकही शुद्ध झाला नाही."
[२८]तेव्हा ह्या गोष्टी ऐकून सभास्थानात सर्व जण रागाने
भरून [२९]उठले, त्यांनी त्याला नगरातून बाहेर काढले,
आणि त्यांचे नगर ज्या डोंगरावर बांधले होते त्याच्या
कड्याकडे, ते त्याला कड्यावरून लोटायला घेऊन गेले.
[३०]पण त्यांच्यामधून चालू लागून तो आपल्या मार्गाने
गेला.

[३१]**आणि तो खाली**, गालिलातील कपर्णहूम गावी
होता, आणि शब्बाथ दिवशी तो त्यांना शिकवीत होता;
[३२]आणि ते त्याच्या शिक्षणाने थक्क झाले, कारण त्याचे
बोलणे अधिकारयुक्त होते. [३३]आणि ज्याच्यात एका
अशुद्ध भुताचा आत्मा होता असा एक मनुष्य
सभास्थानात होता आणि तो मोठ्या आवाजात ओरडला,
[३४]"अरे नासरेथकर येशू, तुला आमच्याशी काय
करायचं आहे? तू आम्हाला नष्ट करायला आलास काय?
तू कोण आहेस हे मी जाणतो; देवाचा पवित्र तू आहेस."
[३५]पण येशूने त्याला दटावून म्हटले,
"तोंड बंद कर आणि ह्याच्यामधून बाहेर नीघ."
तेव्हा भुताने त्याला मध्यभागी खाली पाडल्यावर ते
त्याला उपद्रव न करता त्याच्यामधून बाहेर निघाले.
[३६]तेव्हा सर्व जण आश्चर्य पावले व एकमेकांशी
बोलून म्हणाले,

"काय हे बोलणं आहे? कारण हा अधिकारानं आणि
सामर्थ्यानं अशुद्ध आत्म्यांना आज्ञा करतो आणि ते
निघतात."
[३७]आणि आसपासच्या प्रांतात प्रत्येक ठिकाणी त्याची
कीर्ती पसरली.

[३८]**मग तो सभास्थानातून** निघून शिमोनाच्या घरी
आला, आणि शिमोनाच्या सासूला कडक तापाने पछाडले
होते व त्यांनी त्याला तिच्याकरता विनंती केली. [३९]आणि
त्याने तिच्यावर ओणवून तापाला दटावले; तेव्हा
तिच्यामधून ताप निघाला; आणि, तिने लगेच उठून त्यांची
सेवा केली.
[४०]मग सूर्य मावळत आला, तेव्हा ज्या सर्वांकडे जे
जे कोणी नाना रोगांनी आजारी होते त्यांना त्यांनी
त्याच्याकडे आणले, आणि त्याने त्यांच्यातील प्रत्येकावर
हात ठेवले व त्यांना बरे केले. [४१]आणि भुतेदेखील पुष्कळ
जणांतून बाहेर निघत, आणि ओरडून म्हणत, 'तू देवाचा
पुत्र आहेस'. पण त्यांना दटावून त्याने त्यांना बोलू दिले
नाही, कारण तो ख्रिस्त आहे हे त्यांना माहीत होते.

[४२]**आणि दिवस उगवताच** तो निघाला व रानातल्या
एका जागी गेला; आणि लोक त्याचा शोध करीत
त्याच्याकडे गेले, आणि त्याने आपल्याकडून जाऊ नये
म्हणून त्यांनी त्याला आडवले असते. [४३]पण तो त्यांना
म्हणाला,
"मला इतर नगरांतपण देवाच्या राज्याची सुवार्ता
सांगितली पाहिजे; कारण त्यासाठीच मला पाठवलं आहे."
[४४]मग तो यहुदियातील सभास्थानांत घोषणा करीत गेला.

५ **आणि असे झाले की,** लोक त्याच्याजवळ
गर्दी करून देवाची वचनं ऐकत असता तो
गनेसरेतच्या सरोवराजवळ उभा होता. [२]आणि त्याने
सरोवराजवळ दोन मचवे उभे असलेले बघितले; पण
कोळी त्यांवरून बाहेर आले होते व आपली जाळी धूत
होते. [३]तो त्यांतील एका मचव्यात चढला; तो शिमोनाचा
होता आणि तो त्याने किनाऱ्याजवळून थोडा मागे लोटावा
म्हणून त्याने त्याला विनंती केली. मग तो खाली बसला व
त्याने मचव्यावरून लोकांना शिकवले.
[४]आणि त्याने बोलणे समाप्त केल्यावर तो शिमोनाला
म्हणाला,
"खोल पाण्यात मागं घेऊन जा, आणि मासे धरायला
तुमची जाळी सोडा."
[५]शिमोनाने त्याला उत्तर देऊन म्हटले,
"स्वामी, आम्ही रात्रभर दमलो, आणि काही धरलं
नाही, पण आपल्या शब्दावरून मी जाळं सोडतो."
[६]आणि त्याने ते केले, तेव्हा माशांचा एक मोठा घोळका
त्यांनी एकत्र धरला आणि जाळे फाटले. [७]तेव्हा त्याचे जे
वाटेकरी दुसऱ्या मचव्यांत होते त्यांनी येऊन आपल्याला
मदत करावी म्हणून त्यांनी त्यांना खुणावले. आणि ते
आले व त्यांनी दोन्ही मचवे भरले; त्यामुळे ते बुडू लागले.
[८]शिमोन पेत्राने हे बघितल्यावर तो येशूच्या गुडघ्यांशी
पालथा पडला, आणि म्हणाला,
"माझ्याजवळून निघून जा; कारण मी पापी मनुष्य
आहे, प्रभू!"
[९-१०]कारण तो आणि त्याच्याबरोबर असलेले सर्व जण व
शिमोनाचे भागीदार, जब्दीचे पुत्र याकोब आणि योहान हे
त्यांनी धरलेल्या माशांच्या घोळक्यामुळे आश्चर्यचकित
झाले होते. तेव्हा येशू शिमोनाला म्हणाला,
"भिऊ नको, ह्यापुढं तू माणसं धरशील."
[११]आणि त्यांनी आपले मचवे किनाऱ्यावर आणले. तेव्हा
त्यांनी सर्व सोडले आणि ते त्याच्यामागे गेले.

[१२]**आणि असे झाले की,** तो एका नगरात असता,
बघा, कुष्ठाने भरलेला एक मनुष्य; आणि त्याने येशूला
बघितले तेव्हा तो आपल्या तोंडावर पालथा पडला व
त्याने त्याला विनंती करून म्हटले,
"प्रभू, आपली इच्छा असेल तर आपण मला शुद्ध
करू शकाल."
[१३]तेव्हा त्याने आपला हात पुढे करून त्याला धरले,
आणि म्हटले,
"माझी इच्छा आहे, शुद्ध हो."
आणि लगेच त्याच्यावरून कुष्ठ निघाले. [१४]आणि त्याने
त्याला निक्षून सांगितले की,
"हे कोणाला सांगायचं नाही, पण जा, आणि स्वतःला
याजकाला दाखव, आणि त्यांना साक्ष म्हणून, तुझ्या
शुद्धिकरणासाठी मोशेनं नेमल्याप्रमाणं अर्पण ने."
[१५]पण त्याची कीर्ती तितकी अधिक पसरली; आणि,
लोकांचे मोठाले घोळके ऐकायला व आपले व्याधी बरे

करून घ्यायला एकत्र येऊ लागले. [१६]पण तो रानात
एकीकडे जाऊन प्रार्थना करी.

[१७]**आणि असे झाले की,** तो एक दिवशी शिकवीत
असता, गालिलातल्या व यहुदियातल्या प्रत्येक गावाहून
व नगराहून तेथे आलेले परोशी व नियमशास्त्राचे शिक्षक
तेथे बसले होते, आणि रोग बरे करायला त्याच्यात प्रभूचे
सामर्थ्य होते. [१८]आणि बघा, काही लोक, एका
खाटल्यावर एका पक्षघात झालेल्या मनुष्याला घेऊन गेले.
आणि ते त्याच्यापुढे त्याला ठेवायला आत नेऊ पहात
होते. [१९]पण त्यांना त्याला आत न्यायला गर्दीमुळे कुठे
वाट सापडेना; तेव्हा ते छपरावर चढले, आणि त्यांनी
कौलांमधून त्याला त्याच्या अंथरुणासकट खाली,
मध्यभागी, येशूसमोर सोडले. [२०]आणि त्याने त्यांचा
विश्वास बघून म्हटले,

"गड्या, तुला तुझ्या पापांची क्षमा केली गेली आहे."
[२१]तेव्हा ते शास्त्री व परोशी विचार करू लागले व म्हणाले,

"हा दुर्भाषण बोलणारा कोण आहे? कोण एका
देवाशिवाय पापांची क्षमा करू शकतो?"
[२२]पण येशूने त्यांचे विचार जाणून त्यांना उत्तर देऊन
म्हटले,

"तुम्ही काय आपल्या मनात विचार करता? [२३]'तुला
तुझ्या पापांची क्षमा केली आहे' असं म्हणणं, किंवा 'ऊठ
आणि चाल' असं म्हणणं अधिक सोपं आहे? [२४]पण
मनुष्याच्या पुत्राला, पृथ्वीवर पापांची क्षमा करायचा
अधिकार आहे हे तुम्हाला समजावं म्हणून,"
(तो त्या पक्षघाती मनुष्याला म्हणाला,)

"मी तुला सांगतो, ऊठ, तुझं अंथरूण उचल आणि
तुझ्या घरी जा."
[२५]आणि लगेच तो त्यांच्यापुढे उठला, तो ज्यावर पडला
होता ते त्याने उचलले, आणि देवाचे गौरव करीत तो
आपल्या घरी निघून गेला. [२६]तेव्हा ते सर्व जण आश्चर्याने
भारावले व त्यांनी देवाचे गौरव केले; आणि ते भयभीत
होऊन म्हणाले, 'आज आम्ही विलक्षण गोष्टी बघितल्या'.

[२७]**आणि ह्या गोष्टीनंतर** तो बाहेर निघाला, आणि
त्याला लेवी नावाचा एक जकातदार जकातनाक्यावर
बसलेला दिसला. आणि तो त्याला म्हणाला,

"माझ्यामागं ये."
[२८]तेव्हा त्याने सर्व सोडले; आणि तो उठला व
त्याच्यामागे गेला.

[२९]आणि लेवीने त्याच्यासाठी आपल्या घरी मोठी
जेवणावळ केली. आणि जकातदारांचा व इतरांचा एक
मोठा जमाव त्यांच्या पंगतीला बसला होता. [३०]तेव्हा
परोश्यांनी व त्यांच्या शास्त्र्यांनी त्याच्या शिष्यांविरुद्ध
कुरकुर केली आणि ते त्यांना म्हणाले,

"तुम्ही जकातदारांच्या आणि पाप्यांच्या पंगतीला का
खाता पिता?"

[३१]आणि येशूने त्यांना उत्तर देऊन म्हटले,

"निरोग्यांना वैद्याची गरज नाही, पण रोग्यांना आहे.
[३२]मी नीतिमानांना बोलवायला आलो नाही, पण पाप्यांना
पश्चात्तापासाठी बोलवायला आलो."

[३३]**आणि ते त्याला म्हणाले,**

"योहानाचे शिष्य वारंवार उपास करतात आणि
प्रार्थना करतात; तसेच परोश्यांचे शिष्य करतात, पण
आपले खातात आणि पितात?"
[३४]आणि येशू त्यांना म्हणाला,

"वऱ्हाड्यांबरोबर वर असताना तुम्ही त्यांना उपास
करायला लावू शकाल काय? [३५]पण ते दिवस येतील;
आणि वर त्यांच्यामधून काढला जाईल; आणि तेव्हा, त्या
दिवसांत, ते उपास करतील."

[३६]आणि त्याने त्यांना एक दाखलाही सांगितला,

"कोणी नव्या कपड्यातून ठिगळ फाडून जुन्या
कपड्यावर लावीत नाही; नाहीतर, तो नवं फाडील आणि
नव्यातलं ठिगळ जुन्याशी जुळणार नाही.

[३७]"आणि कोणी नवा द्राक्षारस जुन्या बुधल्यांत भरीत
नाही; नाहीतर, तो नवा द्राक्षारस बुधले फोडील आणि
बाहेर पडेल, आणि बुधल्यांचा नाश होईल. [३८]पण नवा
द्राक्षारस नव्या बुधल्यांत भरला पाहिजे.

[३९]"आणि कोणी जुना प्याल्यावर नवा इच्छीत नाही.
कारण तो म्हणतो, 'जुना चांगला आहे'."

**६** **आणि एका शब्बाथ दिवशी** असे झाले की,
तो शेतांमधून जात होता, तेव्हा त्याचे शिष्य कणसे
तोडून, आपल्या हातांवर चोळून खाऊ लागले. [२]तेव्हा
परोश्यांतले कित्येक म्हणाले,

"शब्बाथ दिवशी जे करणं योग्य नाही ते तुम्ही का करता?"
³आणि येशूने त्यांना उत्तर देऊन म्हटले,

"जेव्हा दाविदाला, आणि त्याच्याबरोबर जे होते त्यांना भूक लागली होती तेव्हा त्यानं काय केलं हेही तुम्ही कधी वाचलेलं नाही काय? ⁴तो देवाच्या मंडपात कसा गेला, आणि ज्या समर्पित भाकरी केवळ याजकांशिवाय कोणी खाणं योग्य नाही त्या त्यानं कशा घेतल्या आणि खाल्ल्या, आणि जे त्याच्याबरोबर होते त्यांनाही कशा दिल्या?"
⁵आणि तो त्यांना म्हणाला,

"मनुष्याचा पुत्र शब्बाथाचा धनी आहे."

⁶**आणि दुसऱ्या एका शब्बाथ दिवशी** असे झाले की, तो सभास्थानात जाऊन शिकवू लागला. तेव्हा तेथे एक मनुष्य होता, आणि त्याचा उजवा हात वाळलेला होता. ⁷आणि तो त्याला शब्बाथ दिवशी बरा करतो काय, म्हणजे त्याच्यावर आरोप कसा करता येईल हे आपल्याला सापडेल म्हणून शास्त्री व परोशी त्याच्या पाळतीवर राहिले. ⁸पण त्याने त्यांचे विचार ओळखले व तो त्या हात वाळलेल्या मनुष्याला म्हणाला,

"ऊठ, आणि मध्यभागी उभा रहा."
तेव्हा तो उठला आणि उभा राहिला. ⁹आणि येशू त्यांना म्हणाला,

"मी तुम्हाला प्रश्न करतो, शब्बाथ दिवशी चांगलं करणं योग्य आहे किंवा वाईट करणं? जीव वाचवणं किंवा नष्ट करणं?"
¹⁰मग त्याने त्या सर्वांकडे सभोवार पाहिले आणि तो त्याला म्हणाला,

"तुझा हात पुढं कर."
आणि त्याने केला, आणि त्याचा हात नीट झाला. ¹¹तेव्हा ते वेडाने भरले व आपण येशूला काय करावे असे ते एकमेकांत बोलू लागले.

¹²**आणि त्या दिवसांत** असे झाले की, तो बाहेर डोंगरावर प्रार्थना करायला गेला व देवाच्या प्रार्थनेत त्याने सर्व रात्र घालवली. ¹³आणि दिवस उगवल्यावर त्याने आपल्या शिष्यांना आपल्याकडे बोलावले, आणि त्याने त्यांच्यातून बारा जणांना निवडले व त्यांना प्रेषित हे नाव दिले; ¹⁴शिमोन (त्याने त्याला पेत्र हेही नाव दिले), आणि त्याचा भाऊ अंद्रिया, याकोब आणि योहान, फिलिप आणि बर्थलमय, ¹⁵मत्तय आणि थोमा, अल्फीचा याकोब व ज्याला गिलोत असे म्हणत तो शिमोन, ¹⁶आणि याकोबाचा यहुदा व यहुदा इस्कार्योत; तोच विश्वासघातकी झाला.

¹⁷**आणि तो त्यांच्याबरोबर** खाली आला व एका सपाट जागी उभा राहिला; आणि त्याच्या शिष्यांचा एक मोठा जमाव, आणि सर्व यहुदियामधून व यरुशलेममधून आणि सोन व सिदोन ह्यांच्या समुद्रकाठच्या पट्टीमधून तेथे आलेल्या लोकांचा एक मोठा समुदाय उभा होता. ते त्याचे ऐकायला व आपले रोग बरे करून घ्यायला आले होते. ¹⁸आणि अशुद्ध आत्म्यांनी पछाडलेले होते ते बरे झाले. ¹⁹तेव्हा सगळे लोक त्याला शिवायचा प्रयत्न करीत होते, कारण त्याच्यामधून गुण बाहेर जाऊन त्यांना बरे करीत होता.

²⁰**आणि, त्याने आपल्या शिष्यांकडे** डोळे वर करून म्हटले,

"तुम्ही जे दीन ते तुम्ही धन्य, कारण देवाचं राज्य तुमचं आहे.

²¹"तुम्ही जे आता भुकेले आहा ते तुम्ही धन्य, कारण तुम्ही तृप्त व्हाल.

"तुम्ही जे आता रडत आहा ते तुम्ही धन्य, कारण तुम्ही हसाल.

²²"मनुष्याच्या पुत्राकरता लोक तुमचा द्वेष करतील, तुम्हाला आपल्यातून वेगळे करतील, तुमची निंदा करतील, आणि तुमचं नाव ते वाईट म्हणून टाकतील तेव्हा तुम्ही धन्य. ²³त्या दिवशी तुम्ही आनंद करा आणि उड्या मारा; कारण बघा, स्वर्गात तुमचं प्रतिफळ मोठं आहे. कारण त्यांच्या पूर्वजांनी संदेष्ट्यांना तसंच केलं.

²⁴"पण तुम्ही जे धनवान आहा त्या तुम्हाला हळहळ! कारण तुम्ही आपलं सांत्वन भरून पावला आहा.

²⁵"तुम्ही जे आता तृप्त झाला आहा त्या तुम्हाला हळहळ! कारण तुम्ही भुकेले व्हाल!

"तुम्ही जे आता हसत आहा त्या तुम्हाला हळहळ! कारण तुम्ही शोक कराल आणि रडाल.

२६"सगळे लोक तुमच्याविषयी चांगलं बोलतील तेव्हा तुम्हाला हळहळ! कारण त्यांच्या पूर्वजांनी खोट्या संदेष्ट्यांना तसंच केलं.

२७"पण तुम्ही जे ऐकत आहा त्या तुम्हाला हे मी सांगतो की, तुम्ही आपल्या वैऱ्यांवर प्रीती करा. जे तुमचा द्वेष करतात त्यांचं बरं करा, २८जे तुम्हाला शाप देतात त्यांना आशीर्वाद द्या. आणि जे तुम्हाला वाईट वागवतात त्यांच्यासाठी प्रार्थना करा.

२९"आणि, जो तुला तुझ्या गालावर मारतो त्याच्याकडे तू दुसराही पुढं कर; आणि जो तुझा अंगरखा घेतो त्याला बंडीही घ्यायला मना करू नको. ३०तुझ्याजवळ मागणाऱ्या प्रत्येक जणाला दे; आणि जो तुझ्या वस्तू घेतो त्याच्याकडून त्या मागू नको. ३१आणि लोकांनी तुमच्याशी जशी वागणूक करावी अशी तुमची इच्छा असते तशीच तुम्हीही त्यांच्याशी वागणूक करा.

३२"कारण जे तुमच्यावर प्रीती करतात त्यांच्यावर तुम्ही प्रीती केलीत तर तुमचा उपकार काय? कारण पापीही त्यांच्यावर प्रीती करणाऱ्यांवर प्रीती करतात. ३३आणि जे तुमचं बरं करतात त्यांचं तुम्ही बरं केलंत तर तुमचा उपकार काय? कारण पापीही तसंच करतात. ३४आणि, तुम्ही ज्यांच्याकडून मिळण्याची आशा करता त्यांना तुम्ही उसनं दिलंत तर तुमचा उपकार काय? पापीही आपल्याला तेवढं परत मिळेल म्हणून पाप्यांना उसनं देतात. ३५पण तुम्ही आपल्या वैऱ्यांवर प्रीती करा आणि त्यांचं बरं करा, आणि काही परत मिळण्याची आशा न करता उसनं द्या; तुम्हाला मोठं प्रतिफळ मिळेल, आणि तुम्ही परात्पराचे पुत्र व्हाल; कारण तो कृतघ्नांशी आणि दुष्टांशी दयाळू आहे. ३६म्हणून तुमचा पिताही उपकारी आहे तसेच तुम्ही उपकारी व्हा.

३७"न्याय करू नका आणि तुमचा न्याय केला जाणार नाही; दोषी ठरवू नका आणि तुम्हाला दोषी ठरवलं जाणार नाही; क्षमा करा आणि तुम्हाला क्षमा केली जाईल. ३८द्या आणि तुम्हाला दिलं जाईल; दाबून, हलवून, शीग भरून तुमच्या पदरात घालतील. कारण तुम्ही ज्या मापानं मोजून द्याल त्यानंच तुम्हाला परत मोजून दिलं जाईल."

३९आणि त्याने त्यांना एक दाखला सांगितला,

"अंधळा अंधळ्याला नेऊ शकेल काय? ते दोघेही खाड्यात पडणार नाहीत काय? ४०शिष्य आपल्या गुरूहून मोठा नाही, पण पूर्ण झालेला प्रत्येक शिष्य आपल्या गुरूसारखा होईल.

४१"तुझ्या भावाच्या डोळ्यात कुसळ आहे ते तू का पाहतोस, पण तुझ्या स्वतःच्या डोळ्यात मुसळ आहे तिकडे तू लक्ष देत नाहीस? ४२किंवा तू जेव्हा तुझ्या स्वतःच्या डोळ्यातलं मुसळ पहात नाहीस तेव्हा तू आपल्या भावाला कसं म्हणू शकशील की, 'भाऊ, मला तुझ्या डोळ्यातलं कुसळ काढू दे'? अरे ढोंग्या, त्याआधी आपल्या स्वतःच्या डोळ्यातलं मुसळ काढ; आणि मग तुला आपल्या भावाच्या डोळ्यातलं कुसळ काढायला नीट दिसेल.

४३"कारण, कोणतंच चांगलं झाड कुजकं फळ देईल असं नसतं; किंवा, उलट, कोणतंच कुजकं झाड चांगलं फळ देईल असं नसतं. ४४प्रत्येक झाड त्याच्या फळावरून समजतं. कारण कोणी काटेऱ्यांवरून अंजीर, किंवा करवंदीवरून द्राक्षं गोळा करीत नाहीत. ४५चांगला मनुष्य स्वतःच्या मनाच्या चांगल्या भांडारातून चांगलं काढतो. पण वाईट वाइटातून वाईट काढतो, कारण मनात भरलेल्या गोष्टींमधून त्याचं तोंड बोलतं.

४६"आणि तुम्ही मला 'प्रभू, प्रभू,' का म्हणता? आणि मी सांगतो त्या गोष्टी करीत नाही? ४७जो कोणी माझ्याकडे येतो आणि माझी वचनं ऐकतो, आणि त्याप्रमाणं करतो तो कोणासारखा आहे हे मी तुम्हाला दाखवतो; ४८तो एका, घर बांधणाऱ्या मनुष्यासारखा आहे; त्यानं खोल खणून खडकावर पाया घातला. आणि जेव्हा पूर आला तेव्हा लोंढा त्या घरावर आदळला, आणि त्याला हलवू शकला नाही; कारण ते चांगलं बांधलेलं होतं. ४९पण जो ऐकतो आणि करीत नाही तो पायाशिवाय मातीवर घर बांधणाऱ्या मनुष्यासारखा आहे. त्यावर लोंढा आदळला आणि, लगेच, ते पडलं आणि त्या घराचा नाश मोठा झाला."

७ मग त्याने आपली सर्व वचने लोकांच्या श्रवणात समाप्त केल्यावर तो कपर्णहूमला आला. २तेव्हा एका शतपतीचा एक आवडता दास आजारी होता, आणि मरायला टेकला होता. ३आणि त्याने जेव्हा येशूविषयी ऐकले तेव्हा त्याने येऊन आपल्या दासाला बरे करावे अशी त्याला विनंती करायला त्याने यहुद्यांच्या वडिलांना त्याच्याकडे पाठवले. ४तेव्हा ते येशूकडे आले व त्यांनी त्याला आग्रहाने विनंती करून म्हटले,

"आपण हे त्यांच्यासाठी करावं असे ते योग्य आहेत.
[५]कारण ते आपल्या राष्ट्रावर प्रीती करतात, आणि त्यांनी
आमच्यासाठी आमचं सभास्थान बांधलं."
[६]तेव्हा येशू त्यांच्याबरोबर गेला; आणि आता घरापासून
दूर नव्हता, इतक्यात शतपतीने आपल्या मित्रांना
त्याच्याकडे धाडून म्हटले,

"प्रभू, स्वतःला त्रास घडवू नका कारण मी असा
लायक नाही की, आपण माझ्या छपराखाली यावं.
[७]म्हणून मी आपल्याकडे यायला स्वतःला लायक मानलं
नाही; पण आपण शब्द बोला आणि माझा नोकर बरा
होईल. [८]कारण मी पण अधिकाराखालचा मनुष्य आहे,
आणि माझ्या हाताखाली शिपाई आहेत. आणि मी एकाला
म्हणतो, 'जा', आणि तो जातो, आणि दुसऱ्याला, 'ये',
आणि तो येतो आणि माझ्या दासाला म्हणतो, 'हे कर',
आणि तो करतो."
[९]आणि ह्या गोष्टी ऐकून येशूने आश्चर्य केले; तो मागे
वळला, आणि त्याच्या मागोमाग जे आले होते त्यांना तो
म्हणाला,

"मी तुम्हाला सांगतो, मला एवढा मोठा विश्वास
इस्राएलातही आढळला नाही."
[१०]आणि ज्यांना धाडले होते ते जेव्हा घरी परतले तेव्हा
त्यांना तो दास बरा झालेला आढळला.

[११]आणि दुसऱ्या दिवशी असे झाले की, तो नाईन
नावाच्या नगरात गेला; तेव्हा त्याचे शिष्य व पुष्कळ लोक
त्याच्याबरोबर आले. [१२]आणि तो नगराच्या वेशीजवळ
आला तेव्हा, बघा, ते एका मेलेल्या मनुष्याला बाहेर नेत
होते. तो आपल्या आईचा एकुलता एक मुलगा होता,
आणि ती विधवा होती व नगरातील पुष्कळ लोक
तिच्याबरोबर होते. [१३]आणि प्रभूने तिला बघितले तेव्हा
त्याला तिचा कळवळा आला आणि तो तिला म्हणाला,

"रडू नको."
[१४]आणि, तो जवळ गेला व त्याने तिरडीला हात लावला
तेव्हा ती घेऊन जाणारे उभे राहिले. आणि तो म्हणाला,

"मुला, मी तुला सांगतो, ऊठ."
[१५]तेव्हा मेलेला उठून बसला आणि बोलू लागला व त्याने
त्याला त्याच्या आईच्या स्वाधीन केले. [१६]तेव्हा सर्वांनी
भय घेतले व ते देवाचे गौरव करीत म्हणाले, 'आपल्यात
एक मोठा संदेष्टा उद्भवला आहे', आणि 'देवानं आपल्या
लोकांची भेट घेतली आहे'. [१७]आणि त्याच्याविषयीची ही
गोष्ट सर्व यहुदियात व आसपासच्या सर्व प्रांतांत पसरली.

[१८]तेव्हा योहानाच्या शिष्यांनी त्याला ह्या सर्व
गोष्टी सांगितल्या. [१९]आणि योहानाने आपल्या
शिष्यांतल्या दोघांना आपल्याकडे बोलावले आणि त्यांना
असे म्हणून प्रभूकडे धाडले की, 'आपण जो येणार आहे
तो आहात की, आम्ही दुसऱ्याची वाट पहावी?' [२०]आणि
ते लोक आले तेव्हा ते त्याला म्हणाले,

"बाप्तिस्मा करणाऱ्या योहानानं आम्हाला असं म्हणून
आपल्याकडे पाठवलं की, 'आपण जो येणार आहे तो
आहात की, आम्ही दुसऱ्याची वाट पहावी?' "
[२१]आणि त्याच घटकेस त्याने पुष्कळ जणांना
आजारांपासून, बाधांपासून व दुष्ट आत्म्यांपासून बरे केले
आणि पुष्कळ अंधळ्यांना दृष्टी दिली. [२२]आणि येशूने
त्यांना उत्तर देऊन म्हटले,

"जा, आणि तुम्ही ज्या गोष्टी बघितल्यात आणि
ऐकल्यात त्या योहानाला सांगा; अंधळे पाहतात, पांगळे
चालतात, कुष्ठरोगी शुद्ध होतात आणि बहिरे ऐकतात,
मेलेले उठवले जातात, दीनांना सुवार्ता सांगण्यात येते.
[२३]आणि ज्या कोणाला माझ्यात अडथळा होणार नाही तो
धन्य."
[२४]आणि योहानाचे निरोप्ये गेल्यावर तो लोकांना
योहानाविषयी सांगू लागला,

"तुम्ही काय बघायला बाहेर रानात गेलात? वाऱ्यानं
हालणारा बोरू काय? [२५]तर काय बघायला बाहेर गेलात?
तलम पेहराव घालणाऱ्या मनुष्याला काय? बघा, जे उंची
पेहराव घालतात आणि चैनीत राहतात ते राजवाड्यात
असतात. [२६]तर काय बघायला बाहेर गेलात? संदेष्ट्याला
काय? मी तुम्हाला सांगतो, हो, आणि संदेष्ट्याहून जो
श्रेष्ठ त्याला; [२७]ज्याच्याविषयी हे लिहिलं आहे तोच हा
आहे,

'पहा, मी माझ्या निरोप्याला तुझ्यापुढे पाठवीन;
आणि तो तुझ्यापुढे तुझा मार्ग तयार करील.'

[२८]मी तुम्हाला सांगतो, स्त्रियांपासून जन्मलेल्यांत
योहानापेक्षा कोणी मोठा झाला नाही; पण देवाच्या राज्यात
जो सर्वांत लहान आहे तो त्याच्यापेक्षा मोठा आहे.

([२९]आणि योहानाच्या बाप्तिस्म्याने ज्यांनी बाप्तिस्मा
घेतला होता अशा सर्व लोकांनी व जकातदारांनी हे ऐकून
देवाला न्यायी ठरवले. [३०]पण परोश्यांनी व शास्त्र्यांनी

त्याच्याकडून बाप्तिस्मा न घेऊन आपल्याविषयीचा देवाचा मनोरथ निष्फळ केला.)

[३१]"म्हणून मी ह्या पिढीच्या लोकांना कोणाची उपमा
देऊ? आणि ते कोणासारखे आहेत? [३२]ते बाजारात
बसणाऱ्या मुलांसारखे आहेत. ते एकमेकांना हाक मारून म्हणतात, 'आम्ही तुमच्यासाठी सनई वाजवली आणि तुम्ही नाचला नाही; आम्ही तुमच्यासाठी आक्रोश केला
आणि तुम्ही रडला नाही.' [३३]बाप्तिस्मा करणारा योहान हा
भाकर खात किंवा द्राक्षारस पीत आला नाही, आणि तुम्ही
म्हणता, 'त्याच्यात भूत आहे.' [३४]मनुष्याचा पुत्र खात पीत
आला आहे, आणि तुम्ही म्हणता, 'बघा, हा एक खादाड आणि दारूबाज! जकातदारांचा आणि पाप्यांचा मित्र!'
[३५]पण सुज्ञता तिच्या सर्व पुत्रांकडून न्यायी ठरते."

[३६]**आणि परोश्यांपैकी** एका मनुष्याने त्याला आपल्याकडे भोजन करायची विनंती केली. आणि तो त्या
परोश्याच्या घरी गेला आणि भोजनास बसला. [३७]तेव्हा
बघा, त्या नगरात एक पापी स्त्री होती, आणि, तो त्या परोश्याच्या घरी भोजनास बसला होता हे तिला माहीत झाले तेव्हा ती एक, सुवासिक तेलाची अलाबास्त्र कुपी
घेऊन आली; [३८]आणि त्याच्या पायांशी मागे रडत उभी
राहिली व ती आपल्या आसवांनी त्याचे पाय धुऊ लागली. मग ते आपल्या डोक्याच्या केसांनी पुसून तिने त्याच्या पायांचे मुके घेतले व त्यांना सुगंधी तेल लावले.
[३९]आणि ज्या परोश्याने त्याला आमंत्रण केले होते त्याने
जेव्हा हे बघितले तेव्हा तो आपल्या मनात म्हणाला, 'हा मनुष्य जर संदेष्टा असता तर ह्याला समजलं असतं की, जी बाई आपल्याला शिवत आहे ती कोण आणि कसल्या
प्रकारची आहे; कारण ती पापी आहे.' [४०]आणि येशूने
त्याला उत्तर देऊन म्हटले,

"शिमोना, मला तुझ्याशी काही बोलायचं आहे."

तेव्हा तो म्हणाला,

"गुरू, बोला."

[४१]"एक सावकार होता आणि त्याचे दोन कर्जदार
होते. एकाला पाचशे दिनार देणं होतं आणि दुसऱ्याला
पन्नास. [४२]आणि ते फेडायला त्यांच्याजवळ काही नव्हतं.
तेव्हा त्यानं ते त्या दोघांनाही सोडलं. तर त्यांच्यामधला कोण त्याच्यावर अधिक प्रीती करील?"

[४३]शिमोनाने उत्तर देऊन म्हटले,

"मला वाटतं ज्याला अधिक सोडलं तो."

आणि तो त्याला म्हणाला,

"तू बरोबर ठरवलंस."

[४४]तेव्हा तो त्या स्त्रीकडे मागे वळला व शिमोनाला
म्हणाला,

"तू ह्या बाईला पहात आहेस? मी तुझ्या घरी आलो; तू माझ्या पायांसाठी पाणी दिलं नाहीस; पण हिनं माझे पाय
आसवांनी धुतले. [४५]तू मला चुंबन दिलं नाहीस पण हिनं
मी आत आल्यापासून माझ्या पायांचे मुके घेणं थांबवलं
नाही. [४६]तू माझ्या डोक्याला तेल लावलं नाहीस पण हिनं
माझ्या पायांना सुवासिक तेल लावलं. [४७]म्हणून, मी तुला
सांगतो की, हिची जी पुष्कळ पापं आहेत त्यांची क्षमा केली आहे; कारण हिनं पुष्कळ प्रीती केली. पण ज्याला थोड्यांची क्षमा केली आहे तो थोडी प्रीती करतो."

[४८]आणि तो तिला म्हणाला,

"तुझ्या पापांची क्षमा केली आहे."

[४९]तेव्हा त्याच्याबरोबर भोजनास बसलेले एकमेकांना
म्हणू लागले की,

"हा पापांची क्षमा करतो असा हा कोण आहे?"

[५०]आणि तो त्या स्त्रीला म्हणाला,

"तुझ्या विश्वासानं तुला तारलं आहे; शांतीत जा."

८ **आणि त्यानंतर** असे झाले की, तो नगरांमधून
व खेड्यांमधून घोषणा करीत व देवाच्या राज्याची
सुवार्ता गाजवीत फिरत गेला, आणि बारा जण
त्याच्याबरोबर होते. [२]आणि, दुष्ट आत्म्यांपासून व
आजारांपासून बऱ्या झालेल्या कित्येक स्त्रिया, जिच्यामधून सात भुते निघाली व जिला मग्दाली म्हणत ती
मरिया, [३]आणि हेरोदाचा कारभारी खुजा ह्याची बायको
योहान्ना, आणि सुसान्ना व दुसऱ्या पुष्कळ स्त्रिया त्याच्याबरोबर होत्या; त्या आपल्या पैशाअडक्याने त्याची सेवा करीत असत.

[४]**मग पुष्कळ लोक एकत्र** जमले असता, आणि
प्रत्येक नगरातून ते त्याच्याकडे आले असता त्याने त्यांना एक दाखला सांगितला,

[५]"एक पेरणारा आपलं बी पेरायला गेला, आणि तो
पेरीत असता काही वाटेच्या कडेला पडलं. ते तुडवलं गेलं, आणि आकाशातल्या पक्ष्यांनी खाऊन टाकलं.
[६]काही खडकाळीवर पडलं, ते उगवल्याबरोबर वाळून

गेलं; कारण त्याला ओलावा नव्हता. [७]आणि काही
काटेऱ्यांत पडलं आणि त्याबरोबर काटेरे वाढले, आणि
त्यांनी त्याची वाढ खुंटवली. [८]आणि दुसरं चांगल्या
जमिनीत पडलं आणि उगवलं, आणि त्यानं शंभरपट पीक
दिलं."
आणि तो हे बोलल्यावर ओरडून म्हणाला,
"ज्याला ऐकायला कान आहेत तो ऐको."
[९]मग त्याच्या शिष्यांनी त्याला हा दाखला काय
असेल ते विचारले. [१०]आणि तो म्हणाला,
"देवाच्या राज्याची रहस्यं जाणणं तुम्हाला दिलेलं
आहे, पण इतरांसाठी ते दाखल्यांत आहे; म्हणजे
'त्यांनी पाहून पाहू नये,
आणि ऐकून विचार करू नये.'
[११]आता तो दाखला हा आहे; बी देवाचं वचन आहे
[१२]आणि जे वाटेच्या कडेचे आहेत ते ज्यांनी वचन ऐकलं
ते होत. मग सैतान येतो, आणि त्यांनी विश्वास ठेवू नये
आणि त्यांचं तारण होऊ नये म्हणून त्यांच्या मनातून वचन
काढून घेतो. [१३]खडकाळीवरचे आहेत ते हे की, त्यांनी
ऐकल्यावर ते आनंदानं वचन स्वीकारतात. त्यांना मूळ
नसतं, ते काही काळ विश्वास ठेवतात आणि परीक्षेच्या
काळात पडतात. [१४]आणि काटेऱ्यांत पडलं ते ज्यांनी
ऐकलं आहे ते होत. ते आपल्या मार्गानं जात असता
आयुष्यातील काळज्या, धन आणि सुखं ह्यांनी त्यांची
वाढ खुंटते आणि ते पिकास येत नाहीत. [१५]आणि
चांगल्या जमिनीत पडलं ते हे आहेत; ते वचन ऐकून
चांगल्या, सालस मनात धरतात आणि टिकाव धरून पीक
देतात.

[१६]"कोणी मनुष्य दिवा पेटवून तो भांड्याखाली
झाकीत नाही किंवा पलंगाखाली ठेवीत नाही, पण आत
येणाऱ्यांना उजेड दिसावा म्हणून तो दिवठणीवर ठेवतो.
[१७]कारण प्रगट केलं जाणार नाही असं काही लपवलेलं
नाही; किंवा कळणार नाही, किंवा प्रसिद्धीस येणार नाही
असं गुप्त ठेवलेलं नाही. [१८]म्हणून तुम्ही कसं ऐकता ह्याची
काळजी घ्या; कारण ज्या कोणाजवळ आहे त्याला दिलं
जाईल, आणि ज्या कोणाजवळ नाही त्याच्याजवळ जे
आहे असं तो समजतो तेपण त्याच्याकडून काढून घेतलं
जाईल."

[१९]तेव्हा तेथे त्याची आई व त्याचे भाऊ
त्याच्याकडे आले, आणि गर्दीमुळे ते त्याच्याजवळ जाऊ
शकले नाहीत. [२०]तेव्हा त्याला हे सांगण्यात आले की,
"आपली आई आणि आपले भाऊ बाहेर उभे आहेत;
आणि आपल्याला भेटायची त्यांची इच्छा आहे."
[२१]पण त्याने त्यांना उत्तर देऊन म्हटले,
"माझी आई आणि माझे भाऊ हे, जे देवाचं वचन
ऐकतात आणि त्याप्रमाणं करतात ते आहेत."

[२२]आणि त्या दिवसांत एकदा असे झाले की, तो
शिष्यांबरोबर एका मचव्यात चढला, आणि तो त्यांना
म्हणाला,
"आपण सरोवराच्या दुसऱ्या बाजूस जाऊ."
आणि ते चालवू लागले. [२३]पण ते वल्हवीत असता त्याला
झोप लागली, आणि त्या सरोवरावर वावटळीचे वादळ
आले; ते पाण्याने भरू लागले आणि धोक्यात होते.
[२४]तेव्हा ते त्याच्याजवळ गेले आणि त्यांनी त्याला उठवून
म्हटले,
"स्वामी, स्वामी, आपण बुडतोत."
तेव्हा तो उठला, आणि त्याने वाऱ्याला व उसळणाऱ्या
पाण्याला दटावले; आणि ते थांबले व स्तब्धता आली.
[२५]मग तो त्यांना म्हणाला,
"तुमचा विश्वास कुठं आहे?"
आणि ते भ्याले होते, आणि त्यांनी आश्चर्य करीत
एकमेकांस म्हटले,
"असा हा कोण आहे की, हा वाऱ्याला आणि
पाण्यालादेखील आज्ञा करतो आणि ते त्याचं ऐकतात?"

[२६]मग ते गालिलाच्या विरुद्ध बाजूस गरसेकरांच्या
प्रांतात आले. [२७]आणि तो बाहेर किनाऱ्यावर आला तेव्हा
त्याला त्या नगरातला एक मनुष्य भेटला; त्याच्यात भुते
होती. तो दीर्घकाळापासून कधी कपडे पेहरीत नसे आणि
घरात रहात नसे, पण थडग्यांत राही. [२८]आणि त्याने
येशूला बघितले तेव्हा तो ओरडून त्याच्यापुढे पालथा
पडला, आणि मोठ्या आवाजात म्हणाला,
"येशू, परात्पर देवाच्या पुत्रा, तुला माझ्याशी काय
करायचं आहे? मी तुला विनवणी करतो, मला पीडू
नकोस."
[२९]कारण तो त्या अशुद्ध आत्म्याला त्या मनुष्यातून बाहेर
निघायची आज्ञा देत होता; (कारण त्याने त्याला पुष्कळदा

पछाडले होते, त्याला साखळ्यांत व पायबेड्यांत जखडून
पहाऱ्यात ठेवीत; पण तो ती बंधने तोडी, आणि भूत
त्याला रानात हाकलून नेई.) [३०]आणि येशूने त्याला
विचारले,

"तुझं नाव काय?"

आणि तो म्हणाला,

"सैन्य."

कारण त्याच्यात पुष्कळ भुते शिरली होती. [३१]आणि त्याने
त्यांना अगाधकूपात जायची आज्ञा देऊ नये अशी त्यांनी
त्याला विनंती केली. [३२]आता एक, पुष्कळ डुकरांचा
कळप तेथे डोंगरावर चरत होता; आणि त्याने त्यांना
त्यांच्यात जाऊ द्यावे अशी त्यांनी त्याला विनंती केली;
आणि त्याने त्यांना जाऊ दिले. [३३]तेव्हा ती भुते त्या
मनुष्यातून निघून त्या डुकरांत शिरली. आणि तो कळप
एका कड्यावरून जोरात पळत खाली सरोवरात गेला,
आणि ती गुदमरली. [३४]तेव्हा जे त्यांची राखण करीत होते
त्यांनी काय झाले ते बघितले तेव्हा ते पळाले आणि त्यांनी
ते नगरात आणि शिवारात सांगितले. [३५]तेव्हा ते काय
झाले ते बघायला बाहेर निघाले व येशूकडे आले; आणि
ज्या मनुष्यातून भुते निघाली होती तो त्यांना कपडे
घातलेला, शुद्धीवर आलेला आणि येशूच्या पायांशी
बसलेला आढळला; आणि ते भ्याले. [३६]आणि ज्यांनी ते
बघितले होते त्यांनी ज्याला भुते लागली होती तो कसा
बरा झाला हे त्यांना सांगितले. [३७]तेव्हा गरसेकरांच्या
आसपासच्या प्रांतातील सर्व लोकांनी त्याला
आपल्यामधून निघून जायची विनंती केली; कारण त्यांना
मोठ्या भयाने पछाडले होते. तेव्हा तो मचव्यात चढला व
परत गेला. [३८]तेव्हा ज्या मनुष्यातून भुते निघाली होती
त्याने आपण त्याच्याबरोबर असावे म्हणून त्याला तशी
विनंती केली. पण त्याने त्याला लावून दिले व म्हटले,

"तू आपल्या घरी जा आणि देवानं तुझ्यासाठी किती
मोठ्या गोष्टी केल्यात त्या सर्व सांग."

[३९]तेव्हा तो गेला, आणि येशूने त्याच्यासाठी ज्या मोठ्या
गोष्टी केल्या होत्या त्या त्याने सर्व नगरात गाजवल्या.

[४०]आणि येशू परत आला तेव्हा लोकांनी त्याचे
स्वागत केले. कारण ते सगळे त्याची वाट पहात होते.
[४१]आणि बघा, तेथे याईर नावाचा एक मनुष्य आला. तो
एक, सभास्थानाचा अधिकारी होता. तो येशूच्या पायांशी
पालथा पडला, आणि त्याने आपल्या घरी यावे अशी
त्याने त्याला विनंती केली. [४२]कारण त्याला सुमारे बारा
वर्षांची एकुलती एक मुलगी होती आणि ती मरत होती.
पण तो आत जात असता लोक त्याला चेंगरू लागले.
[४३]आणि तेथे बारा वर्षे रक्तस्राव लागलेली एक स्त्री होती;
ती कोणाकडूनही बरी होऊ शकली नव्हती. [४४]आणि ती
त्याच्या मागोमाग आली व त्याच्या वस्त्राला शिवली.
आणि, लगेच, तिचा रक्तस्राव थांबला. [४५]तेव्हा येशू
म्हणाला,

"मला कोण शिवलं?"

आणि सगळे जण नाकारू लागले तेव्हा पेत्र म्हणाला,

"स्वामी, ही गर्दी आपल्याला रेटीत आहे आणि
लोटीत आहे."

[४६]पण येशू म्हणाला,

"मला कोणी तरी शिवलं. कारण माझ्यातून गुण बाहेर
गेला हे मी जाणलं. [४७]आणि त्या बाईने जेव्हा बघितले
की, आपण लपून राहिलो नाही, तेव्हा ती कापत कापत
येऊन त्याच्यापुढे पालथी पडली; आणि ती त्याला
कोणत्या कारणावरून शिवली होती व तत्काळ कशी बरी
झाली हे तिने त्याला सर्व लोकांपुढे सांगितले. [४८]आणि तो
तिला म्हणाला,

"मुली, तुझ्या विश्वासानं तुला बरं केलं आहे; शांतीत
जा."

[४९]तो बोलत होता तेवढ्यात सभास्थानाच्या
अधिकाऱ्याकडचा एक जण आला व त्याला म्हणाला,

"आपली मुलगी मरण पावली; गुरूंना त्रास देऊ
नका."

[५०]पण येशूने हे ऐकून त्याला उत्तर दिले,

"भिऊ नको. मात्र विश्वास ठेव, आणि ती बरी
होईल."

[५१]आणि तो घरात गेला, तेव्हा त्याने पेत्र, याकोब व
योहान, आणि मुलीचा बाप व आई एवढ्यांशिवाय
कोणालाही आत येऊ दिले नाही. [५२]तेव्हा सगळे
तिच्यासाठी रडत होते व ऊर बडवीत होते; पण तो
म्हणाला,

"रडू नका; ती मेली नाही पण झोपली आहे."

[५३]तेव्हा ते त्याला हसले, कारण ती मेली होती हे ते जाणत
होते. [५४]पण त्याने तिच्या हाताला धरून, हाक मारून
म्हटले,

"मुली, ऊठ."

तेव्हा तिचा आत्मा परत आला आणि ती लगेच उठली.
५५आणि त्याने तिला काही खायला द्यायला सांगितले.
५६तेव्हा तिचे आईबाप चकित झाले. पण जे झाले ते
कोणाला सांगू नये असे त्याने त्यांना निक्षून सांगितले.

९ **आणि त्याने बारा जणांना** एकत्र बोलावले;
आणि त्यांना सर्व भुतांवर आणि रोग बरे करायला
सामर्थ्य व अधिकार देऊन २त्याने त्यांना देवाच्या
राज्याची घोषणा करायला व आजारी असलेल्यांना बरे
करायला पाठवले. ३आणि तो त्यांना म्हणाला,

"वाटेसाठी काही घेऊ नका; काठी नाही, झोळी
नाही, भाकर नाही किंवा पैसा नाही, किंवा दोन झगेही घेऊ
नका. ४आणि तुम्ही ज्या कोणत्या घरात जाल तिथं रहा,
आणि तिथून पुढं जा. ५आणि जे कोणी तुमचं स्वागत
करणार नाहीत त्यांच्याविरुद्ध साक्ष म्हणून त्या नगरातून
बाहेर जाताना तुम्ही आपल्या पायांवरची धूळ झटकून
टाका."
६तेव्हा ते निघाले आणि प्रत्येक ठिकाणी सुवार्ता सांगत व
रोग बरे करीत त्यांनी खेड्यांमधून प्रवास केला.

७**आणि जे काही केले** जात होते ते सर्व मांडलिक
हेरोदाने ऐकले आणि तो मोठ्या संभ्रमात पडला. कारण
कोणी म्हणत की, 'योहान मेलेल्यांतून उठवला गेला
आहे.' ८कोणी म्हणत की, 'एलिया प्रगट झाला आहे'
आणि दुसरे म्हणत की, 'प्राचीन संदेष्ट्यांतला कोणी पुन्हा
उठला आहे.' ९आणि हेरोद म्हणाला,

"मी योहानाचा शिरच्छेद केला, पण मी हे
ज्याच्याविषयी ऐकतो तो कोण आहे?"
आणि त्याला बघावे अशी त्याची इच्छा होती.

१०**आता प्रेषित परत आले**, तेव्हा त्यांनी जे काही
केले होते ते त्याला सविस्तर सांगितले; तेव्हा त्याने त्यांना
आपल्याबरोबर घेतले व बेथसैदा नावाच्या गावाकडे तो
एका एकान्त स्थळी एकीकडे गेला. ११पण हे लोकांना
कळले तेव्हा ते त्याच्या मागोमाग गेले व त्याने त्यांचे
स्वागत केले. तो त्यांच्याशी देवाच्या राज्याविषयी
बोलला आणि ज्यांना बरे करायची गरज होती त्यांना त्याने
बरे केले. १२आता दिवस सरत आला; आणि बारा जण
त्याच्याकडे येऊन त्याला म्हणाले,

"लोकांना लावून द्या; म्हणजे ते सभोवताली,
खेड्यांत आणि शिवारात जाऊन राहतील, आणि काही
खाणं मिळवतील, कारण आपण इथं रानातल्या जागी
आहो."
१३आणि तो त्यांना म्हणाला,

"तुम्ही त्यांना खायला द्या."
तेव्हा ते म्हणाले,

"आम्ही जर गेलो नाही आणि ह्या सर्व लोकांसाठी
अन्न विकत घेतलं नाही, तर आमच्याजवळ पाच भाकरी
आणि दोन माशांशिवाय अधिक काही नाही."
१४कारण ते सुमारे पाच हजार पुरुष होते. तेव्हा तो
आपल्या शिष्यांना म्हणाला,

"त्यांना सुमारे पन्नासपन्नासांच्या पंगती करून
बसवा."
१५तेव्हा त्यांनी त्याप्रमाणे केले व त्या सर्वांना खाली
बसवले. १६मग त्याने पाच भाकरी आणि दोन मासे घेऊन,
आकाशाकडे वर पाहिले, आणि आशीर्वाद मागून त्यांचे
तुकडे केले; आणि लोकांना वाढायला शिष्यांजवळ दिले.
१७आणि ते सर्व जण जेवले व तृप्त झाले. मग त्यांनी बारा
करंडे भरून त्यांतले राहिलेले तुकडे उचलले.

१८**आणि असे झाले की**, तो एकीकडे प्रार्थना करीत
असता शिष्य त्याबरोबर होते; तेव्हा त्याने त्यांना प्रश्न
करून म्हटले,

"मी कोण आहे म्हणून लोक म्हणतात?"
१९आणि त्यांनी त्याला उत्तर देऊन म्हटले,

"बाप्तिस्मा करणारा योहान; पण कित्येक एलिया,
आणि दुसरे कित्येक प्राचीन संदेष्ट्यांतला कोणी पुन्हा
उठला असेल असं म्हणतात."
२०तेव्हा त्याने त्यांना म्हटले,

"पण मी कोण आहे म्हणून तुम्ही म्हणता?"
आणि पेत्राने उत्तर देऊन म्हटले,

"देवाचा ख्रिस्त."
२१आणि हे कोणाला सांगू नये म्हणून त्याने त्यांना निक्षून
सांगितले व आज्ञा दिली.

२२**आणि तो म्हणाला,**

"मनुष्याच्या पुत्रानं पुष्कळ सोसावं, वडील, वरिष्ठ
याजक आणि शास्त्री ह्यांच्याकडून नाकारलं जावं आणि

मारलं जावं, आणि तिसऱ्या दिवशी उठवलं जावं हे
अगत्य आहे."
२३आणि तो सर्वांना म्हणाला,
"जर कोणी माझ्यामागं येऊ इच्छीत असेल तर त्यानं
स्वतःला नाकारावं, आणि दररोज आपला वधस्तंभ घेऊन
माझ्यामागं यावं. २४कारण जो आपला जीव वाचवू पाहील
तो आपल्या जिवाला मुकेल, पण जो माझ्याकरता
आपल्या जिवाला मुकेल तो आपला जीव वाचवील.
२५कारण मनुष्यानं सगळं जग मिळवून जर स्वतःला नष्ट
केलं, किंवा गमावलं, तर त्याला काय लाभ झाला?
२६कारण ज्याला माझी आणि माझ्या वचनांची लाज
वाटेल त्याची मनुष्याच्या पुत्राला तो जेव्हा आपल्या,
आणि आपल्या पित्याच्या आणि पवित्र दूतांच्या गौरवात
येईल तेव्हा लाज वाटेल. २७पण मी तुम्हाला खरोखर
सांगतो, इथं उभे राहिलेत त्यांच्यात कोणी असे आहेत
की, ते देवाचं राज्य बघतील तोवर मरणाचा अनुभव
घेणार नाहीत."

२८**आणि असे झाले की,** त्याने ह्या बोलण्यानंतर
सुमारे आठ दिवसांनी पेत्र, याकोब व योहान ह्यांना बरोबर
घेतले, आणि तो प्रार्थना करायला एका डोंगरावर गेला.
२९आणि तो प्रार्थना करीत असता त्याच्या मुद्रेचे रूप
पालटले, आणि त्याचे वस्त्र शुभ्र व चकचकीत झाले.
३०आणि बघा, दोघे जण त्याच्याशी बोलत होते; ते मोशे
आणि एलिया होते. ३१ते तेजात प्रगट झाले, आणि तो जे
आपले निर्गमन यरुशलेमात पूर्ण करणार होता त्याविषयी
ते बोलत होते. ३२आणि पेत्र व त्याचे सोबती हे झोपेने
भारावले होते; पण ते नीट जागे झाले तेव्हा त्यांनी त्याचे
तेज, आणि त्याच्याबरोबर उभे राहिलेले दोघे जण
बघितले. ३३आणि असे झाले की, ते त्याच्याजवळून
निघत असता, आपण काय बोलतो हे न समजता, पेत्र
येशूला म्हणाला,
"स्वामी, आम्ही इथं आहोत हे चांगलं आहे. आम्ही
तीन मंडप करू, एक तुझ्यासाठी, एक मोशेसाठी आणि
एक एलियासाठी."
३४तो हे बोलत होता तेवढ्यात एक ढग आला, आणि
त्याने त्यांच्यावर छाया केली; आणि, ते ढगात गेले तेव्हा
ते भ्याले. ३५आणि ढगातून वाणी आली; ती म्हणाली,
'हा माझा पुत्र माझा निवडलेला आहे;
ह्याचं ऐका.'
३६आणि ही वाणी झाली तेव्हा येशू एकटा आढळला;
आणि ते गप्प राहिले; आणि त्यांनी जे पाहिले होते त्यातले
काहीच त्यांनी त्या दिवसांत कोणाला सांगितले नाही.

३७**आणि असे झाले की,** दुसऱ्या दिवशी ते
डोंगरावरून खाली आले. तेथे पुष्कळ लोक त्याला भेटले.
३८आणि बघा, लोकांतला एक जण ओरडून म्हणाला,
"गुरू, मी आपल्याला विनवणी करतो, माझ्या
मुलाकडे पहा; कारण तो माझा एकुलता एक आहे.
३९आणि बघा, एक भूत त्याला धरतं, आणि हा एकदम
ओरडतो; आणि ते ह्याला असं पिळतं की, ह्याला फेस
येतो; ते ह्याला ठेचतं आणि ह्याला लवकर सोडीत नाही.
४०आणि त्याला बाहेर काढायला मी आपल्या शिष्यांना
विनवणी केली; पण त्यांना ते करता आलं नाही."
४१तेव्हा येशूने उत्तर देऊन म्हटले,
"हे विश्वासहीन आणि विपरीत पिढी, मी कुठवर
तुमच्याबरोबर राहू आणि तुमचं सहन करू? तुझ्या
मुलाला इकडे आण."
४२आणि तो येत असतानाच भुताने त्याला पाडून पिळले;
पण येशूने त्या अशुद्ध आत्म्याला दटावले, आणि त्या
मुलाला बरे केले व त्याच्या बापाजवळ परत दिले.
४३आणि देवाच्या महान सामर्थ्यावरून सर्व थक्क झाले.

**पण त्याने केलेल्या** सर्व गोष्टींवरून सर्व जण
आश्चर्य करीत असताना तो आपल्या शिष्यांना म्हणाला,
४४"हे शब्द तुमच्या कानांत ठसवा; कारण मनुष्याचा
पुत्र लोकांच्या हाती धरून दिला जाईल."
४५पण त्यांना हे बोलणे समजले नाही; आणि ते त्यांना
कळू नये म्हणून ते त्यांच्यापासून गुप्त ठेवण्यात आले होते.
आणि ते ह्या गोष्टींविषयी त्याला विचारायला भ्याले.

४६**आणि आपल्यात सर्वांत मोठा** कोण व्हावा,
असा त्यांच्यात वाद उद्भवला. पण, ४७येशूने त्यांच्या
मनांतले विचार ओळखले तेव्हा त्याने एका बालकाला
घेतले व त्याला आपल्याजवळ बसवले; आणि त्यांना
म्हटले,
४८"जो कोणी ह्या बालकाचा माझ्या नावानं स्वीकार
करतो तो माझा स्वीकार करतो, आणि जो माझा स्वीकार
करतो तो ज्यानं मला पाठवलं त्याचा स्वीकार करतो.
कारण तुमच्यात जो सर्वांत लहान आहे तो मोठा आहे."

४९आणि योहानाने उत्तर देऊन म्हटले,

"स्वामी, आम्ही एकाला आपल्या नावानं भुतं काढीत असताना बघितलं आणि आम्ही त्याला मना करायचा प्रयत्न केला; कारण तो आमच्याबरोबर आपल्यामागं येत नाही."

५०पण येशू त्याला म्हणाला,

"त्याला मना करू नका; कारण जो तुमच्या विरुद्ध नाही तो तुमच्या बाजूचा आहे."

५१आणि असे झाले की, त्याचे वर घेतले जाण्याचे
दिवस जवळ आले तेव्हा त्याने यरुशलेमकडे जायला
निश्चयाने आपले तोंड वळवले, ५२आणि त्याने
आपल्यापुढे निरोप्यांना पाठवले; तेव्हा ते गेले व
त्याच्यासाठी तयारी करायला शोमरोन्यांच्या एका
खेड्यात गेले. ५३आणि त्यांनी त्याचे स्वागत केले नाही.
कारण तो यरुशलेमकडे जात असल्यासारखे त्याचे तोंड
होते. ५४आणि त्याचे शिष्य याकोब व योहान ह्यांनी हे
बघितले तेव्हा ते म्हणाले,

"प्रभू, आकाशातून अग्नीनं येऊन ह्यांचा संहार करावा, अशी आम्ही आज्ञा करावी अशी आपली इच्छा आहे काय?"

५५पण तो वळला व त्याने त्यांना दटावले. ५६आणि ते
पुढच्या खेड्याकडे गेले.

५७आणि ते वाटेने जात असता एक जण त्याला म्हणाला,

"प्रभू, आपण जाल तिकडे मी आपल्यामागं येईन."

५८आणि येशू त्याला म्हणाला,

"खोकडांना बिळं, आणि आकाशातल्या पक्ष्यांना घरटी आहेत, पण मनुष्याच्या पुत्राला डोकं टेकायला कुठंच काही नाही."

५९आणि तो दुसऱ्या एकाला म्हणाला,

"माझ्यामागं ये."

पण तो म्हणाला,

"प्रभू, मला प्रथम जाऊ द्या, आणि माझ्या बापाला पुरू द्या."

६०पण तो त्याला म्हणाला,

"मृतांना त्यांच्या मृतांना पुरू दे, पण तू जा आणि देवाच्या राज्याची घोषणा कर."

६१आणि आणखीही एक जण म्हणाला,

"प्रभू, मी आपल्यामागं येईन; पण प्रथम मला माझ्या घरच्यांची रजा घेऊ द्या."

६२पण येशू त्याला म्हणाला,

"जो कोणी नांगराला हात घातल्यावर मागं पाहतो तो देवाच्या राज्याला उपयोगी नाही."

१० ह्यानंतर प्रभूने आणखी सत्तर जणांना नेमले
व तो स्वतः जिकडे जाणार होता अशा प्रत्येक
गावी व ठिकाणी, त्याने त्यांना दोघादोघांना, आपल्या पुढे
पाठवले. २आणि तो त्यांना म्हणाला,

"पीक फार आहे, पण कामकरी थोडे आहेत; तर
पिकाच्या धन्यानं आपल्या पिकात कामकरी पाठवावेत
म्हणून तुम्ही त्याला विनवणी करा. ३जा, बघा, मी
तुम्हाला लांडग्यांत मेंढरांसारखे पाठवीत आहे. ४पिशवी,
झोळी, किंवा वहाणा घेऊ नका; आणि वाटेत कोणाला
अभिवादन करू नका. ५आणि तुम्ही ज्या कोणत्या घरात
जाल, तिथं प्रथम, 'ह्या घराला शांती असो', असं म्हणा.
६आणि शांतीचा पुत्र तिथं असेल तर तुमची शांती
त्याच्यावर राहील; नसेल तर ती तुमच्याकडे परत येईल.
७आणि त्याच घरात, ते जे काही देतील ते खात पीत रहा,
कारण कामकरी त्याच्या वेतनाला पात्र आहे. एक घर
सोडून दुसऱ्या घरी जाऊ नका. ८तुम्ही कोणत्याही नगरात
गेलात आणि त्यांनी तुमचं स्वागत केलं, तर ते जे तुम्हाला
वाढतील ते खा. ९तिथल्या आजाऱ्यांना बरं करा, आणि
त्यांना सांगा, 'देवाचं राज्य तुमच्या जवळ आलं आहे'.
१०पण कोणत्याही नगरात तुम्ही जाल आणि त्यांनी तुमचं
स्वागत केलं नाही, तर तेथील रस्त्यावर बाहेर जाऊन
म्हणा, ११'आमच्या पायांना चिकटून राहिलेली तुमच्या
नगरातली धूळदेखील आम्ही तुमच्याविरुद्ध पुसतो. पण हे
जाणा की, देवाचं राज्य जवळ आलं आहे.' १२पण मी
तुम्हाला सांगतो, त्या दिवशी, त्या नगरापेक्षा सदोमाला
अधिक सोपं होईल.

१३"हे खोराजिना, तुला हळहळ! हे बेथसैदा, तुला
हळहळ! कारण तुमच्यात जे चमत्कार झाले ते सोर आणि
सिदोन इथं घडले असते, तर त्यांनी तरट आणि राख
अंगावर घालून, बसून पश्चात्ताप केला असता. १४पण
न्यायाच्या वेळी, तुमच्यापेक्षा सोर आणि सिदोन ह्यांना
अधिक सोपं होईल. १५आणि हे कपर्णहुमा, तुला

स्वर्गापर्यंत चढवण्यात येईल काय? तुला अधोलोकापर्यंत खाली आणण्यात येईल.

१६"जो तुमचं ऐकतो तो माझं ऐकतो; जो तुमचा अवमान करतो तो माझा अवमान करतो; आणि जो माझा अवमान करतो तो ज्यानं मला पाठवलं त्याचा अवमान करतो."

१७आणि सत्तर जण आनंदाने परत येऊन म्हणाले,

"प्रभू, आपल्या नावानं भुतंही आम्हाला आज्ञांकित झाली."

१८आणि तो त्यांना म्हणाला,

"मी सैतानाला आकाशातून विजेसारखा पडताना
पाहिलं. १९बघा, मी तुम्हाला साप आणि विंचू ह्यांना तुडवायचा, आणि वैऱ्याच्या सर्व शक्तीवर अधिकार दिला आहे; आणि तुम्हाला काही कसाही अपाय करणार
नाही. २०तरी भुतं तुम्हाला आज्ञांकित होतात म्हणून आनंद करू नका, पण त्यापेक्षा स्वर्गात तुमची नावं लिहिलेली आहेत म्हणून आनंद करा."

२१त्याच घटकेस तो पवित्र आत्म्यात हर्षित होऊन म्हणाला,

"हे पित्या, स्वर्गाच्या आणि पृथ्वीच्या प्रभू, मी तुझी स्तुती करतो, कारण तू ह्या गोष्टी ज्ञान्यांपासून आणि बुद्धिवानांपासून गुप्त ठेवल्यास आणि बालकांना प्रकट केल्यास. हो, पित्या, कारण ते तुला अधिक बरं दिसलं.
२२माझ्या पित्यानं सर्व गोष्टी माझ्या हाती दिल्या आहेत, आणि पुत्र कोण आहे हे पित्याशिवाय कोणी जाणत नाही; आणि पिता कोण आहे हे पुत्राशिवाय, आणि पुत्र ज्या कोणाला प्रकट करू इच्छील त्याच्याशिवाय कोणी जाणत नाही."

२३मग तो शिष्यांकडे वळला आणि त्यांना एकीकडे म्हणाला,

"तुम्ही ह्या ज्या गोष्टी पाहता त्या पाहणारे डोळे धन्य!
२४कारण मी तुम्हाला सांगतो, पुष्कळ संदेष्ट्यांनी आणि राजांनी तुम्ही ज्या गोष्टी पहात आहा त्या बघण्याची इच्छा धरली आणि त्यांनी त्या बघितल्या नाहीत; आणि तुम्ही ज्या गोष्टी ऐकत आहा त्या ऐकण्याची इच्छा धरली आणि त्यांनी त्या ऐकल्या नाहीत."

२५**आणि बघा, एक शास्त्री** उभा राहिला व त्याने त्याची परीक्षा करावी म्हणून त्याला म्हटले,

"गुरू, मी सार्वकालिक जीवन हे वतन मिळवायला काय करू?"

२६आणि तो त्याला म्हणाला,

"नियमशास्त्रात काय लिहिलं आहे? तू कसं वाचतोस?"

२७तेव्हा तो उत्तर देऊन म्हणाला,

" 'तुझा देव परमेश्वर ह्याच्यावर तू आपल्या पूर्ण मनाने, पूर्ण जिवाने, पूर्ण शक्तीने आणि पूर्ण बुद्धीने प्रीती कर;' आणि 'तू जशी आपल्यावर तशीच आपल्या शेजाऱ्यावर प्रीती कर.' "

२८आणि तो त्याला म्हणाला,

"तू बरोबर उत्तर दिलंस. हे कर, आणि तू जगशील."

२९पण आपण स्वतःला नीतिमान ठरवावं अशी इच्छा धरून त्याने येशूला म्हटले,

"आणि माझा शेजारी कोण?"

३०तेव्हा येशूने उत्तर देऊन म्हटले,

"एक मनुष्य यरुशलेमहून खाली यरिहोकडे निघाला, आणि चोरांच्या गराड्यात पडला. त्यांनी त्याचे कपडे काढले, त्याला फटके लगावले, त्याला अर्धमेला सोडलं,
आणि ते निघून गेले. ३१आणि संयोगानं एक याजक त्या वाटेनं खाली आला, आणि त्यानं त्याला बघितलं तेव्हा तो
दुसऱ्या बाजूकडून गेला. ३२तसाच एक लेवी त्या ठिकाणी आला, तेव्हा त्यानं त्याला बघितलं आणि तो दुसऱ्या
बाजूकडून गेला. ३३पण, तो होता तिथं एक शोमरोनी प्रवास करीत आला; आणि त्यानं त्याला बघितलं तेव्हा
त्याला त्याचा कळवळा आला. ३४तो त्याच्याकडे गेला, आणि त्यानं त्याच्या जखमांवर तेल आणि द्राक्षारस ओतून त्या बांधल्या; त्याला आपल्या जनावरावर बसवून एका उतारशाळेत आणलं, आणि त्याची चांगली काळजी
घेतली. ३५आणि त्यानं दुसऱ्या दिवशी दोन दिनार काढून ते उतारशाळेच्या मालकाला दिले, आणि तो त्याला म्हणाला, 'ह्याची चांगली काळजी घ्या, आणि तुम्ही जे काही अधिक खर्चाल ते मी पुन्हा परत येईन तेव्हा तुम्हाला
देईन.' ३६तर जो चोरांच्या गराड्यात पडला त्याचा शेजारी ह्या तिघांतून कोण झाला असं तू समजतोस?"

३७आणि तो म्हणाला,

"ज्यानं त्याच्यावर दया केली तो."

तेव्हा येशू त्याला म्हणाला,

"जा, आणि तू तसंच कर."

[३८]**आणि ते जात असता** तो एका खेड्यात आला;
आणि मार्था नावाची एक स्त्री त्याला आपल्या घरी घेऊन
गेली. [३९]तिला मरिया नावाची एक बहीण होती; ती पण
प्रभूच्या पायांशी बसून त्याचे बोलणे ऐकत होती. [४०]पण
मार्था पुष्कळ कामाने दगदगून त्याच्याजवळ येऊन
म्हणाली,

"प्रभू, माझ्या बहिणीनं मला एकटीला काम करायला
सोडलं, ह्याची आपण काही पर्वा करीत नाही? तर तिला
मला मदत करायला सांगा."

[४१]प्रभूने तिला उत्तर देऊन म्हटले,

"मार्था, मार्था, तू पुष्कळ गोष्टींच्या काळजीत आणि
गोंधळात आहेस. [४२]पण एकाच गोष्टीची गरज आहे,
कारण मरियेने चांगला भाग निवडला आहे; तो
तिच्याकडून काढून घेतला जाणार नाही."

११ **आणि असे झाले की,** तो एका ठिकाणी
प्रार्थना करीत होता, आणि त्याने समाप्त
केल्यावर त्याच्या शिष्यांपैकी एक जण त्याला म्हणाला,

"प्रभू, योहानानं त्याच्या शिष्यांना जसं प्रार्थना
करायला शिकवलं, तसं आपण आम्हाला शिकवा."

[२]आणि तो त्यांना म्हणाला,

"तुम्ही प्रार्थना कराल तेव्हा म्हणा,

'हे पित्या,
तुझे नाव पवित्र मानिले जावो,
तुझे राज्य येवो,
[३]आमची रोजची भाकर रोज आम्हाला दे;
[४]आणि आमच्या पापांची
आम्हाला क्षमा कर,
कारण आम्हीही आमच्या
प्रत्येक ऋण्याला क्षमा करतो,
आणि आम्हाला परीक्षेत आणू नकोस.' "

[५]**आणि तो त्यांना म्हणाला,**

"तुमच्यात कोणाला कोणी मित्र असेल आणि तो
मध्यरात्री त्याच्याकडे जाऊन त्याला म्हणेल, 'मित्रा, मला
तीन भाकरी उसन्या दे; [६]कारण माझा एक मित्र प्रवासात
माझ्याकडे उतरला आहे आणि त्याला वाढायला
माझ्याजवळ काही नाही.' [७]आणि तो आतून उत्तर देऊन
म्हणेल, 'मला त्रास देऊ नकोस; आता दार बंद आहे,
आणि माझी मुलं माझ्याबरोबर अंथरुणात आहेत. तुला
द्यायला मला उठता येत नाही.' [८]मी तुम्हाला सांगतो की,
तो त्याचा मित्र आहे म्हणून जरी तो उठून त्याला देणार
नाही, तरी त्याच्या आग्रहामुळं उठेल आणि त्याला
लागतील तितक्या देईल. [९]आणि मी तुम्हाला सांगतो,
मागा, आणि ते तुम्हाला दिलं जाईल; शोधा, आणि
तुम्हाला सापडेल; ठोका, आणि तुमच्यासाठी उघडलं
जाईल. [१०]कारण जो कोणी मागतो त्याला मिळतं, जो
शोधतो त्याला सापडतं, आणि जो ठोकतो त्याच्यासाठी
उघडलं जाईल. [११]तुमच्यात कोण बाप असा आहे की,
त्याचा मुलगा त्याच्याजवळ भाकर मागेल तर तो त्याला
दगड देईल? आणि मासा मागेल तर तो त्याला
माशाऐवजी साप देईल? [१२]किंवा तो अंडं मागेल तर तो
त्याला विंचू देईल? [१३]मग तुम्ही वाईट असून जर
आपल्या मुलांना चांगल्या देणग्या कशा द्याव्यात हे तुम्ही
जाणता तर तुमचा स्वर्गीय पिता त्याच्याजवळ जे मागतात
त्यांना किती विशेषेकरून पवित्र आत्मा देईल?"

[१४]**आणि तो एक भूत काढीत** होता ते मुके होते,
आणि असे झाले की, ते भूत बाहेर निघाले तेव्हा मुका
बोलू लागला, आणि लोकांनी आश्चर्य केले. [१५]पण
त्यांच्यातले कित्येक जण म्हणाले, 'हा भुतांचा अधिपती
जो बालजबूल, त्याच्या साह्यानं भुतं काढतो.'
[१६]दुसऱ्यांनी आपण त्याची परीक्षा करावी म्हणून
त्याच्याकडून आकाशातून चिन्ह मागितले. [१७]पण त्याने
त्यांचे विचार जाणून त्यांना म्हटले,

"स्वतःविरुद्ध फुटलेलं राज्य उजाड होतं; आणि
घराविरुद्ध घर पडतं. [१८]सैतानही स्वतःविरुद्ध फुटला तर
त्याचं राज्य कसं टिकेल? कारण तुम्ही म्हणता, मी
बालजबूलच्या साह्यानं भुतं काढतो. [१९]आणि मी जर
बालजबूलच्या साह्यानं भुतं काढतो तर तुमचे पुत्र
कुणाच्या साह्यानं काढतात? म्हणून ते तुमचे न्यायाधीश
होतील. [२०]पण, मी देवाच्या बोटानं भुतं काढीत असेन तर
देवाचं राज्य तुमच्यावर आलं आहे.

[२१]"जेव्हा कोणी बलवान मनुष्य शस्त्रं धारण करून,
आपल्या वाड्याचं रक्षण करतो तेव्हा त्याची मालमत्ता
सुरक्षित असते; [२२]पण त्याच्याहून अधिक बलवान मनुष्य
त्याच्यावर चालून येऊन, त्याला जिंकतो, त्यावेळी ज्या
शस्त्रसामग्रीवर त्यानं भिस्त ठेवली होती ती तो काढून घेतो
आणि त्याची लूट करतो.

[२३]"जो माझ्या बाजूला नाही तो माझ्या विरुद्ध आहे; जो माझ्याबरोबर गोळा करीत नाही तो विखरतो.

[२४]"जेव्हा एखाद्या मनुष्यामधून अशुद्ध आत्मा बाहेर निघतो तेव्हा तो विसावा शोधीत निर्जल ठिकाणांमधून फिरतो, आणि तो त्याला मिळत नाही तेव्हा तो म्हणतो, 'मी जिथून बाहेर आलो त्या माझ्या घरात मी परत जाईन'. [२५]आणि तो येतो तेव्हा ते त्याला झाडलेलं आणि सजवलेलं आढळतं. [२६]मग तो जातो आणि आपल्यापेक्षा दुष्ट असलेले आणखी सात आत्मे आपल्याबरोबर घेतो; आणि ते आत जाऊन तिथं राहतात. मग त्या मनुष्याची शेवटची स्थिती पहिल्या स्थितीपेक्षा अधिक वाईट होते."

[२७]आणि असे झाले की, तो ह्या गोष्टी बोलत असता, गर्दीतली एक स्त्री आपला आवाज चढवून त्याला म्हणाली,

"तुझा भार ज्यानं वाहिला ते उदर, आणि तू चोखलीस ती स्तनं धन्य!"

[२८]पण तो म्हणाला,

"उलट जे देवाचं वचन ऐकतात आणि पाळतात ते धन्य!"

[२९]**आणि लोक गर्दीने एकत्र** जमले तेव्हा तो बोलू लागला,

"ही पिढी दुष्ट पिढी आहे, ही चिन्ह मागते; पण योनाच्या चिन्हाशिवाय तिला कोणतंच चिन्ह दिलं जाणार नाही. [३०]कारण जसा योना निनवेकरांना चिन्ह झाला, तसाच मनुष्याचा पुत्र ह्या पिढीला होईल. [३१]दक्षिणेची राणी, न्यायाच्या वेळी, ह्या पिढीच्या लोकांबरोबर उठेल आणि ह्यांना दोषी ठरवील; कारण ती पृथ्वीच्या सीमेपासून शलमोनाचं ज्ञानीपण ऐकायला आली; आणि बघा, शलमोनापेक्षा इथं काही अधिक आहे. [३२]निनवेचे लोक, न्यायाच्या वेळी, ह्या पिढीबरोबर उठतील आणि तिला दोषी ठरवतील कारण त्यांनी योनाच्या उपदेशावरून पश्चात्ताप केला; आणि बघा, योनापेक्षा इथं काही अधिक आहे.

[३३]"कोणीही मनुष्य दिवा पेटवून तो तळघरात किंवा मापाखाली ठेवीत नाही, पण आत येणाऱ्यांना उजेड दिसावा म्हणून तो दिवठणीवर ठेवतो. [३४]तुझा डोळा तुझ्या शरिराचा दिवा आहे. तुझा डोळा नीट असेल तेव्हा तुझं संपूर्ण शरीर प्रकाशमय होईल, पण तो वाईट असेल तेव्हा तुझं शरीरही अंधकारमय होईल. [३५]म्हणून तुझ्यातला प्रकाश अंधार नसेल काय हे पहा. [३६]जर तुझं संपूर्ण शरीर प्रकाशमय असेल आणि कोणताही अवयव अंधकारमय नसेल, तर दिवा त्याच्या उज्वल प्रकाशानं जसा तुला प्रकाश देतो तसं ते पूर्ण प्रकाशमय होईल."

[३७]**आणि एक परोशी**, तो हे बोलत असता, त्याला आपल्याकडे भोजन करायची विनंती करतो. तेव्हा तो आत जाऊन भोजनास बसला. [३८]आणि जेव्हा त्या परोश्याने बघितले की, त्याने भोजनापूर्वी, प्रथम हात धुतले नाहीत तेव्हा त्याने आश्चर्य केले. [३९]तेव्हा प्रभू त्याला म्हणाला,

"तुम्ही परोशी आपले थाळे आणि प्याले बाहेरून स्वच्छ करता, पण तुमचा अंतर्भाग अपहार आणि दुष्टभाव ह्यांनी भरलेला आहे. [४०]अहो निर्बुद्धी, ज्यानं बाहेरची बाजू केली त्यानंच आतली बाजूही केली ना? [४१]पण, उलट, तुमच्याजवळ असेल त्यातून दयेच्या देणग्या द्या; आणि बघा, तुम्हाला सर्व गोष्टी शुद्ध आहेत.

[४२]"पण तुम्ही परोशी, तुम्हाला हळहळ! कारण तुम्ही पुदिना, सताप, आणि सर्व प्रकारच्या भाज्या ह्यांचा दशमांश देता; पण न्याय आणि देवाची प्रीती वगळता. पण तुम्ही ह्या करायच्या होत्या आणि दुसऱ्या सोडायच्या नव्हत्या. [४३]तुम्ही परोशी, तुम्हाला हळहळ! कारण तुम्हाला सभास्थानांत पुढच्या जागा आणि बाजारांत मुजरे घेणं आवडतं. [४४]अहो ढोंगी, शास्त्री आणि परोशी, तुम्हाला हळहळ! कारण तुम्ही न दिसणाऱ्या कबरांसारखे आहा; आणि जे लोक वरून चालतात त्यांना त्या दिसत नाहीत."

[४५]तेव्हा एक शास्त्री त्याला उत्तर देऊन म्हणतो,

"गुरू, आपण हे बोलून आमचीपण हेलना करता."

[४६]आणि तो म्हणाला,

"तुम्ही शास्त्री, तुम्हाला हळहळ! कारण तुम्ही वहायला अवजड ओझी माणसांवर लादता, आणि तुम्ही स्वतः त्या ओझ्याला तुमच्या एका बोटानंही स्पर्श करीत नाही. [४७]तुम्हाला हळहळ! कारण तुम्ही संदेष्ट्यांची थडगी बांधता, आणि तुमच्या पूर्वजांनी त्यांना मारलं. [४८]तर तुम्ही साक्षी होऊन, त्या तुमच्या पूर्वजांच्या कृत्यांना संमती देता, कारण त्यांनी त्यांना ठार मारलं आणि तुम्ही त्यांची थडगी बांधता. [४९]म्हणून देवाची सुज्ञतापण म्हणाली, 'मी त्यांच्याकडे संदेष्टे आणि प्रेषित पाठवीन; आणि ते त्यांच्यातल्या काहींना ठार मारतील, आणि

काहींचा पाठलाग करतील.' [५०-५१]म्हणून जगाच्या स्थापनेपासून, हबेलाच्या रक्तापासून, ज्याला वेदी आणि मंदिर ह्यांच्या मध्यंतरी मरण आलं त्या जखर्याच्या रक्तापर्यंत, ओतलं गेलेलं, सर्व संदेष्ट्यांचं रक्त ह्या पिढीकडून मागितलं जाईल; हो, मी तुम्हाला सांगतो, ते ह्या पिढीकडून मागितलं जाईल. [५२]अहो तुम्ही शास्त्री, तुम्हाला हळहळ! कारण तुम्ही ज्ञानाची किल्ली उचललीत. तुम्ही स्वतः आत गेला नाही, आणि जे आत जात होते त्यांना तुम्ही अडवलंत."

[५३]आणि तो तेथून बाहेर आला तेव्हा शास्त्री व परोशी त्याच्यावर चवताळून आले, आणि त्याने अधिक बोलावे म्हणून ते त्याला चिडवू लागले. [५४]आणि त्याच्या तोंडचे काही धरता येईल ह्याकरता त्याच्यावर टपून राहिले.

## १२

तेथे मध्यंतरी इतके अगणित लोक जमले की, ते एकमेकांना तुडवू लागले. तेव्हा तो प्रथम, आपल्या शिष्यांना म्हणाला,

"तुम्ही परोश्यांच्या खमिराविषयी जपा; ते ढोंग आहे. [२]पण प्रकट होणार नाही असं काही झाकलेलं नाही, आणि कळणार नाही असं गुप्त ठेवलेलं नाही. [३]तर तुम्ही जे काही अंधारात बोललात ते उजेडात ऐकू येईल, आणि आतल्या खोल्यांत कानात सांगितलंत ते धाब्यावर गाजवलं जाईल. [४]आणि माझ्या मित्रांनो, मी तुम्हाला सांगतो, जे शरिराचा वध करू शकतात आणि त्यानंतर अधिक काही करू शकत नाहीत त्यांना भिऊ नका, [५]पण तुम्ही कोणाला भ्यावं हे मी तुम्हाला सुचवतो. ज्यानं मारलं असता ज्याला नरकात टाकायचा अधिकार आहे त्याला भ्या. हो, मी तुम्हाला सांगतो, त्याला भ्या. [६]दोन दमड्यांना पाच चिमण्या मिळतात की नाही? आणि त्यातली एकपण देवासमोर विस्मरणात जात नाही. [७]पण तुमच्या डोक्याचे सगळे केसही मोजलेले आहेत. भिऊ नका, तुम्ही पुष्कळ चिमण्यांपेक्षा अधिक मोलाचे आहा.

[८]"आणि मी तुम्हाला सांगतो, जो कोणी मला मनुष्यांसमोर पतकरील त्याला मनुष्याचा पुत्रदेखील देवाच्या दूतांसमोर पतकरील. [९]पण जो मला मनुष्यांसमोर नाकारतो तो देवाच्या दूतांसमोर नाकारला जाईल. [१०]आणि जो कोणीही मनुष्याच्या पुत्राविरुद्ध कुठलाही शब्द बोलेल त्याला त्याची क्षमा कोली जाईल, पण जो पवित्र आत्म्याविरुद्ध दुर्भाषण करतो त्याला त्याची क्षमा केली जाणार नाही. [११]आणि ते तुम्हाला सभास्थानांत, न्यायसभांपुढं आणि न्यायालयांत नेतील, तेव्हा आपण कसं किंवा काय उत्तर द्यावं, किंवा काय बोलावं ह्याची काळजी करू नका. [१२]कारण तुम्ही काय बोललं पाहिजे ते पवित्र आत्मा त्याच घटकेस तुम्हाला शिकवील."

[१३]तेव्हा जमावातला एक जण त्याला म्हणाला,

"गुरू, माझ्या भावानं मला वतन विभागून द्यावं म्हणून आपण त्याला बोला."

[१४]पण तो त्याला म्हणाला,

"गड्या, मला तुमच्यावर न्यायाधीश किंवा वाटणी करणारा कोणी नेमलं?"

[१५]आणि तो त्यांना म्हणाला,

"पहा, आणि सर्व प्रकारच्या लोभांपासून सावध रहा; कारण मनुष्याचं जीवन हे त्याच्या मालमत्तेच्या विपुलतेत नाही."

[१६]आणि त्याने त्यांना एक दाखला सांगितला. तो म्हणाला,

"एका धनवान मनुष्याच्या जमिनीला चांगलं पीक आलं. [१७]तेव्हा तो मनात विचार करीत म्हणाला, 'मी काय करू? कारण माझं पीक साठवायला माझ्याजवळ जागा नाही.' [१८]आणि तो म्हणाला, 'मी हे करीन; मी माझी कोठारं पाडून मोठी बांधीन; आणि त्यांत मी माझं सर्व धान्य आणि माझा माल साठवीन. [१९]आणि माझ्या जिवाला म्हणेन, हे जिवा, तुला पुष्कळ वर्षांसाठी पुष्कळ माल ठेवलेला आहे; विसावा घे, खा, पी आणि आनंद कर.' [२०]पण देव त्याला म्हणाला, 'हे निर्बुद्धी, ह्या रात्री तुझ्याजवळून तुझा जीव मागितला जाईल, मग तू जे काही साठवलं आहेस ते कोणाचं होईल?' [२१]जो स्वतःसाठी धन साठवतो, पण देवाकडे सधन नाही तो असा आहे."

[२२]आणि तो आपल्या शिष्यांना म्हणाला,

"म्हणून मी तुम्हाला सांगतो, तुम्ही आपल्या जिवाविषयी, आपण काय खावं अशी किंवा आपल्या शरिराविषयी, आपण काय पेहरावं अशी काळजी करू नका; [२३]अन्नापेक्षा जीव आणि वस्त्रापेक्षा शरीर अधिक आहे. [२४]ह्या कावळ्यांकडे लक्ष द्या; ते पेरीत नाहीत किंवा कापणीही करीत नाहीत; त्यांना कोठी नाही किंवा कणगी नाही. आणि देव त्यांचं पोषण करतो; मग पक्ष्यांपेक्षा तुम्ही किती अधिक मोलाचे आहा? [२५]आणि तुमच्यातला कोण काळजी करून आपलं आयुष्य लवभर वाढवू शकेल?

[२६]मग तुम्ही एक लहान गोष्टही करू शकत नाही, तर इतर गोष्टींची काळजी का करता? [२७]तेरड्यांकडे लक्ष द्या; ते कष्ट करीत नाहीत किंवा कातीत नाहीत; तरी मी तुम्हाला सांगतो, शलमोनदेखील आपल्या सर्व वैभवात त्यांतल्या एकासारखा सजला नव्हता. [२८]मग जे रानातलं गवत आज आहे आणि उद्या भट्टीत टाकतील त्याला जर देव असा पेहराव घालतो, तर अहो तुम्ही अल्पविश्वासी, तो तुम्हाला किती विशेषेकरून घालील? [२९]आणि आपण काय खावं आणि काय प्यावं ह्याच्यामागं लागू नका, किंवा सचिंत मनाचे होऊ नका. [३०]कारण जगातली राष्ट्रं ह्या सर्व गोष्टींच्या मागं लागतील. आणि तुम्हाला ह्या सर्व गोष्टींची गरज आहे हे तुमचा पिता जाणतो. [३१]पण त्यापेक्षा तुम्ही त्याचं राज्य मिळवू पहा. आणि तुम्हाला ह्या सर्व गोष्टी पुरवल्या जातील.

[३२]"हे लहान कळपा, भिऊ नको; कारण तुम्हाला राज्य द्यावं हे तुमच्या पित्याला बरं वाटलं आहे. [३३]तुमच्याजवळ आहे ते विका आणि दयेच्या देणग्या द्या; आणि तुम्ही आपल्यासाठी न फाटणाऱ्या थैल्या, न सरणारं धन, स्वर्गात तयार करा. तिथं चोर जात नाही किंवा कसर नाश करीत नाही. [३४]कारण जिथं तुमचं धन आहे तिथं तुमचं मनही राहील.

[३५]"तुम्ही आपल्या कमरा बांधलेल्या आणि दिवे जळत राहू द्या. [३६]म्हणजे आपला धनी लग्नाहून परत येईल, आणि येऊन दार ठोकील तेव्हा त्याच्यासाठी आपण उघडावं म्हणून त्याची प्रतीक्षा करणाऱ्या मनुष्यांसारखे तुम्ही व्हा. [३७]धनी येईल तेव्हा त्याला जे दास जागृत असलेले आढळतील ते धन्य होत. मी तुम्हाला सत्य सांगतो, तो स्वतः आपली कंबर बांधील आणि त्यांना खाली भोजनास बसवून, पुढं येऊन त्यांची सेवा करील. [३८]आणि जर तो दुसऱ्या किंवा तिसऱ्या प्रहरी आला आणि त्याला ते तसे आढळले ते धन्य होत. [३९]आणि हे जाणा की, कोणत्या घटकेस चोर येईल हे जर घरधनी जाणत असता, तर तो जागृत राहिला असता आणि त्यानं आपलं घर फोडू दिलं नसतं. [४०]म्हणून तुम्ही तयार व्हा; कारण तुम्हाला वाटत नाही अशा घटकेस मनुष्याचा पुत्र येईल."

[४१]त्यावर पेत्र त्याला म्हणाला,

"प्रभू, तू हा दाखला आम्हाला सांगतोस की, सगळ्यांना सांगतोस?"

[४२]तेव्हा प्रभू म्हणाला,

"तर ज्याला त्याचा धनी आपल्या परिवारावर त्यांना त्याच्या अन्नाची वाटणी वेळेवर द्यावी म्हणून नेमील तो विश्वासू आणि विचारी कारभारी कोण आहे? [४३]जो दास त्याच्या धन्याला तो येईल तेव्हा तसं करताना आढळेल तो धन्य. [४४]मी तुम्हाला खरोखर सांगतो, तो आपल्या सर्व मालमत्तेवर त्याला नेमील. [४५]पण जर तो दास आपल्या मनात म्हणेल की, 'माझा धनी यायला विलंब लावीत आहे' आणि दासदासींना मारू लागेल, आणि खाऊन पिऊन झिंगेल, [४६]तर त्या दासाचा धनी, तो वाट पहात नाही अशा दिवशी आणि जाणत नाही अशा घटकेस येईल, आणि त्याला कापून काढील; आणि अविश्वासू लोकांबरोबर त्याचा वाटा नेमील. [४७]आणि ज्या दासाला धन्याची इच्छा माहीत असून ज्यानं तयारी केली नाही, आणि त्याच्या इच्छेप्रमाणं केलं नाही, त्याला पुष्कळ फटके मारले जातील; [४८]पण ज्याला माहीत नव्हती आणि ज्यानं फटक्यांलायक गोष्टी केल्या त्याला थोडे मारले जातील. कारण ज्याला पुष्कळ दिलं आहे त्याच्याकडून पुष्कळ मागण्यात येईल; आणि लोकांनी ज्याच्यावर पुष्कळ सोपवलं आहे त्याच्याकडून ते अधिक मागतील.

[४९]"मी पृथ्वीवर अग्नी पाडायला आलो आहे; आणि तो आताच पेटला असेल तर मला काय पाहिजे? [५०]पण मला एका बाप्तिस्म्यानं बाप्तिस्मा घ्यायचा आहे. आणि तो पूर्ण होईपर्यंत मी कसा पेचात आहे. [५१]मी पृथ्वीवर शांती द्यायला आलो असं तुम्ही समजता काय? मी तुम्हाला सांगतो, 'नाही'; उलट विभक्तपणा. [५२]कारण आतापासून एका घरातले पाच जण, दोघांविरुद्ध तिघे, आणि तिघांविरुद्ध दोघे असे फुटलेले असतील. [५३]मुलाविरुद्ध बाप आणि बापाविरुद्ध मुलगा फुटेल. मुलीविरुद्ध आई आणि आईविरुद्ध मुलगी, सुनेविरुद्ध सासू, आणि सासूविरुद्ध सून फुटेल."

[५४]तो लोकांनाही म्हणाला,

"तुम्ही जेव्हा हे बघता की, पश्चिमेकडून ढग चढत आहे, तेव्हा तुम्ही लगेच म्हणता, 'आता सर येईल' आणि तसं होतं. [५५]आणि दक्षिण वायू वहात आहे तेव्हा म्हणता, 'उष्णता होईल' आणि तसं होतं. [५६]अहो ढोंग्यांनो, आकाशाचं आणि पृथ्वीचं स्वरूप हे कसं ओळखावं हे तुम्हाला समजतं पण हे कसं की, हा काळ कसा ओळखावा हे तुम्हाला समजत नाही?

[५७]"हो, तसंच उचित काय आहे हे तुम्ही स्वतःच का ठरवीत नाही? [५८]तू आपल्या वादीबरोबर अधिकाऱ्याकडे

जात असताना वाटेत त्याच्यापासून सुटायचा प्रयत्न कर.
नाहीतर, तो कदाचित् तुला न्यायाधीशाकडे ओढून नेईल,
न्यायाधीश तुला शिपायाकडे देईल आणि शिपाई तुला
तुरुंगात टाकील. [५९]मी तुला सांगतो, तू आपली शेवटची
टोली फेडल्याशिवाय तिथून निघणार नाहीस."

१३ त्याच वेळी तेथे असलेल्या कित्येक
जणांनी त्याला पिलाताने ज्या गालीलकरांचे
रक्त त्यांच्या बलिदानांत मिसळले होते त्यांच्याविषयी
सांगितले. [२]त्याने त्यांना उत्तर दिले,

"त्यांनी ह्या गोष्टी सोसल्या म्हणून ते गालीलकर इतर
सर्व गालीलकरांहून अधिक पापी झाले, असं तुम्ही
समजता काय? [३]मी तुम्हाला सांगतो, 'नाही'. पण तुम्ही
पश्चात्ताप केला नाही, तर तुम्ही सगळे तसेच नष्ट व्हाल.
[४]किंवा जे अठरा लोक त्यांच्यावर शिलोहातला बुरुज
पडून मेले ते यरुशलेमात राहणाऱ्या इतर सर्व लोकांहून
अधिक अपराधी झाले असं तुम्ही मानता काय? [५]मी
तुम्हाला सांगतो, 'नाही'. पण तुम्ही पश्चात्ताप केला नाही,
तर तुम्ही सगळे तसेच नष्ट व्हाल."

[६]आणि त्याने त्यांना हा दाखला सांगितला,

"एका मनुष्याचं, त्याच्या द्राक्षमळ्यात लावलेलं, एक
अंजिराचं झाड होतं. आणि, तो त्यावर फळ पहावं म्हणून
आला पण त्याला काही आढळलं नाही. [७]तेव्हा तो
माळ्याला म्हणाला, 'बघ, मी ही तीन वर्षं, ह्या अंजिराच्या
झाडावर फळ पहावं म्हणून आलो; आणि मला काही
आढळलं नाही; हे तोडून टाक; ह्यानं जमीन का
अडवावी?' [८]तेव्हा त्यानं त्याला उत्तर देऊन म्हटलं,
'धनी, ह्या वर्षी पण हे राहू द्या; मी तोपर्यंत त्याच्या
सभोवती खणतो आणि खत घालतो. [९]मग त्यानं त्यापुढं
फळ दिलं तर बरं, नाहीतर, मग ते तोडून टाका.' "

[१०]**आणि तेथील एका सभास्थानात** तो शब्बाथ
दिवशी शिकवीत होता, आणि बघा, तेथे एक स्त्री होती.
[११]तिला अठरा वर्षांपासून एक व्याधीचा आत्मा लागला
होता. ती पुरी वाकली होती व तिला सरळ उभे राहता येत
नव्हते. [१२]आणि येशूने तिला बघितले तेव्हा त्याने तिला
आपल्याकडे बोलवून म्हटले,

"बाई, तू आपल्या व्याधीपासून मुक्त झाली आहेस."

[१३]आणि त्याने तिच्यावर हात ठेवले. तेव्हा लगेच ती
सरळ झाली व तिने देवाचे गौरव केले. [१४]आणि येशूने
शब्बाथ दिवशी व्याधी बरा केला म्हणून सभास्थानाच्या
अधिकाऱ्याला राग आला, आणि त्याने लोकांना उत्तर
देऊन म्हटले,

"ज्या दिवसांत काम केलं पाहिजे असे सहा दिवस
आहेत; म्हणून त्या दिवसांत या आणि बरे व्हा; शब्बाथ
दिवशी नको."

[१५]पण प्रभूने त्याला उत्तर देऊन म्हटले,

"अहो ढोंग्यांनो, तुमच्यातला प्रत्येक जण शब्बाथ
दिवशी आपल्या बैलाला किंवा गाढवाला गोठ्यातून
सोडतो आणि पाणी पाजायला नेतो ना? [१६]ही तर
अब्राहामाची कन्या आहे; आणि, बघा, जिला ही अठरा
वर्षं सैतानानं बांधलं होतं तिला शब्बाथ दिवशी त्या
बंधनातून सोडवू नये काय?"

[१७]आणि तो हे बोलत असता त्याला विरोध करणारे
लज्जित झाले. आणि सर्व लोक त्याच्याकडून होत
असलेल्या सर्व गौरवशाली गोष्टींमुळे आनंदित झाले.

[१८]तेव्हा तो म्हणाला,

"देवाचं राज्य कशासारखं आहे? आणि मी त्याला
कशाची उपमा देऊ? [१९]ते एका मोहरीच्या बीप्रमाणं आहे.
ते एका मनुष्यानं घेऊन आपल्या मळ्यात टाकलं. ते
उगवून त्याचं मोठं झाड झालं, आणि आकाशातले पक्षी
त्याच्या फांद्यांत राहू लागले."

[२०]आणि तो पुन्हा म्हणाला,

"मी देवाच्या राज्याला कशाची उपमा देऊ? [२१]ते
खमिराप्रमाणं आहे. ते एका स्त्रीनं घेऊन तीन मापं पिठात
दडवलं; तेव्हा ते सगळं फुगलं."

[२२]**आणि तो आपल्या मार्गाने** नगरांमधून व
खेड्यांमधून शिकवीत, आणि यरुशलेमकडे प्रवास करीत
गेला. [२३]आणि एक जण त्याला म्हणाला,

"प्रभू, तारले जातील ते थोडेच आहेत काय?"

आणि तो त्याला म्हणाला,

[२४]"अरुंद दारानं आत जायला झटा, कारण, मी
तुम्हाला सांगतो, पुष्कळ आत जायला पाहतील आणि
जाऊ शकणार नाहीत. [२५]घरधनी एकदा उठला आणि
त्यानं दार बंद करून घेतलं, आणि तुम्ही बाहेर उभे राहू
लागला, दार ठोकू लागला आणि म्हणाला, 'प्रभू,
आमच्यासाठी उघडा', तर तो उत्तर देऊन तुम्हाला म्हणेल,

'तुम्ही कुठले आहात, मी तुम्हाला ओळखीत नाही.'
[२६]तेव्हा तुम्ही म्हणू लागाल, 'आपल्यापुढं आम्ही खात
पीत होतो आणि आपण आमच्या रस्त्यावर शिकवीत
होता.' [२७]पण तो म्हणेल, 'मी तुम्हाला सांगतो, तुम्ही
कुठले आहात, मी तुम्हाला ओळखीत नाही. तुम्ही सगळे
अनीतीचे कामकरी, माझ्यापुढून निघा.' [२८]आणि तुम्ही
तेव्हा पहाल की, अब्राहाम, इसहाक आणि याकोब,
आणि सर्व संदेष्टे देवाच्या राज्यात आहेत, आणि तुम्ही
बाहेर टाकले गेला आहात; तेव्हा रडणं आणि दात खाणं
होईल. [२९]आणि पूर्वेकडून, पश्चिमेकडून, उत्तरेकडून
आणि दक्षिणेकडून लोक येतील, आणि देवाच्या राज्यात
बसतील. [३०]पण बघा, जे पहिले होतील असे शेवटले
आहेत आणि शेवटले होतील असे पहिले आहेत."

[३१]त्याच घटकेस काही परोशी आले आणि त्याला
म्हणाले,

"आपण बाहेर निघा, आणि इथून जा; कारण हेरोद
आपल्याला ठार मारायच्या विचारात आहे."
[३२]तेव्हा तो त्यांना म्हणाला,

"जा, आणि त्या खोकडाला सांगा, 'पहा, मी आज
आणि उद्या भुतं काढतो आणि रोग बरे करतो आणि
तिसऱ्या दिवशी मी पूर्ण केला जाईन.' [३३]पण मला आज,
उद्या आणि परवा चाललं पाहिजे, कारण यरुशलेमबाहेर
संदेष्ट्याचा नाश व्हावा असं होणार नाही.

[३४]"अरे यरुशलेमा, यरुशलेमा, संदेष्ट्यांना ठार
मारणाऱ्या, तुझ्याकडे पाठविलेल्यांना दगडमार
करणाऱ्या, कोंबडी जशी आपल्या पिलांना पंखाखाली
एकवट करते तसं मी तुझ्या मुलांना एकवट करावं अशी
किती वेळा माझी इच्छा होती, आणि तुझी इच्छा नव्हती.
[३५]बघा, तुमचं घर तुमच्यासाठी सोडलं आहे; आणि मी
तुम्हाला सांगतो, 'प्रभूच्या नावानं येणारा धन्य!' असं तुम्ही
म्हणाल तोपर्यंत तुम्ही मला बघणार नाही."

१४ आणि असे झाले की, तो एकदा शब्बाथ
दिवशी, परोश्यांतील एका अधिकाऱ्याच्या
घरी, भाकर खायला गेला असता ते त्याच्या पाळतीवर
राहिले. [२]आणि बघा, त्याच्यासमोर एक जलोदर झालेला
मनुष्य होता. [३]तेव्हा येशूने शास्त्र्यांना आणि परोश्यांना
उत्तर देऊन म्हटले आणि विचारले,

"शब्बाथ दिवशी कोणाला बरं करणं योग्य आहे
काय?"
[४]आणि ते स्तब्ध राहिले. तेव्हा त्याने त्याला जवळ घेतले,
बरे केले व जाऊ दिले. [५]तेव्हा तो त्यांना म्हणाला,

"तुमच्यातल्या कोणाचा मुलगा किंवा बैल जर
विहिरीत पडला तर तो त्याला शब्बाथ दिवशी, लगेच
बाहेर काढणार नाही?"
[६]आणि त्यावर ते त्याला उलटून बोलू शकले नाहीत.

[७]आणि ज्यांना आमंत्रण केले होते ते वरच्या जागा
कसे निवडीत होते, हे त्याने पाहिले तेव्हा त्याने
त्यांच्यापुढे एक दाखला मांडला; तो त्यांना म्हणाला,

[८]"कोणी तुला लग्नाच्या भोजनाला कधीही आमंत्रण
केलं असेल, तेव्हा तू वरच्या जागेवर बसू नकोस. त्यानं
कदाचित् दुसऱ्या एखाद्या, तुझ्याहून अधिक मानाच्या
मनुष्याला आमंत्रण केलं असेल, [९]आणि ज्यानं तुला
आणि त्याला आमंत्रण केलं तो येऊन तुला म्हणेल, 'ह्या
मनुष्याला जागा दे'. आणि तू लाजेनं सर्वांत खालची जागा
घेऊ लागशील. [१०]पण तुला आमंत्रण केलं असेल तेव्हा
सर्वांत खालच्या जागेवर जाऊन बस; म्हणजे ज्यानं तुला
आमंत्रण केलं तो येईल तेव्हा तुला म्हणेल, 'मित्रा, वर
जा'; मग तुझ्याबरोबर भोजनास बसलेल्या सर्वांसमोर
तुझा मान होईल. [११]कारण जो कोणी स्वतःला मोठा करतो
तो लहान केला जाईल; आणि जो कोणी स्वतःला लहान
करतो तो मोठा केला जाईल."
[१२]मग ज्याने त्याला आमंत्रण केले होते त्यालाही तो
म्हणाला,

"तुम्ही जेव्हा दुपारची किंवा रात्रीची जेवणावळ
कराल, तेव्हा तुमच्या मित्रांना, तुमच्या भावांना, तुमच्या
नातलगांना किंवा तुमच्या धनवान शेजाऱ्यांना बोलवू
नका; नाहीतर, कदाचित्, ते पण तुम्हाला परत
बोलावतील आणि तुमची फेड होईल. [१३]पण तुम्ही जेव्हा
जेवणावळ कराल तेव्हा भिकारी, अधू, पांगळे, अंधळे
ह्यांना बोलवा. [१४]आणि तुम्ही धन्य व्हाल, कारण तुमची
फेड करायला त्यांच्याजवळ काही नाही. कारण
नीतिमानांच्या पुनरुत्थानात तुमची फेड होईल."
[१५]आणि त्याच्याबरोबर जे बसले होते त्यांच्यातल्या
एकाने हे ऐकून म्हटले,

"देवाच्या राज्यात जो भाकर खाईल तो धन्य!"
[१६]तेव्हा तो त्यांना म्हणाला,

"कोणी एका मनुष्यानं संध्याकाळची मोठी
जेवणावळ केली आणि पुष्कळांना आमंत्रण केलं.
[१७]आणि ज्यांना आमंत्रण केलं होतं त्यांना त्या
जेवणावळीच्या घटकेस, 'आपण या, कारण आता सर्व
तयार आहे' असं सांगायला आपल्या एका दासाला
पाठवलं. [१८]आणि ते सगळेच सारखी सबब सांगू लागले.
पहिला त्याला म्हणाला, 'मी एक शेत विकत घेतलं आहे,
आणि मी जाऊन ते बघणं अगत्य आहे; मी तुला विनंती
करतो, मला क्षमा असावी.' [१९]आणि दुसरा म्हणाला, 'मी
पाच बैलजोड्या विकत घेतल्यात; आणि मी त्यांची
तपासणी करायला जातो. मी तुला विनंती करतो, मला
क्षमा असावी.' [२०]आणि दुसरा एक म्हणाला, 'मी बायको
केली आहे आणि म्हणून मी येऊ शकत नाही.' [२१]म्हणून
तो दास आला आणि त्यानं आपल्या धन्याला त्या गोष्टी
सांगितल्या; तेव्हा घरधनी रागावला आणि आपल्या
दासाला म्हणाला, 'तू लवकर नगरातल्या रस्त्यांत आणि
बोळांत जा, आणि भिकारी, अधू, अंधळे आणि पांगळे
असे असतील त्यांना इकडे आण.' [२२]आणि दास
म्हणाला, 'धनी, आपण आज्ञा केलीत ते झालं, आणि
अजून जागा आहे.' [२३]तेव्हा धनी दासाला म्हणाला,
'बाहेरच्या रस्त्यांवर आणि बांधांवर जा, आणि माझं घर
भरावं म्हणून त्यांना यायला लाव. [२४]कारण मी तुम्हाला
सांगतो की, ज्या लोकांना बोलावलं होतं त्यांच्यातला
एकपण माझं भोजन चाखणार नाही.' "

[२५]**आणि लोकांचे मोठाले घोळके** त्याच्याबरोबर
जात होते. तेव्हा तो मागे वळला आणि त्यांना म्हणाला,
[२६]"जर कोणी माझ्याकडे येईल, आणि आपल्या
बापाचा आणि आईचा, बायकोचा आणि मुलांचा,
भावांचा आणि बहिणींचा, हो, आणि आपल्या जिवाचाही
द्वेष करणार नाही, तर तो माझा शिष्य होऊ शकणार नाही.
[२७]आणि जो कोणी आपला वधस्तंभ उचलून माझ्यामागं
येणार नाही तो माझा शिष्य होऊ शकणार नाही. [२८]कारण
तुमच्यातला कोणी मनुष्य बुरुज बांधायचा विचार करताना
आधी बसून खर्चाचा हिशोब करीत नाही की,
आपल्याजवळ तो पुरा करायला आहे काय? [२९]नाहीतर,
कदाचित्, तो पाया घालील आणि पूर्ण करू शकणार
नाही, तेव्हा पाहणारे सर्व जण त्याला चिडवू लागतील,
[३०]आणि म्हणतील, 'हा मनुष्य बांधू लागला आणि पूर्ण
करू शकला नाही.' [३१]किंवा कोणता राजा दुसऱ्या राजाला
लढाईत तोंड द्यायला जात असताना आधी बसून विचार
करीत नाही की, आपण आपले दहा हजार घेऊन जो त्याचे
वीस हजार घेऊन आपल्यावर येत आहे त्याला सामोरे
जायला समर्थ आहोत काय? [३२]नाहीतर, तो दूर
असतानाच हा आपल्या वकिलांना पाठवून समेटाच्या
अटी विचारील. [३३]म्हणून, त्याचप्रमाणं, तुमच्यातला
कोणीही आपलं सर्वस्व सोडणार नाही तो माझा शिष्य
होऊ शकणार नाही.
[३४]"म्हणून मीठ हे उपयोगी आहे, पण मीठ निचव
झालं तर त्याला कशानं चव आणता येईल? [३५]ते
जमिनीसाठी किंवा खतासाठीही उपयोगी नाही. लोक ते
बाहेर टाकतात. ज्याला ऐकायला कान आहेत तो ऐको."

१५ **आता सगळे जकातदार** आणि पापी हे
त्याचे ऐकायला त्याच्याकडे येऊ लागले;
[२]आणि शास्त्री व परोशी हे कुरकुर करून म्हणू लागले, 'हा
पाप्यांना जवळ घेतो, आणि त्यांच्याबरोबर जेवतो.'
[३]आणि त्याने त्यांना हा दाखला सांगितला; तो
म्हणाला,
[४]"तुमच्यातला कोणता मनुष्य त्याच्याजवळ शंभर
मेंढरं असताना जर त्यांतलं एक हरवलं तर तो ती
नव्याण्णव रानात ठेवून ते हरवलेलं सापडेपर्यंत
त्याच्यामागं जात नाही? [५]आणि त्याला ते सापडताच तो
आनंदित होऊन त्याला खांद्यावर घेतो, [६]आणि तो घरी
आल्यावर मित्रांना आणि शेजाऱ्यांना एकत्र बोलावतो
आणि त्यांना म्हणतो, 'माझ्याबरोबर आनंद करा; कारण
जे माझं मेंढरू हरवलं होतं ते मला सापडलं आहे.'
[७]त्याचप्रमाणं, मी तुम्हाला सांगतो, पश्चात्तापाची गरज
नसलेल्या नव्याण्णव नीतिमान लोकांपेक्षा पश्चात्ताप
करणाऱ्या एका पाप्याकरता स्वर्गात अधिक आनंद होईल.
[८]"किंवा कोणती स्त्री, तिच्याजवळ चांदीच्या दहा
पुतळ्या असताना, त्यांतली एक पुतळी हरवली तर दिवा
पेटवून, घर झाडून ती सापडेपर्यंत काळजीपूर्वक शोधीत
नाही? [९]आणि तिला सापडल्यावर ती मैत्रिणींना आणि
शेजारणींना एकत्र बोलावते आणि म्हणते, 'माझ्याबरोबर
आनंद करा; कारण जी माझी पुतळी हरवली होती ती मला
सापडली आहे.' [१०]त्याचप्रमाणं, मी तुम्हाला सांगतो,
पश्चात्ताप करणाऱ्या एका पाप्याकरता देवाच्या दूतांसमोर
आनंद होतो."

[११]आणि तो म्हणाला,

"एका मनुष्याला दोन मुलगे होते; [१२]आणि त्यांच्यातला धाकटा बापाला म्हणाला, 'अब्बा, तुम्ही मला मालमत्तेचा, मला पडणारा वाटा द्या.' आणि त्यानं त्यांना आपली मिळकत वाटून दिली. [१३]मग फार दिवस गेले नाहीत तोच, धाकटा मुलगा सगळं गोळा करून एका दूरच्या प्रांतात गेला आणि तिथं उधळेपणानं जगण्यात त्यानं आपली मालमत्ता उडवली. [१४]आणि, त्यानं सर्व खर्च केल्यावर त्या प्रांतात मोठा दुष्काळ उद्भवला; आणि त्याला वाण पडू लागली. [१५]तेव्हा तो गेला आणि त्या प्रांतातल्या एका गावकऱ्याला बिलगला; आणि त्यानं त्याला आपल्या शेतात डुकरांना खाणं द्यायला धाडलं. [१६]तेव्हा डुकरं जी टरफलं खात ती खाऊन आपलं पोट भरावं अशी त्याला इच्छा होई. आणि कोणी त्याला देत नसे.

[१७]"मग तो शुद्धीवर येऊन म्हणाला, 'माझ्या अब्बांच्या किती मोलकऱ्यांना पुरून उरेल इतकी भाकर मिळते आणि मी भुकेनं मरत आहे; [१८]मी उठून माझ्या अब्बांच्याकडे जाईन आणि त्यांना म्हणेन, अब्बा, मी स्वर्गाविरुद्ध आणि तुमच्याविरुद्ध पाप केलं आहे; [१९]मी तुमचा मुलगा म्हटला जायला आता लायक नाही. तुमच्या एका मोलकऱ्याप्रमाणं मला ठेवा.' [२०]आणि तो उठून आपल्या बापाकडे आला. आणि तो दूर नव्हता इतक्यात त्याच्या बापानं त्याला बघितलं, आणि त्याला त्याचा कळवळा येऊन तो धावत गेला, त्याच्या गळ्यात पडला, आणि त्यानं त्याचे मुके घेतले. [२१]आणि मुलगा त्याला म्हणाला, 'अब्बा, मी स्वर्गाविरुद्ध आणि तुमच्याविरुद्ध पाप केलं आहे; मी तुमचा मुलगा म्हटला जायला आता लायक नाही.'

[२२]"पण बाप आपल्या दासांना म्हणाला, 'लवकर सगळ्यात चांगला झगा आणा, आणि ह्याला पेहरवा, त्याच्या हातात अंगठी आणि पायांत वहाणा घाला; [२३]आणि पोसलेलं वासरू आणून मारा. आपण भोजन करू आणि उत्सव करू. [२४]कारण, हा माझा मुलगा मेला होता, आणि पुन्हा जिवंत झाला आहे; हरवला होता आणि सापडला आहे.' आणि ते उत्सव करू लागले.

[२५]"आणि त्याचा वडील मुलगा शेतात होता; तो येत असता घराजवळ आला तेव्हा त्याला गाणं नाचणं ऐकू आलं. [२६]तेव्हा त्यानं एका दासाला बोलवून विचारलं, 'हे काय आहे?' [२७]आणि तो त्याला म्हणाला, 'आपला भाऊ आला आहे; आणि आपल्या अब्बांना तो सुखरूप मिळाला म्हणून त्यांनी पोसलेलं वासरू मारलं आहे.' [२८]पण तो रागावला आणि आत जायला तयार नव्हता. तेव्हा त्याचा बाप बाहेर आला आणि त्यानं त्याला विनंती केली. [२९]आणि त्यानं बापाला उत्तर देऊन म्हटलं, 'बघा, मी इतकी वर्षं तुमची सेवा केली, आणि कधीच तुमच्या आज्ञा मोडल्या नाहीत. पण मी माझ्या मित्रांबरोबर आनंद करावा म्हणून तुम्ही मला कधी एक करडू दिलं नाही. [३०]पण, ज्यानं वेश्यांबरोबर तुमची मिळकत खाऊन टाकली तो हा मुलगा येताच तुम्ही त्याच्यासाठी पोसलेलं वासरू मारलंत.'

[३१]"आणि तो त्याला म्हणाला, 'बाळ, तू नेहमीच माझ्याबरोबर आहेस आणि माझ्याजवळ जे सगळं आहे ते तुझं आहे. [३२]आपण उत्सव करून आनंद करावा हे योग्य होतं; कारण हा तुझा भाऊ मेला होता, आणि पुन्हा जिवंत झाला आहे; हरवला होता आणि सापडला आहे.' "

१६ आणि तो शिष्यांनाही म्हणाला, "एक धनवान मनुष्य होता, आणि त्याचा एक कारभारी होता; आणि हा आपला माल उडवतो असा आरोप त्याच्याविरुद्ध त्याच्याकडे करण्यात आला. [२]तेव्हा त्यानं त्याला बोलवून म्हटलं, 'मी तुझ्याविषयी ऐकतो हे काय आहे? तुझ्याकडच्या कारभाराचा हिशोब दे; कारण ह्यापुढं, तू कारभारी म्हणून राहणार नाहीस.' [३]तेव्हा कारभारी मनात म्हणाला, 'मी काय करू? कारण माझा धनी माझ्याकडून कारभार काढीत आहे; मला खणायला शक्ती नाही आणि भीक मागायला लाज वाटते. [४]मला कारभारावरून काढल्यावर त्यांनी मला आपल्या घरात घ्यावं म्हणून मी काय करावं ते मी जाणतो.'

[५]"मग, त्यानं आपल्या धन्याच्या देणेकऱ्यांतील एकेकाला आपल्याकडे बोलावलं. आणि तो पहिल्याला म्हणाला, 'माझ्या धन्याला तुम्ही किती देणं लागता?' [६]तो म्हणाला, 'शंभर मण तेल.' आणि तो त्याला म्हणाला, 'तुमचा लेख घ्या, लवकर बसा आणि पन्नास लिहा.' [७]मग तो दुसऱ्याला म्हणाला, 'तुम्हाला किती देणं आहे?' तो म्हणाला, 'शंभर खंडी गहू.' आणि तो म्हणाला, 'तुमचा लेख घ्या आणि ऐंशी लिहा.'

[८]"आणि अन्यायी कारभाऱ्यानं हे शहाणपण केलं म्हणून धन्यानं त्याची वाखाणणी केली; कारण ह्या युगाचे

पुत्र आपल्या पिढीच्या बाबतीत, प्रकाशाच्या पुत्रांपेक्षा शहाणे असतात.

९"आणि मी तुम्हाला सांगतो, तुम्ही अनीतिकारक धनानं आपल्यासाठी मित्र जोडा, म्हणजे ते नाहीसे होईल तेव्हा ते तुम्हाला सार्वकालिक वस्त्यांत घेतील.

१०"जो थोड्यावर विश्वासू असतो तो पुष्कळावरही विश्वासू असतो. जो थोड्यावर अन्यायी असतो तो पुष्कळावरही अन्यायी असतो. ११म्हणून तुम्ही जर अनीतिकारक धनाविषयी विश्वासू झाला नसाल तर जे खरं आहे ते तुमच्या विश्वासावर कोण सोपवील? १२आणि जे दुसऱ्याचं आहे त्याविषयी विश्वासू झाला नसाल तर जे तुमचं स्वतःचं आहे ते तुम्हाला कोण देईल?

१३"कोणीही नोकर दोन धन्यांची सेवा करू शकत नाही; कारण तो एकाचा द्वेष करील आणि दुसऱ्यावर प्रीती करील; किंवा एकाला बिलगून राहील आणि दुसऱ्याला तुच्छ मानील. तुम्ही देवाची आणि धनाची सेवा करू शकत नाही."

१४आणि, धनलोभी असलेले परोशी ह्या सर्व गोष्टी ऐकत होते व त्याचा उपहास करीत होते. १५आणि तो त्यांना म्हणाला,

"तुम्ही स्वतःला मनुष्यांपुढं नीतिमान ठरवणारे आहा; पण देव तुमची मनं जाणतो; कारण मनुष्यांपुढं जे उच्च आहे ते देवाच्या दृष्टीपुढं अमंगळ आहे.

१६"नियमशास्त्र आणि संदेष्टे हे योहानापर्यंत होते; तेव्हापासून देवाच्या राज्याची सुवार्ता सांगितली जात आहे, आणि प्रत्येक मनुष्य त्यात जायला लगट करीत आहे.

१७"नियमशास्त्राचा एक फाटा गळण्यापेक्षा आकाश आणि पृथ्वी नाहीशी होणं अधिक सोपं आहे.

१८"जो कोणी आपल्या बायकोला सोडतो आणि दुसरीशी लग्न करतो तो व्यभिचार करतो. आणि तिला नवऱ्यानं सोडलं आहे तिच्याशी जो लग्न करतो तो व्यभिचार करतो.

१९"एक धनवान मनुष्य होता; तो जांभळे आणि तलम तागाचे कपडे पेहरीत असे, आणि रोज ऐशआराम करीत असे. २०तिथं लाजर नावाचा, फोडांनी भरलेला कोणी भिकारी त्याच्या फाटकाशी पडलेला असे. २१आणि धनवानाच्या मेजावरून पडेल त्यावर पोट भरावं अशी त्याची इच्छा असे. शिवाय कुत्रे येऊन त्याचे फोड चाटीत. २२आणि असं झालं की, तो भिकारी मेला, आणि त्याला देवदूतांनी अब्राहामाच्या उराशी नेलं; तो धनवानही मेला आणि त्याला पुरलं. २३तो अधोलोकात यातनांत असताना त्यानं डोळे वर लावले आणि दूर अंतरावर तो अब्राहामाला आणि त्याच्या उराशी लाजराला पाहतो. २४तेव्हा तो ओरडून म्हणाला, 'अब्राहाम अब्बा, माझ्यावर दया करा; आणि लाजराला धाडा; म्हणजे त्यानं आपल्या बोटाचं टोक पाण्यात बुडवून माझी जीभ थंड करावी, कारण मला ह्या जाळात यातना होत आहेत.'

२५"पण अब्राहाम म्हणाला, 'मुला, तू आपल्या चांगल्या गोष्टी आपल्या आयुष्यात भरून पावलास, तसाच लाजर वाईट भरून पावला ह्याची आठवण कर; पण आता त्याचं सांत्वन झालं आहे. आणि तुला यातना होत आहेत. २६आणि, ह्याशिवाय, तुमच्या आणि आमच्या मध्यंतरी एक मोठी दरी स्थापलेली आहे; म्हणजे इकडून तुमच्याकडे जे जाऊ पाहतील त्यांना जाता येऊ नये, किंवा तिकडून आमच्याकडे येऊ पाहतील त्यांना येता येऊ नये.' २७तेव्हा तो म्हणाला, 'म्हणून अब्बा, मी तुम्हाला विनंती करतो, तुम्ही त्याला माझ्या बापाच्या घरी धाडा; २८कारण मला पाच भाऊ आहेत; आणि त्यानं त्यांना निक्षून साक्ष द्यावी; नाहीतर, ते पण ह्या यातनेच्या ठिकाणी येतील.' २९पण अब्राहाम म्हणतो, 'त्यांना मोशे आणि संदेष्टे आहेत; त्यांनी त्यांचं ऐकावं.' ३०तो म्हणाला, 'अब्राहाम अब्बा, असं नाही; पण मेलेल्यांतून कोणी त्यांच्याकडे गेला तर ते पश्चात्ताप करतील.' ३१आणि तो त्याला म्हणाला, 'ते मोशेचं आणि संदेष्ट्यांचं ऐकत नसतील, तर मेलेल्यांतून कोणी पुन्हा उठला तरी ते त्याचं मानणार नाहीत.' "

## १७

मग तो आपल्या शिष्यांना म्हणाला, "अडथळे येऊ नयेत हे अशक्य आहे. पण ज्याच्यामुळं ते येतात त्याला हळहळ! २त्यानं ह्या लहानांतल्या एकाला अडथळा करावा ह्यापेक्षा त्याच्या गळ्यात एक जात्याची तळी बांधून त्याला समुद्रात टाकलं तर ते त्याच्यासाठी अधिक बरं होईल. ३तुम्ही स्वतः संभाळा, तुझ्या भावानं जर तुझा अपराध केला तर त्याचा निषेध कर; आणि, त्यानं पश्चात्ताप केला तर त्याला क्षमा कर. ४आणि त्यानं दिवसात सात वेळा तुझा अपराध केला, आणि दिवसात सात वेळा तो तुझ्याकडे परत येऊन म्हणाला, 'मी पश्चात्ताप करतो', तर तू त्याला क्षमा कर."

[५]तेव्हा प्रेषित प्रभूला म्हणाले,

"आमचा विश्वास वाढवा."

[६]आणि प्रभू म्हणाला,

"तुमच्यात मोहरीच्या दाण्याएवढा विश्वास असेल तर तुम्ही ह्या तुतीला म्हणाल, 'तू समूळ उपटून नीघ आणि समुद्रात टाकली जा'; आणि ती तुमचं ऐकेल. [७]तुमच्यातला कोणता मनुष्य त्याचा दास नांगरीत किंवा मेंढरं राखीत असेल, तर तो शेतावरून आल्यावर त्याला म्हणेल की, 'आता जा आणि जेवायला बस'? [८]उलट त्याला म्हणणार नाही की, 'माझं भोजन तयार कर आणि कंबर बांध, आणि मी खात पीत आहे तोवर माझी सेवा कर, आणि मग तू खा आणि पी'? [९]त्यानं त्याला सांगितलेल्या गोष्टी केल्या म्हणून तो दासाचे उपकार मानतो काय? [१०]त्याचप्रमाणं तुम्ही तुम्हाला सांगण्यात आलेल्या सर्व गोष्टी कराल तेव्हा असं म्हणा की, 'आम्ही निरुपयोगी दास आहो; जे करणं आमचं कर्तव्य होतं ते आम्ही केलं.' "

[११]आणि असे झाले की, तो यरुशलेमला जात असता त्याने शोमरोन आणि गालील ह्या दोहोंमधून प्रवास केला. [१२]आणि तो एका खेड्यात जात असता तेथे त्याला दहा इसम भेटले. ते कुष्ठरोगी होते आणि दूर उभे राहिले होते. [१३]त्यांनी आपला आवाज चढवून म्हटले,

"येशू, स्वामी, आमच्यावर दया करा."

[१४]आणि त्याने त्यांना बघितले तेव्हा तो त्यांना म्हणाला,

"जा, आणि स्वतःला याजकांना दाखवा."

आणि असे झाले की, ते जात असता शुद्ध केले गेले. [१५]आणि आपण बरे झालोत हे त्यांच्यातल्या एकाने बघितले तेव्हा तो मोठ्या आवाजात देवाचे गौरव करीत परतला, [१६]आणि त्याचे उपकार मानीत तो त्याच्या पायांशी तोंडावर पडला. आणि तो शोमरोनी होता. [१७]तेव्हा येशूने उत्तर देऊन म्हटले,

"दहा शुद्ध केले गेले ना? मग नऊ कुठं आहेत? [१८]ह्या एका शोमरोन्याशिवाय देवाला गौरव द्यायला परतलेले, दुसरे कोणी आढळले नाहीत काय?"

[१९]आणि तो त्याला म्हणाला,

"ऊठ, तुझ्या मार्गानं जा, तुझ्या विश्वासानं तुला बरं केलं आहे."

[२०]आणि देवाचे राज्य कधी येईल असे परोश्यांनी विचारले असता त्याने त्यांना उत्तर देऊन म्हटले,

"देवाचं राज्य निरीक्षणात येणार नाही; [२१]आणि 'इथं बघा', किंवा 'तिथं बघा' असंदेखील ते म्हणणार नाहीत; कारण बघा, देवाचं राज्य तुमच्यात आहे."

[२२]आणि तो आपल्या शिष्यांना म्हणाला,

"असे दिवस येतील की, तुम्ही तेव्हा मनुष्याच्या पुत्राच्या दिवसांतला एक दिवस आपण बघावा अशी इच्छा कराल, पण तुम्ही पाहणार नाही; [२३]आणि ते तुम्हाला म्हणतील, 'इकडे बघा', 'तिकडे बघा', तेव्हा जाऊ नका आणि त्यांच्यामागं लागू नका. [२४]कारण आकाशाखालच्या एका बाजूस चमकणारी वीज जशी आकाशाखालच्या दुसऱ्या बाजूपर्यंत प्रकाशते तसा मनुष्याचा पुत्रही त्याच्या दिवशी येईल. [२५]पण प्रथम त्यानं पुष्कळ सोसावं आणि ह्या पिढीकडून नाकारलं जावं हे अगत्य आहे. [२६]आणि नोहाच्या दिवसांत जसं झालं तसं मनुष्याच्या पुत्राच्या दिवसांत होईल. [२७]नोहा तारवात गेला त्या दिवसापर्यंत ते खात होते, पीत होते, लग्न करीत होते आणि लग्न करून देत होते; आणि महापूर आला आणि त्यानं सर्वांना नष्ट केलं. [२८]तसंच लोटाच्या दिवसांत झाल्याप्रमाणं होईल. ते खात होते, पीत होते, विकत घेत होते, विकीत होते, पेरीत होते आणि बांधीत होते. [२९]पण लोट सदोमातून बाहेर निघाला त्याच दिवशी अग्नी आणि गंधक ह्यांचा आकाशातून वर्षाव झाला आणि त्यानं सर्वांना नष्ट केलं. [३०]त्याचप्रमाणं मनुष्याचा पुत्र प्रकट होईल त्या दिवशी होईल. [३१]त्या दिवशी जो धाब्यावर असेल आणि त्याचं सामान घरात असेल, त्यानं ते घ्यायला खाली येऊ नये. त्याचप्रमाणं जो शेतात असेल त्यानं परत जाऊ नये. [३२]लोटाच्या बायकोची आठवण करा. [३३]जो आपला जीव वाचवू पाहील तो आपल्या जिवाला मुकेल; आणि जो आपल्या जिवाला मुकेल तो आपला जीव वाचवील. [३४]आणि मी तुम्हाला सांगतो, त्या रात्री दोघे एका खाटल्यावर असतील; एक घेतला जाईल, आणि दुसरा ठेवला जाईल. [३५]दोघी एकत्र दळीत असतील; एक घेतली जाईल आणि दुसरी ठेवली जाईल."

[३६-३७]आणि त्यांनी त्याला उत्तर देऊन म्हटले,

"कुठं, प्रभू?"

आणि तो त्यांना म्हणाला,

"जिथं मढं तिथं गिधाडं जमतील."

१८ आणि त्यांनी नित्य प्रार्थना करावी व
खचू नये म्हणून त्याने त्यांना एक दाखला
सांगितला; २ तो म्हणाला,
"एका नगरात एक न्यायाधीश होता. तो देवाला भीत
नसे आणि माणसाची भीड धरीत नसे. ३ आणि त्या नगरात
एक विधवा होती. ती त्याच्याकडे जाई आणि म्हणे, 'मला
माझ्या वादीविरुद्ध न्याय द्या.' ४ तो काही काळ तयार
होईना. पण मग तो आपल्या मनात म्हणाला, 'मी देवाला
भीत नसलो आणि माणसाची भीड धरीत नसलो, ५ तरी ही
विधवा मला त्रास देते म्हणून मी हिला न्याय देईन;
नाहीतर, हिच्या सतत येण्यानं ही मला त्रास देईल.' "
६ तेव्हा प्रभू म्हणाला,
"अन्यायी न्यायाधीश काय म्हणतो ऐका. ७ मग देव
जे त्याचे निवडलेले अहोरात्र त्याचा धावा करतात त्यांना
न्याय देणार नाही काय? आणि त्यांच्या बाबतीत विलंब
लावील काय? ८ मी तुम्हाला सांगतो, तो लवकर त्यांना
न्याय देईल. पण मनुष्याचा पुत्र येईल तेव्हा त्याला
पृथ्वीवर विश्वास आढळेल काय?"

९ आणि आपण नीतिमान आहोत असे जे लोक
स्वतःला मानीत, आणि दुसऱ्यांचा उपहास करीत त्यांना
त्याने एक दाखला सांगितला,
१० "दोन इसम प्रार्थना करायला मंदिरात वर गेले; एक
परोशी होता आणि दुसरा जकातदार. ११ परोशी उभा
राहिला, आणि त्यानं आपल्या मनात अशी प्रार्थना केली,
'हे देवा, मी तुझे उपकार मानतो, कारण जसे दुसरे लोक
लुबाडणारे, अनीतिमान आणि व्यभिचारी आहेत तसा मी
नाही, किंवा ह्या जकातदारासारखाही नाही. १२ मी
आठवड्यात दोनदा उपास करतो, आणि मला मिळतं त्या
सर्वाचा दशमांश देतो.' १३ आणि जकातदार दूर उभा
राहिला. तो आपले डोळेही आकाशाकडे वर लावायला
धजला नाही; पण तो आपला ऊर बडवीत राहिला आणि
म्हणाला, 'हे देवा, मज पाप्यावर दया कर.' १४ मी तुम्हाला
सांगतो, हा मनुष्य त्या दुसऱ्यापेक्षा नीतिमान ठरून, खाली
आपल्या घरी गेला. कारण जो कोणी स्वतःला मोठा
करतो तो लहान केला जाईल आणि जो कोणी स्वतःला
लहान करतो तो मोठा केला जाईल."

१५ आणि लोक त्याच्याकडे आपल्या तान्ह्या
मुलांनाही त्याने त्यांना हात लावावा म्हणून घेऊन आले.
पण शिष्यांनी हे बघितले तेव्हा त्यांनी त्यांना दटावले.
१६ पण येशूने त्यांना आपल्याकडे बोलवून म्हटले,
"बालकांना माझ्याकडे येऊ द्या, त्यांना मना करू
नका; कारण देवाचं राज्य अशांचं आहे. १७ मी तुम्हाला
सत्य सांगतो, जो कोणी बालकासारखा होऊन देवाचं
राज्य स्वीकारणार नाही तो त्यात प्रवेश करणार नाही."

१८ आणि एका अधिकाऱ्याने त्याला प्रश्न करून
म्हटले,
"उत्तम गुरू, मी सनातन जीवन हे वतन मिळवायला
काय करू?"
१९ तेव्हा येशू त्याला म्हणाला,
"मला उत्तम का म्हणतोस? एका देवाशिवाय कोणी
उत्तम नाही. २० तू आज्ञा जाणतोस; 'व्यभिचार करू नको,
खून करू नको, चोरी करू नको, खोटी साक्ष देऊ नको
आणि तू आपल्या बापाला आणि आईला मान दे.' "
२१ आणि तो म्हणाला,
"मी ह्या सगळ्या लहानपणापासून पाळल्या आहेत."
२२ आणि येशूने हे ऐकले तेव्हा तो त्याला म्हणाला,
"तुझ्यात एक गोष्ट अजून कमी आहे. तुझ्याजवळ जे
आहे ते सगळं वीक, आणि गरिबांना वाटून दे, आणि
स्वर्गात तुला धन मिळेल; चल, माझ्यामागं ये."
२३ पण त्याने हे ऐकले तेव्हा तो फार दुःखित झाला; कारण
तो फार धनवान होता. २४ येशूने त्याच्याकडे बघून म्हटले,
"ज्यांच्याजवळ संपत्ती आहे त्यांना देवाच्या राज्यात
प्रवेश करणं किती कठिण आहे? २५ कारण धनवान
मनुष्याला देवाच्या राज्यात प्रवेश करण्यापेक्षा उंटाला
सुईच्या नाकातून जाणं सोपं आहे."
२६ तेव्हा ऐकणारे म्हणू लागले,
"मग कोण तारला जाईल?"
२७ पण तो म्हणाला,
"ज्या गोष्टी मनुष्याला अशक्य आहेत त्या देवाला
शक्य आहेत."
२८ आणि पेत्र म्हणाला,
"पहा, आम्ही सगळं सोडलं आणि तुझ्यामागं
आलो."
२९ आणि तो त्यांना म्हणाला,
"मी तुम्हाला सत्य सांगतो, कोणी देवाच्या
राज्याकरता घर, किंवा बायको, किंवा भाऊ, किंवा
आईबाप, किंवा मुलं सोडणारा असा नाही की, ३० त्याला

ह्या काळात अधिकपट, आणि येणाऱ्या युगात सनातन
जीवन मिळाल्याशिवाय राहणार नाही."

३१**आणि त्याने बारा जणांना** आपल्याजवळ घेतले
व त्यांना म्हटले,

"बघा, आपण यरुशलेमला वर जात आहो; आणि
संदेष्ट्यांनी मनुष्याच्या पुत्राविषयी लिहिलेल्या सर्व गोष्टी
पूर्ण होतील. ३२कारण, त्याला परजनांच्या हाती देण्यात
येईल; त्याची चेष्टा केली जाईल आणि हेलना केली
जाईल, आणि ते त्याच्यावर थुंकतील; ३३ते त्याला फटके
मारतील आणि ठार मारतील. आणि तो तिसऱ्या दिवशी
पुन्हा उठेल."

३४पण त्यांना ह्यातली कोणतीही गोष्ट समजली नाही; हे
वचन त्यांच्यापासून गुप्त ठेवले गेले, आणि त्यांना
सांगण्यात आलेल्या गोष्टी समजल्या नाहीत.

३५**आणि असे झाले की,** तो यरिहोजवळ आला
तेव्हा एक अंधळा बाहेरच्या रस्त्याच्या कडेला बसला
होता. ३६आणि लोकांचा घोळका जवळून जात असताना
त्याने ऐकले; तेव्हा हे काय आहे असे त्याने विचारले.
३७ते त्याला म्हणाले,

"नासोरी येशू जात आहे."

३८तेव्हा तो ओरडून म्हणाला,

"अहो दावीदपुत्र येशू, माझ्यावर दया करा."

३९तेव्हा त्याने गप्प रहावे म्हणून पुढे जाणाऱ्यांनी त्याला
दटावले. पण तो आणखी अधिक ओरडून म्हणाला,

"अहो दावीदपुत्र, माझ्यावर दया करा."

४०तेव्हा येशू उभा राहिला व त्याने त्याला आपल्याकडे
आणण्याची आज्ञा दिली. आणि तो जवळ आला तेव्हा
त्याने त्याला विचारले,

४१"तुझ्यासाठी मी काय करावं अशी तुझी इच्छा
आहे?"

४२आणि तो म्हणाला,

"प्रभू, मला दृष्टी यावी."

तेव्हा येशू त्याला म्हणाला,

"तुला दृष्टी येवो. तुझ्या विश्वासानं तुला बरं केलं
आहे."

४३आणि लगेच त्याला दृष्टी आली व तो देवाचे गौरव
करीत त्याच्या मागोमाग गेला. आणि सर्व लोकांनी ते
बघून देवाला धन्यवाद दिला.

# १९

**आणि तो यरिहोत आला** व पुढे जात
होता; २आणि बघा, जक्कय नावाचा एक
मनुष्य तेथे होता. तो एक प्रमुख जकातदार असून धनवान
होता. ३आणि येशू हा कोण आहे हे बघावे ही त्याची
इच्छा होती. पण त्याला ते गर्दीमुळे शक्य होईना, कारण
तो बांध्याने ठेंगणा होता. ४आणि तो त्याला बघायला
धावत पुढे जाऊन एका उंबराच्या झाडावर चढला. कारण
तो त्या वाटेने जाणार होता. ५आणि, येशू त्या ठिकाणी
आला, तेव्हा त्याने वर पाहिले आणि तो त्याला म्हणाला,

"जक्कय, घाई कर आणि खाली उतर, कारण मला
आज तुझ्या घरी राहिलं पाहिजे."

६तेव्हा त्याने घाई केली, तो खाली आला आणि आनंदित
होऊन त्याने त्याला बरोबर घेतले. ७हे बघून सगळ्यांनी
कुरकुर करीत म्हटले,

"हा पापी माणसाकडे उतरायला गेला."

८तेव्हा जक्कय उभा राहिला व प्रभूला म्हणाला,

"बघा, प्रभू, मी माझी अर्धी मालमत्ता गरिबांना देतो
आणि मी कुणाकडून काही अन्यायानं घेतलं असेल तर ते
चौपट परत देतो."

९तेव्हा येशू त्याला म्हणाला,

"आज ह्या घराला तारण प्राप्त झालं आहे. कारण
हापण अब्राहामाचा पुत्र आहे. १०कारण मनुष्याचा पुत्र
हरवलेल्यास शोधायला आणि तारायला आला आहे."

११**आणि, ते हे ऐकत असता** तो आणखी बोलला
आणि त्याने एक दाखला सांगितला, कारण तो
यरुशलेमला जात होता, आणि देवाचे राज्य आताच प्रगट
होणार आहे असे त्यांना वाटत होते. १२म्हणून तो
म्हणाला,

"एक उमराव आपलं राज्य घ्यावं आणि परत यावं
म्हणून दूरदेशी गेला, १३तेव्हा त्यानं आपल्या दहा दासांना
बोलवून त्यांना दहा मिना दिल्या; आणि त्यांना म्हटलं,
'मी येईपर्यंत व्यापार करा.' १४पण त्याचे गावकरी त्याचा
द्वेष करीत असत, आणि त्यांनी त्याच्या मागोमाग
वकिलांना पाठवून निरोप केला की, 'ह्यानं आमच्यावर
राज्य करावं अशी आमची इच्छा नाही.' १५आणि असं
झालं की, त्याला राज्य मिळाल्यावर तो जेव्हा परत आला
तेव्हा त्यानं ज्या दासांना पैसा दिला होता, त्यांनी व्यापार
करून काय मिळवलं हे समजावं म्हणून त्यानं त्यांना
आपल्याकडे बोलवायची आज्ञा दिली. १६तेव्हा पहिला

येऊन म्हणाला, 'धनी, आपल्या मिनेनं दहा मिना
मिळवल्यात.' १७आणि तो त्याला म्हणाला, 'छान केलंस,
भल्या दासा, तू फार थोड्यावर विश्वासू झालास म्हणून
दहा नगरांवर अधिकार घे.' १८आणि दुसरा येऊन
म्हणाला, 'धनी, आपल्या मिनेनं पाच मिना मिळवल्यात.'
१९आणि तो त्याचप्रमाणं त्याला म्हणाला, 'तूपण पाच
नगरांवर हो.' २०मग दुसरा एक येऊन म्हणाला, 'धनी,
बघा, आपली मिना माझ्याजवळ फडक्यात ठेवलेली
आहे. २१कारण मी आपल्याला ओळखीत होतो; कारण
आपण करडे माणूस आहा; आपण ठेवलं नाही ते उचलता
आणि पेरलं नाही ते कापता.' २२आणि तो त्याला
म्हणाला, 'अरे दुष्ट दासा, मी तुझ्याच तोंडून तुझा न्याय
करतो; मी करडा माणूस आहे, मी ठेवलं नाही ते उचलतो,
आणि पेरलं नाही ते कापतो, हे तू जाणतोस. २३तर तू माझा
पैसा पेढीवर का ठेवला नाहीस? म्हणजे मी आल्यावर मी
तो व्याजासकट घेतला असता.' २४तेव्हा जे जवळ उभे
होते त्यांना तो म्हणाला, 'ह्याच्याजवळून ती मिना घ्या,
आणि ज्याच्याजवळ दहा मिना आहेत त्याला द्या.'
(२५तेव्हा ते त्याला म्हणाले, 'धनी, त्याच्याजवळ दहा
मिना आहेत.') २६'कारण, मी तुम्हाला सांगतो, ज्या
कोणाजवळ आहे त्याला दिलं जाईल; पण ज्याच्याजवळ
नाही, त्याच्याकडून काढून घेतलं जाईल. २७आणि जे
माझे वैरी मी त्यांच्यावर राज्य करावं असं इच्छीत नव्हते
त्यांना इकडे आणा, आणि माझ्यासमोर ठार मारा.' "

२८आणि तो हे बोलल्यावर यरुशलेमकडे वर जाताना
तो पुढे गेला. २९आणि असे झाले की, ज्याला जैतुनांचा
डोंगर म्हणतात त्या डोंगरापाशी, बेथफगेच्या व
बेथानीच्या जवळ तो आला तेव्हा त्याने शिष्यांतील
दोघांना पाठवले. ३०आणि त्यांना म्हटले,

"तुमच्या समोरच्या खेड्यात जा; आणि तिथं तुम्ही
आत जाताना तुम्हाला एक बांधलेलं शिंगरू आढळेल.
कोणी मनुष्य त्यावर कधी बसलेला नाही; त्याला सोडून
घेऊन या. ३१आणि कोणी तुम्हाला विचारील, 'ह्याला का
सोडता?' तर तुम्ही म्हणा, 'प्रभूला त्याची गरज आहे.' "
३२तेव्हा ज्यांना पाठविले होते ते गेले, आणि त्याने त्यांना
सांगितले होते तसे त्यांना आढळले. ३३आणि ते शिंगराला
सोडीत असता त्याचे मालक त्यांना म्हणाले,

"तुम्ही शिंगराला का सोडता?"

३४आणि ते म्हणाले,

"प्रभूला त्याची गरज आहे."

३५आणि त्यांनी ते येशूकडे आणले; त्यांनी शिंगरावर
आपली वस्त्रे घातली आणि येशूला त्यावर बसवले.
३६आणि तो जात असता त्यांनी आपली वस्त्रे वाटेवर
पसरली. ३७आणि तो आता जवळ, जैतुनांच्या डोंगराच्या
उतरणीजवळ येत असता त्याच्या शिष्यांचा सर्व समुदाय
त्यांनी जे चमत्कार बघितले होते त्या सर्वांमुळे आनंदित
होऊन, मोठ्या आवाजात देवाचे स्तवन करू लागला.
३८आणि ते म्हणत होते,

"प्रभूच्या नावानं येणारा राजा धन्य!

"स्वर्गात शांती आणि ऊर्ध्वलोकी गौरव!"

३९तेव्हा लोकांच्या घोळक्यातले काही परोशी त्याला
म्हणाले,

"गुरू, आपल्या शिष्यांना आज्ञा करा."

४०पण त्याने त्यांना उत्तर देऊन म्हटले,

"मी तुम्हाला सांगतो, हे जर गप्प राहिले तर दगड
ओरडतील."

४१मग तो जेव्हा जवळ आला आणि त्याने ते नगर
बघितले, तेव्हा तो त्याकरता रडून ४२म्हणाला,

"तू, हो तू, ह्या तुझ्या दिवशी तुझ्या शांतीच्या गोष्टी
जर ओळखल्या असत्यास! पण त्या तुझ्या डोळ्यांपुढून
आता लपल्या आहेत. ४३कारण तुझ्यावर असे दिवस
येतील की, तुझे वैरी तुझ्या सभोवती मेढेकोट उभारतील,
तुला घेरतील आणि प्रत्येक बाजूस तुला अडवतील. ४४ते
तुला आणि तुझ्यात असलेल्या तुझ्या मुलांना धुळीस
मिळवतील, ते तुझ्यात दगडावर दगड सोडणार नाहीत.
कारण तुझ्या भेटीची वेळ तू ओळखली नाहीस."

४५**आणि तो मंदिरात गेला,** आणि जे कोणी विकीत
होते त्यांना तो बाहेर काढू लागला, ४६आणि त्यांना
म्हणाला,

" 'माझं घर प्रार्थनेचं घर होईल' असं लिहिलं आहे;
पण तुम्ही त्याची लुटारूंची गुहा केलीत."

४७आणि तो मंदिरात प्रत्येक दिवशी शिकवीत
राहिला; पण वरिष्ठ याजक, शास्त्री आणि लोकांचे प्रमुख
त्याला नष्ट करायला टपले होते. ४८तरी त्यांना काय करता
येईल ते सुचले नाही, कारण त्याचे ऐकायला सर्व लोक
त्याला बिलगून असत.

२० आणि त्या दिवसांत एकदा असे झाले
की, तो मंदिरात लोकांना शिकवीत असता व
सुवार्ता सांगत असता तेथे वरिष्ठ याजक व शास्त्री हे
वडिलांबरोबर त्याच्याकडे आले, २आणि ते त्याच्याशी
बोलून म्हणाले,
"आम्हाला सांग, तू कोणत्या अधिकारानं ह्या गोष्टी
करतोस? किंवा तुला हा अधिकार देणारा कोण आहे?"
३आणि त्याने त्यांना उत्तर देऊन म्हटले,
"मीपण तुम्हाला एक गोष्ट विचारतो; आणि तुम्ही
मला सांगा, ४योहानाचा बाप्तिस्मा हा स्वर्गाकडून होता
की, मनुष्यांकडून?"
५तेव्हा ते आपआपल्यात वाद करू लागले व म्हणाले,
आपण म्हटलं, 'स्वर्गाकडून', तर तो म्हणेल, 'तुम्ही
त्याच्यावर विश्वास का ठेवला नाही?' ६पण आपण
म्हटलं, 'मनुष्यांकडून', तर सर्व लोक आपल्याला
दगडमार करतील. कारण ते मानतात की, योहान संदेष्टा
होता. ७आणि त्यांनी उत्तर दिले की, तो कोणाकडून होता
हे त्यांना माहीत नव्हते. ८तेव्हा येशू त्यांना म्हणाला,
"आणि मी ह्या गोष्टी कोणत्या अधिकारानं करतो ते
मीपण तुम्हाला सांगत नाही."

९आणि तो लोकांना हा दाखला सांगू लागला,
"एका मनुष्यानं एक द्राक्षमळा लावला, आणि
माळ्यांकडे सोपून दिला; आणि तो दीर्घकाळ दूरदेशी
गेला. १०आणि हंगामात माळ्यांनी आपल्याला
द्राक्षमळ्याच्या फळांतून द्यावं म्हणून त्यानं माळ्यांकडे
एका दासाला धाडलं. पण त्या माळ्यांनी त्याला पिटलं
आणि रिकामं पाठवून दिलं. ११तेव्हा त्यानं पुन्हा दुसऱ्या
दासाला झाडलं. आणि त्यांनी त्यालापण पिटलं, त्याची
हेटाळणी केली, आणि त्याला रिकामं पाठवून दिलं.
१२तेव्हा त्यानं पुन्हा तिसऱ्या दासाला धाडलं; त्यांनी
त्यालापण जखमी केलं आणि बाहेर घालवलं. १३तेव्हा
द्राक्षमळ्याचा धनी म्हणाला, 'मी काय करू? मी माझ्या
प्रिय पुत्राला धाडतो; ते त्याला कदाचित् मान देतील.'
१४पण त्या माळ्यांनी त्याला बघितलं तेव्हा ते एकमेकांत
वाद करीत म्हणाले, 'हा वारीस आहे; आपण त्याला ठार
मारू, आणि हे वतन आपलं होईल.' १५आणि त्यांनी
त्याला द्राक्षमळ्यातून बाहेर काढलं. तर द्राक्षमळ्याचा धनी
त्यांना काय करील? १६तो येईल आणि त्या माळ्यांना नष्ट
करील, आणि द्राक्षमळा दुसऱ्यांना देईल."
आणि त्यांनी हे ऐकले तेव्हा ते म्हणाले,
"तसं न होवो."
१७पण त्याने त्यांच्याकडे न्याहाळून पहात म्हटले,
"मग हे जे लिहिलं आहे ते काय आहे?
'बांधणाऱ्यांनी जो दगड नाकारला
तोच कोपऱ्याचा मुख्य चिरा झाला आहे.'
१८जो कोणी त्या दगडावर पडेल त्याचे तुकडे होतील, पण
तो ज्या कोणावर पडेल त्याचा भुगा उडवील."
१९आणि त्याच घटकेस शास्त्री आणि वरिष्ठ याजक
त्याच्यावर हात टाकायला पहात असता ते लोकांना
भ्याले; कारण त्याने हा दाखला त्यांच्याविरुद्ध सांगितला
होता हे त्यांनी ओळखले.
२०मग त्यांनी त्याच्यावर पाळत ठेवली व आपल्या
हेरांना पुढे पाठवले, म्हणजे त्यांनी आपण नीतिमान आहो
असा बहाणा करून त्याला सुभेदाराच्या सत्तेखाली व
अधिकाराखाली धरून द्यायला त्याला बोलण्यात धरावे,
२१आणि त्यांनी त्याला प्रश्न करून म्हटले,
"गुरू, आम्हाला माहीत आहे की, आपण बरोबर
बोलता आणि शिकवता, आपण बाह्यरूप लक्षात घेत
नाही, पण देवाचा मार्ग खरेपणानं शिकवता. २२आम्ही
कैसराला कर देणं योग्य आहे की नाही?"
२३पण त्याने त्यांचे कपट ओळखून त्यांना म्हटले,
२४"मला एक दिनार दाखवा, ह्यावर हा मुखवटा
आणि वरचा लेख कुणाचा आहे?"
ते म्हणाले,
"कैसराचा."
२५आणि तो त्यांना म्हणाला,
"मग कैसराचं आहे ते कैसराला द्या आणि देवाचं
आहे ते देवाला द्या."
२६आणि त्यांना लोकांपुढे त्याला ह्या बोलण्यात धरता
येईना, तेव्हा त्यांनी त्याच्या उत्तराचे आश्चर्य केले आणि
ते गप्प राहिले.
२७त्यानंतर, जे पुनरुत्थान नाही असे म्हणतात त्या
सदोक्यांपैकी कित्येक जण त्याच्याकडे आले, आणि
त्यांनी त्याला प्रश्न करून २८म्हटले,
"गुरू, मोशेनं आमच्यासाठी लिहिलं आहे की, जर
एखाद्या मनुष्याचा भाऊ त्याला बायको असताना
विनापत्य मेला, तर त्याच्या भावानं त्याची बायको घ्यावी
आणि आपल्या भावासाठी संतान उभं करावं. २९आणि
म्हणून सात भाऊ होते; पहिल्यानं बायको आणली आणि

तो विनापत्य मेला; ३०आणि दुसऱ्यानं ३१आणि तिसऱ्यानं
तिला घेतलं; आणि त्याचप्रमाणं त्या सातांनीही, मूलबाळ
मागं ठेवलं नाही. आणि ते मेले. ३२नंतर ती बाईपण मेली.
३३तर ती पुनरुत्थानात त्यांच्यातल्या कोणाची बायको
होईल? कारण ती त्या सातांची बायको होती."

३४आणि येशू त्यांना म्हणाला,

"जे ह्या युगाचे पुत्र आहेत ते लग्न करतात आणि लग्न
करून देतात. ३५पण ते युग आणि मेलेल्यांतून पुनरुत्थान
हे प्राप्त व्हायला जे लायक गणले जातील ते लग्न करीत
नाहीत किंवा लग्न करून देत नाहीत. ३६आणि त्यानंतर ते
मरू शकत नाहीत, कारण ते देवदूतांसारखे होतात. आणि
पुनरुत्थानाचे पुत्र असल्यामुळे ते देवाचेही पुत्र होतात.
३७आता, मेलेले उठवले जातात हे मोशेनंपण झुडपाच्या
प्रकरणात, तो जिथं परमेश्वराला 'अब्राहामाचा देव,
इसहाकाचा देव आणि याकोबाचा देव' असं संबोधतो
तिथं दर्शवलं आहे. ३८कारण तो मृतांचा देव नाही, तर
जिवंतांचा आहे; कारण त्याला सर्व जिवंत आहेत."

३९तेव्हा शास्त्र्यांतील कित्येक जणांनी त्याला
उत्तर देऊन म्हटले,

"गुरू, आपण बरोबर बोललात."

४०कारण ते त्याला पुन्हा आणखी प्रश्न करायला धजले
नाहीत.

४१आणि तो त्यांना म्हणाला,

"ख्रिस्त दाविदाचा पुत्र आहे असं ते कसं म्हणतात?
४२-४३कारण दावीद स्वतः स्तोत्रांच्या पुस्तकात म्हणतो,

'परमेश्वर माझ्या प्रभूला म्हणाला,
मी तुझे वैरी तुझे पदासन करीपर्यंत,
तू माझ्या उजवीकडे बस.'

४४म्हणून दावीद त्याला प्रभू म्हणतो, आणि तो त्याचा पुत्र
कसा?"

४५आणि सर्व लोक ऐकत असता तो आपल्या
शिष्यांना म्हणाला,

४६"तुम्ही शास्त्र्यांपासून जपा; त्यांना पायघोळ
झग्यांत मिरवणं आवडतं; त्यांना बाजारांत मुजरे घेणं,
सभास्थानांत पुढच्या जागा आणि जेवणावळींत वरच्या
जागा घेणं आवडतं. ४७ते विधवांची घरं खाऊन टाकतात,
आणि बहाण्यासाठी लांब प्रार्थना करतात. त्यांना अधिक
दोष मिळेल."

२१ आणि त्याने वर पाहून भांडारात जे
आपली दाने टाकीत होते त्यांना बघितले; ते
धनवान होते. २आणि त्याने एका गरजू विधवेला दोन
टोल्या टाकताना बघितले. ३आणि तो म्हणाला,

"मी तुम्हाला खरोखर सांगतो, त्या सर्वांपेक्षा ह्या दीन
विधवेनं अधिक टाकलं; ४कारण ह्या सगळ्यांनी त्यांना
अधिक असलेल्यातून दानात टाकलं; पण हिनं तिला कमी
असलेल्यातून तिच्याजवळ असलेली तिची सगळी
उपजीविका टाकली."

५आणि जेव्हा कोणी मंदिराविषयी बोलले की, ते
कसे सुंदर दगडांनी आणि देणग्यांनी सुशोभित केलेले होते,
तेव्हा तो म्हणाला,

६"तुम्ही पाहता त्या ह्या गोष्टींवर असे दिवस येतील
की, तेव्हा पाडला जाणार नाही, असा दगडावर दगड इथं
राहू देणार नाहीत."

७तेव्हा त्यांनी त्याला प्रश्न करून म्हटले,

"गुरू, तर ह्या गोष्टी केव्हा होतील? आणि ह्या गोष्टी
होणार असतील तेव्हा चिन्ह काय होईल?"

८आणि तो म्हणाला,

"तुम्ही फसू नये म्हणून जपा; कारण माझ्या नावानं
पुष्कळ जण येतील आणि म्हणतील, 'मी तो आहे', आणि
'वेळ जवळ येत आहे'; त्यांच्यामागं जाऊ नका. ९आणि
तुम्ही लढायांविषयी आणि दंगलींविषयी ऐकाल तेव्हा
तुम्ही घाबरू नका; कारण ह्या गोष्टी प्रथम झाल्या
पाहिजेत; पण लगेच शेवट नाही."

१०पुढे तो त्यांना म्हणाला,

"राष्ट्र राष्ट्रावर आणि राज्य राज्यावर उठेल, ११आणि
मोठे भूकंप होतील; जागजागी दुष्काळ आणि साथी
उद्भवतील, उत्पात होतील आणि आकाशातून मोठी चिन्हं
होतील.

१२"पण ह्या सगळ्या गोष्टींअगोदर ते तुमच्यावर हात
टाकतील आणि तुमचा पाठलाग करतील; ते तुम्हाला
सभास्थानांच्या आणि बंदिशाळांच्या स्वाधीन करतील;
आणि, तुम्ही माझ्या नावाकरता राजांपुढं आणि
अधिकाऱ्यांपुढं आणले जाल. १३हे तुमच्या साक्षीसाठी

होईल. [१४]म्हणून कसं उत्तर द्यावं ह्याचा आधी विचार करायचा नाही, हे तुमच्या मनात ठसवा. [१५]कारण मी तुम्हाला तोंड आणि ज्ञानीपण देईन. आणि तुमच्या सर्व विरोधकांना त्याविरुद्ध उठणं किंवा बोलणं शक्य होणार नाही. [१६]आणि आईबाप, भाऊ, नातलग आणि मित्र हेदेखील तुम्हाला धरून देतील, ते तुमच्यातल्या काही जणांना मरणाची शिक्षा देतील; [१७]आणि सगळे माझ्या नावाकरता तुमचा द्वेष करतील. [१८]पण तुमच्या डोक्याचा एक केसदेखील नष्ट होणार नाही. [१९]तुम्ही आपल्या धीरानं आपले जीव मिळवाल.

[२०]"पण यरुशलेमला सैन्यांनी वेढलेलं बघाल तेव्हा तुम्ही हे जाणा की, त्याची ओसाडी जवळ आहे. [२१]त्यावेळी जे यहुदियात असतील त्यांनी डोंगरांत पळून जावं; जे नगरात असतील त्यांनी बाहेर निघावं आणि शिवारात असतील त्यांनी आत येऊ नये. [२२]कारण ज्या गोष्टी लिहिल्या आहेत त्या सर्व पूर्ण व्हाव्यात म्हणून हे सूड घेण्याचे दिवस आहेत. [२३]पण त्या दिवसांत ज्या गरोदर असतील आणि ज्या अंगावर पाजीत असतील त्यांना हळहळ! कारण, देशावर मोठी आपत्ती, आणि ह्या लोकांवर क्रोध ओढवेल. [२४]ते तरवारीच्या धारेनं पडतील, आणि बंदिवान केले जाऊन सर्व राष्ट्रांत नेले जातील; आणि परजनांचे काळ पूर्ण होईपर्यंत यरुशलेम परजनांकडून तुडवलं जाईल.

[२५]"तेव्हा सूर्यावर, चंद्रावर, आणि ताऱ्यांवर चिन्हं होतील, पृथ्वीवर समुद्राच्या गर्जनेमुळं आणि लाटांमुळं राष्ट्रांची संभ्रमात तळमळ होईल. [२६]लोक भीतीनं, आणि जगावर येणाऱ्या गोष्टींच्या अपेक्षेनं घाबरे होतील. कारण आकाशातील शक्ती थरथरतील. [२७]आणि मग ते मनुष्याच्या पुत्राला एका ढगात, पराक्रमानं, आणि मोठ्या गौरवानं येताना पाहतील. [२८]आणि ह्या गोष्टी होऊ लागतील तेव्हा उठा, आणि आपली डोकी वर उचला; कारण तुमची मुक्ती जवळ येत आहे."

[२९]आणि त्याने त्यांना एक दाखला सांगितला,

"अंजिराचं झाड बघा, आणि सगळी झाडं बघा. [३०]आता त्यांना पालवी फुटते. तेव्हा तुम्ही ते पाहता आणि तुम्ही स्वतः जाणता की, आता उन्हाळा जवळ आहे. [३१]त्याचप्रमाणं ह्या गोष्टी होत आहेत हे तुम्ही बघाल, तेव्हा हेही जाणा की, देवाचं राज्य जवळ आहे.

[३२]"मी तुम्हाला सत्य सांगतो, सर्व गोष्टी पूर्ण होईपर्यंत ही पिढी नाहीशी होणार नाही. [३३]आकाश आणि पृथ्वी नाहीशी होतील पण माझी वचनं नाहीशी होणार नाहीत.

[३४]"आणि स्वतःकडे लक्ष द्या; नाहीतर, कदाचित् पुष्कळ खाण्यामुळं, पुष्कळ पिण्यामुळं आणि ऐहिक जीवनाच्या काळज्यांमुळं तुमची मनं भारावून जातील आणि तो दिवस न कळत, तुमच्यावर पाशाप्रमाणं येईल. [३५]कारण, तो सर्व पृथ्वीच्या पृष्ठभागावर राहणाऱ्या सर्वांवर येणार आहे. [३६]पण तुम्ही ह्या होणार असलेल्या सर्व गोष्टींतून सुटायला आणि मनुष्याच्या पुत्रासमोर उभं रहायला समर्थ व्हावं म्हणून जागृत रहा. आणि प्रत्येक समयी प्रार्थना करा."

[३७]आणि तो प्रत्येक दिवशी मंदिरात शिकवीत असे व रात्री बाहेर जात असे, आणि ज्याला जैतुनांचा डोंगर म्हणतात त्या डोंगरावर वसतीस रहात असे. [३८]आणि सर्व लोक मंदिरात त्याचे ऐकायला त्याच्याकडे सकाळी पहाटेस येत.*

## २२

**आता, बेखमीर भाकरींचा सण** जवळ आला; त्याला वल्हांडण म्हणतात. [२]तेव्हा वरिष्ठ याजक व शास्त्री हे त्याला कसे ठार मारावे हे पहात होते; कारण ते लोकांना भीत होते.

[३]तेव्हा बारांच्या गटात ज्याला इस्कार्योत म्हणत त्या यहुदात सैतान शिरला; [४]तेव्हा तो गेला व त्याने वरिष्ठ याजकांबरोबर व सरदारांबरोबर त्याला त्यांच्या हाती कसे देता येईल ह्याविषयी बोलणे केले. [५]तेव्हा ते आनंदित झाले व त्यांनी त्याला पैसे द्यायचा करार केला; [६]आणि तो कबूल झाला व तो त्याला, गर्दी नसताना त्यांच्या हाती द्यायची संधी पाहू लागला.

[७]**मग बेखमीर भाकरींचा दिवस** आला तेव्हा वल्हांडणाचा बळी मारणे जरूर होते. [८]तेव्हा त्याने पेत्र व योहान ह्यांना पाठवले आणि म्हटले,

"तुम्ही जाऊन आपल्यासाठी, आपण भोजन करावं म्हणून वल्हांडणाची तयारी करा."

[९]आणि ते त्याला म्हणाले,

"आम्ही कुठं तयारी करावी अशी तुझी इच्छा आहे?"

---

*(योहान ७:५३ - ८:११ हा भाग मूळचा येथील असावा.)

[१०]आणि तो त्यांना म्हणाला,

"बघा, तुम्ही नगरात प्रवेश केला की, तुम्हाला तिथं
एक, पाण्याचा घडा घेतलेला मनुष्य भेटेल. तो जाईल त्या
घरात त्याच्या मागोमाग जा, [११]आणि त्या घरच्या
घरधन्याला म्हणा, 'गुरू आपल्याला विचारतात की, मला
माझ्या शिष्यांबरोबर वल्हांडणाचं भोजन करायला
उतरायची खोली कुठं आहे?' [१२]आणि तो तुम्हाला एक
मोठी, सजवलेली माडीवरची खोली दाखवील; तिथं
तयारी करा."

[१३]तेव्हा ते गेले आणि त्याने त्यांना सांगितले होते तसे
त्यांना आढळले. आणि त्यांनी वल्हांडणाची तयारी केली.

[१४]आणि घटका आली तेव्हा तो भोजनास बसला व
त्याच्याबरोबर प्रेषितही बसले. [१५]तेव्हा तो त्यांना
म्हणाला,

"मी उत्कंठेने इच्छीत होतो की, मी आता सोसायच्या
आधी तुमच्याबरोबर ह्या वल्हांडणाचं भोजन करावं;
[१६]कारण, मी तुम्हाला सांगतो, देवाच्या राज्यात हे पूर्ण
होईपर्यंत मी ह्याचं भोजन करणार नाही."

[१७]आणि त्याने प्याला घेतला आणि उपकार मानल्यावर
त्याने म्हटले,

"हा घ्या आणि आपल्यात वाटून घ्या. [१८]कारण, मी
तुम्हाला सांगतो, देवाचं राज्य येईपर्यंत मी ह्यापुढं, द्राक्षीचा
उपज पिणार नाही."

[१९]आणि त्याने भाकर घेतली आणि उपकार मानल्यावर
त्याने ती मोडली व त्यांना देऊन म्हटले,

"हे माझं शरीर आहे; हे तुमच्यासाठी दिलेलं आहे,
माझ्या स्मरणार्थ हे करा."

[२०]आणि भोजनानंतर त्याने त्याचप्रमाणे प्याला घेऊन
म्हटले,

"हा प्याला तुमच्यासाठी ओतलेला, माझ्या रक्तात
नवा करार आहे. [२१]पण बघा, मला धरून देणाऱ्याचा हात
माझ्याबरोबर मेजावर आहे. [२२]कारण मनुष्याचा पुत्र,
खरोखर, ठरल्याप्रमाणे जात आहे, पण ज्या मनुष्याकडून
तो धरून दिला जाईल त्याला हळहळ!"

[२३]तेव्हा हे करील असा त्यांच्यात कोण होता हे ते
एकमेकांना विचारू लागले.

[२४]आणि आपल्यातला कोण सर्वांत मोठा गणला
जाईल असाही त्यांच्यात एक वाद उद्भवला. [२५]तेव्हा तो
म्हणाला,

"परजनांचे राजे त्यांच्यावर धनीपण चालवतात,
आणि जे लोक त्यांच्यावर अधिकार चालवतात त्यांना
उपकारकर्ते म्हणतात. [२६]पण तुम्ही तसे नाही. तर
तुमच्यात जो सर्वांत मोठा आहे त्यानं धाकट्यासारखं
व्हावं; आणि नेता होणाऱ्यानं सेवा करणाऱ्यासारखं व्हावं.
[२७]आणि मोठा कोण? भोजनास बसणारा की सेवा
करणारा? भोजनास बसणारा ना? पण मी तुमच्यात सेवा
करणाऱ्यासारखा आहे.

[२८]"माझ्या परीक्षांत माझ्याबरोबर राहिलेले तुम्ही
आहात, [२९]आणि जसं मला पित्यानं राज्य नेमून दिलं आहे
तसंच मी तुम्हाला नेमून देत आहे, [३०]म्हणजे तुम्ही माझ्या
राज्यात माझ्या मेजावर खावं आणि प्यावं, आणि
राजासनांवर बसून इस्राएलाच्या बारा कुळांचा न्याय
करावा."

[३१]आणि प्रभू म्हणाला,

"शिमोना, शिमोना, बघ; तुम्हाला गव्हासारखं
चाळावं म्हणून सैतान मागत होता. [३२]पण तुझा विश्वास
लोपू नये म्हणून मी तुझ्यासाठी विनवणी केली आहे;
आणि तू वळल्यावर तुझ्या भावांना स्थिर कर."

[३३]तेव्हा तो त्याला म्हणाला,

"प्रभू, मी तुझ्याबरोबर तुरुंगात आणि मरणापर्यंतही
जायला तयार आहे."

[३४]आणि तो त्याला म्हणाला,

"पेत्रा, मी तुला सांगतो, तू मला ओळखतोस हे तू
तीनदा नाकारशील तोपर्यंत आज कोंबडा आरवणार
नाही."

[३५]आणि तो त्यांना म्हणाला,

"मी जेव्हा तुम्हाला पिशवी, झोळी आणि वहाणा न
घेता पाठवलं तेव्हा तुम्हाला काही कमी पडलं काय?"
आणि ते म्हणाले,

"काही नाही."

[३६]तेव्हा तो त्यांना म्हणाला,

"पण आता ज्याच्याजवळ पिशवी आहे त्यानं ती
घ्यावी, आणि तशीच झोळीही घ्यावी; आणि
ज्याच्याजवळ तरवार नाही त्यानं आपलं वस्त्र विकून एक
विकत घ्यावी. [३७]कारण मी तुम्हाला सांगतो, 'आणि तो
अपराध्यांत मोजला गेला', असं जे लिहिलं आहे, ते
माझ्यात पूर्ण व्हायला पाहिजे; कारण जे माझ्याविषयी
आहे त्याला शेवट आहे."

[३८]तेव्हा ते म्हणाले,

"प्रभू, बघा, इथं दोन तरवारी आहेत."

आणि तो त्यांना म्हणाला,

"पुरे."

[३९]**मग तो बाहेर आला,** आणि आपल्या परिपाठाप्रमाणे जैतुनांच्या डोंगराकडे निघाला; आणि
त्याचे शिष्य पण त्याच्या मागोमाग गेले. [४०]आणि, तो त्या
ठिकाणी आला तेव्हा त्यांना म्हणाला,

"तुम्ही परीक्षेत येऊ नये म्हणून प्रार्थना करा."

[४१]मग तो त्यांच्यापासून एक दगड फेकता येईल एवढ्यावर गेला, त्याने गुडघे टेकले आणि प्रार्थना करीत
[४२]म्हटले,

"बापा, तुझी इच्छा असेल तर माझ्यापुढून हा प्याला काढ; पण माझ्या इच्छेप्रमाणं नाही, तर तुझ्या इच्छेप्रमाणं होवो."

[४३]तेव्हा स्वर्गातील एक देवदूत त्याला प्रगट झाला; तो
त्याला शक्ती देत होता. [४४]आणि तो अशा क्लेशात होता
की, त्याने अधिक आग्रहाने प्रार्थना केली. आणि त्याचा घाम रक्ताच्या मोठ्या थेंबासारखा होऊन जमिनीवर पडत
होता. [४५]आणि त्याने प्रार्थना केल्यावर तो उठून आपल्या
शिष्यांकडे आला, तेव्हा त्याला ते दुःखामुळे निजलेले
आढळले; [४६]आणि तो त्यांना म्हणाला,

"झोपता काय? उठा, आणि तुम्ही परीक्षेत येऊ नये म्हणून प्रार्थना करा."

[४७]**आणि तो बोलत असताच,** बघा, एक जमाव, आणि यहुदा नावाचा बारातला एक जण त्यांच्यापुढे चालत होता; आणि तो येशूचे चुंबन घ्यायला
त्याच्याजवळ गेला. [४८]पण येशू त्याला म्हणाला,

"यहुदा, तू मनुष्याच्या पुत्राला चुंबन घेऊन धरून देतोस?"

[४९]आणि जे लोक त्याच्या सभोवती होते त्यांनी पुढे काय होईल ते बघून त्याला म्हटले,

"प्रभू, आम्ही तरवार चालवावी काय?"

[५०]आणि त्यांच्यातल्या एकाने श्रेष्ठ याजकाच्या दासावर
वार करून त्याचा उजवा कान कापून टाकला. [५१]तेव्हा
येशूने उत्तर देऊन म्हटले,

"एवढं होऊ द्या."

आणि त्याच्या कानाला हात लावून त्याने त्याला बरे केले.
[५२]तेव्हा त्याच्यापुढे जे वरिष्ठ याजक, मंदिराचे सरदार आणि वडील आले होते त्यांना येशू म्हणाला,

"तुम्ही जणू एखाद्या चोरावर तरवारी आणि काठ्या
घेऊन आलात काय? [५३]मी दररोज तुमच्याबरोबर मंदिरात
होतो तेव्हा तुम्ही माझ्यावर हात उचलले नाहीत; पण ही तुमची घटका आहे, आणि अंधाराची सत्ता आहे."

[५४]**मग त्यांनी त्याला धरले** आणि नेले, आणि श्रेष्ठ
याजकाच्या घरी आणले; आणि पेत्र दुरून मागोमाग गेला.
[५५]आणि त्यांनी अंगणात विस्तव पेटवल्यावर ते एकत्र
बसले तेव्हा पेत्र त्यांच्यात बसला. [५६]आणि तो उजेडात
बसला असता एका दासीने त्याला बघितले व त्याच्याकडे टक लावून म्हटले,

"हापण त्याच्याबरोबर होता."

[५७]पण त्याने त्याला नाकारून म्हटले,

"बाई, मी त्याला जाणत नाही."

[५८]आणि थोड्या वेळानंतर दुसऱ्या एकाने त्याला बघितले व म्हटले,

"तूपण त्यांच्यातला आहेस."

पण पेत्र म्हणाला,

"गड्या, मी नाही."

[५९]मग सुमारे एक तास निघून गेल्यावर दुसऱ्या एकाने भर देऊन म्हटले,

"हे खरं की, हापण त्याच्याबरोबर होता; कारण हापण गालिली आहे."

[६०]पण पेत्र म्हणाला,

"गड्या, तू काय म्हणतोस ते मी जाणत नाही."

आणि लगेच, तो बोलत असतानाच कोंबडा आरवला,
[६१]आणि प्रभू वळला व त्याने पेत्राकडे बघितले. तेव्हा, 'आज कोंबडा आरवायच्या आधी तू मला तीनदा नाकारशील' हे जे तो बोलला होता ते प्रभूचे वचन पेत्राला
आठवले. [६२]आणि तो बाहेर जाऊन दुःखाने रडला.

[६३]आणि ज्यांनी येशूला धरले होते ते लोक त्याला
चिडवीत व मारीत होते. [६४]त्यांनी त्याचे डोळे बांधले व त्याला प्रश्न करून म्हटले,

"तू भाकीत कर की, तुला मारणारा कोण आहे."

[६५]आणि त्याची निंदा करायला ते दुसऱ्या पुष्कळ गोष्टी त्याच्याविरुद्ध बोलले.

[६६]आणि दिवस उजाडताच लोकांचे वडील आणि वरिष्ठ याजक व शास्त्री हे एकत्र आले; आणि त्यांनी त्याला आपल्या न्यायसभेत नेऊन म्हटले,

[६७]"तू ख्रिस्त असलास तर आम्हाला सांग."
पण तो त्यांना म्हणाला,

"मी तुम्हाला सांगितलं तर तुम्ही विश्वास ठेवणार नाही; [६८]आणि मी विचारलं तर तुम्ही उत्तर देणार नाही. [६९]पण ह्यापुढं मनुष्याचा पुत्र देवाच्या सामर्थ्याच्या उजवीकडे बसेल."
[७०]आणि ते सगळे म्हणाले,

"मग तू देवाचा पुत्र आहेस काय?"
आणि तो त्यांना म्हणाला,

"मी आहे हे तुम्ही म्हणता."
[७१]आणि ते म्हणाले,

"आपल्याला आणखी साक्षीची काय गरज? कारण आपण स्वतः हे त्याच्या तोंडून ऐकलं आहे."

२३ तेव्हा त्यांचा सर्व जमाव उठला व त्यांनी त्याला पिलाताकडे आणले. [२]आणि ते त्याच्यावर आरोप करू लागले व म्हणाले,

"हा आम्हाला आमच्या राष्ट्राला फितवताना, कैसराला कर द्यायला मना करताना, आणि तो स्वतः ख्रिस्त राजा आहे असं सांगताना आढळला."
[३]तेव्हा पिलाताने त्याला प्रश्न करून म्हटले,

"तू यहुद्यांचा राजा आहेस काय?"
आणि त्याने त्याला उत्तर देऊन म्हटले,

"आपण म्हणता."
[४]तेव्हा पिलात वरिष्ठ याजकांना व लोकांना म्हणाला,

"मला ह्या मनुष्याकडे काही दोष आढळत नाही."
[५]तेव्हा ते ओरडून म्हणाले,

"हा गालिलापासून निघून, सर्व यहुदियातून, येथपर्यंत लोकांना शिकवून चिथवीत आहे."
[६]पण हे पिलाताने ऐकले तेव्हा त्याने प्रश्न केला की, हा मनुष्य गालिली आहे काय? [७]आणि तो हेरोदाच्या अधिकारातला आहे हे त्याला समजले तेव्हा त्याने त्याला हेरोदापुढे धाडले. तोही स्वतः त्या दिवसांत यरुशलेमात होता. [८]आणि हेरोदाने येशूला बघितले तेव्हा तो आनंदित झाला; कारण त्याने त्याच्याविषयी ऐकले असल्यामुळे तो त्याला बघण्याची दीर्घकाळ इच्छा करीत होता व त्याच्याकडून घडलेले काही चिन्ह बघण्याची आशा करीत होता. [९]आणि त्याने पुष्कळ शब्दांत त्याला प्रश्न केले, पण त्याने त्याला काही उत्तर दिले नाही. [१०]मग वरिष्ठ याजक व शास्त्री उभे राहिले व त्याच्यावर ईर्ष्येने आरोप करू लागले. [११]तेव्हा हेरोदाने आपल्या शिपायांबरोबर त्याचा उपहास करून त्याला चिडवले, आणि त्याला एक झगझगीत अंगरखा पेहरवून पुन्हा पिलाताकडे धाडले. [१२]आणि त्याच दिवशी, पिलात व हेरोद हे एकमेकांचे मित्र झाले; कारण त्यापूर्वी त्यांचे एकमेकांत वैर होते. [१३]मग पिलाताने वरिष्ठ याजकांना, आणि अधिकाऱ्यांना व लोकांना एकत्र बोलावले, [१४]आणि म्हटले,

"हा मनुष्य लोकांना फितवतो म्हणून तुम्ही ह्याला माझ्याकडे आणलंत; आणि बघा, तुम्ही ह्याच्यावर ज्या गोष्टींविषयी आरोप करीत आहात त्यांविषयी मी तुमच्यासमक्ष ह्याची चौकशी केली आणि मला ह्या मनुष्याकडे काही दोष आढळला नाही. [१५]हो नाही; तसाच हेरोदालाही नाही, कारण त्यानं त्याला आमच्याकडे परत धाडलं. आणि बघा, ह्यानं मरणाच्या शिक्षेस योग्य असं काहीच केलेलं नाही. [१६]म्हणून मी त्याला फटके मारतो आणि सोडतो."
[१७-१८]आणि ते सगळे एकदम ओरडून म्हणाले,

"त्याची वाट लावा, आणि आमच्यासाठी बरब्बाला सोडा."
([१९]ह्या माणसाला नगरात झालेल्या दंगलीकरता व खुनाकरता अटकेत ठेवले होते.) [२०]तरी पिलात पुन्हा त्यांच्याशी बोलला; कारण येशूला सोडायची त्याची इच्छा होती. [२१]पण ते ओरडून म्हणाले,

"वधस्तंभावर खिळा, त्याला वधस्तंभावर खिळा."
[२२]आणि तो तिसऱ्यांदा त्यांना म्हणाला,

"का? ह्यानं काय वाईट केलं आहे? मला ह्याच्याकडे मरणाच्या शिक्षेसाठी काहीही कारण आढळलं नाही; म्हणून मी त्याला फटके मारतो आणि सोडतो."
[२३]पण त्यांनी त्याला वधस्तंभावर खिळावे अशी निकड लावून मोठ्या आवाजात मागणी केली; आणि त्यांच्या आरोळ्यांनी यश मिळवले. [२४]आणि त्यांच्या मागण्याप्रमाणे व्हावे, असा पिलाताने निर्णय दिला. [२५]तेव्हा ज्याला दंगलीकरता व खुनाकरता अटकेत ठेवले होते व त्यांनी ज्याला मागितले होते त्याला त्याने

त्यांच्यासाठी सोडले; आणि येशूला त्यांच्या इच्छेवर सोपवून दिले.

[२६]**आणि ते त्याला नेत होते** तेव्हा शिमोन म्हणून एक कुरेनेकर मनुष्य शिवारातून येत असता त्यांनी त्याला धरले व येशूच्या मागोमाग त्याने वधस्तंभ न्यावा म्हणून तो त्याच्यावर लादला. [२७]तेव्हा, त्याच्या मागोमाग लोकांचा व त्याच्यासाठी ऊर बडवून आक्रोश करणाऱ्या स्त्रियांचा एक मोठा घोळका जात होता. [२८]पण येशू त्यांच्याकडे वळून म्हणाला,

"यरुशलेमच्या कन्यांनो, माझ्यासाठी रडू नका, पण तुम्ही आपल्यासाठी आणि आपल्या मुलांसाठी रडा. [२९]कारण बघा, असे दिवस येत आहेत की, तेव्हा ते म्हणतील, 'वांझ स्त्रिया, ज्यांनी भार वाहिला नाही ती उदरं, आणि पाजलं नाही ती स्तनं धन्य!' [३०]ते डोंगरांना म्हणू लागतील, 'आमच्यावर पडा' आणि टेकड्यांना म्हणू लागतील, 'आम्हाला झाका'. [३१]कारण, ओल्या झाडाला असं करतात तर वाळलेल्याचं काय होईल?"

[३२]आणि त्याच्याबरोबर मरणाची शिक्षा द्यायला आणखी दोन गुन्हेगारांना चालविले होते. [३३]ते कवटी म्हटलेल्या ठिकाणी आले, तेव्हा तेथे त्यांनी त्याला आणि त्या गुन्हेगारांना वधस्तंभावर खिळले - एकाला उजवीकडे व दुसऱ्याला डावीकडे. [३४]तेव्हा येशू म्हणाला,

"बापा, त्यांना क्षमा कर; कारण ते काय करतात हे ते जाणत नाहीत."

आणि, त्यांनी त्याचे कपडे वाटून घ्यायला चिठ्या टाकल्या. [३५]आणि लोक पहात उभे होते. आणि अधिकारीही त्याचा उपहास करून म्हणाले,

"ह्यानं दुसऱ्यांना वाचवलं; हा जर देवाचा ख्रिस्त, त्याचा निवडलेला असेल तर ह्यानं स्वतःला वाचवावं."

[३६]शिपाईदेखील त्याला चिडवीत त्याच्याकडे आले, त्यांनी त्याच्यापुढे आंब आणली [३७]आणि ते म्हणाले,

"आपण यहुद्यांचे राजे आहात तर स्वतःला वाचवा."

[३८]आणि 'हा यहुद्यांचा राजा आहे' असा वरचा लेखही त्याच्यावर होता.

[३९]आणि तेथे टांगलेल्या गुन्हेगारांतल्या एकाने त्याची निंदा करून म्हटले,

"तू ख्रिस्त आहेस ना? स्वतःला वाचव आणि आम्हाला वाचव."

[४०]पण दुसऱ्याने त्याला उत्तर देऊन म्हटले,

"तू त्याच शिक्षेखाली आहेस, आणि देवाला भीत नाहीस काय? [४१]आपण खरोखर न्यायानं आहोत, कारण आपण जे करीत होतो त्याचा मोबदला घेत आहोत, पण ह्यानं काही विपरीत केलं नाही."

[४२]आणि तो म्हणाला,

"येशू, तू आपल्या राज्यात येशील तेव्हा माझी आठवण कर."

[४३]आणि तो त्याला म्हणाला,

"मी तुला सत्य सांगतो, आज तू माझ्याबरोबर सुखलोकात असशील."

[४४]आता, सहाव्या तासाचा सुमार झाला तेव्हा सर्व देशावर अंधार पडला; तो नवव्या तासापर्यंत होता. [४५]कारण सूर्य लोपला होता. तेव्हा, पवित्र स्थानातला पडदा मधोमध फाटला, [४६]आणि येशू मोठ्या आवाजात ओरडून म्हणाला,

"बापा, मी तुझ्या हाती माझा आत्मा सोपवतो."

आणि असे म्हणून त्याने प्राण सोडला. [४७]आणि हे जे झाले ते बघून, शतपतीने देवाचे गौरव करून म्हटले,

"हा खरोखर नीतिमान मनुष्य होता."

[४८]आणि जे सर्व लोक ह्या दृश्यापाशी जमले होते त्यांनी ह्या गोष्टी झालेल्या पाहिल्या तेव्हा ते ऊर बडवीत परत गेले. [४९]त्याच्या ओळखीचे असलेले सर्व जण दूर उभे राहिले होते, आणि ज्या स्त्रिया गालिलातून त्याच्या मागोमाग आल्या होत्या, त्यांनी त्यांच्याबरोबर ह्या सर्व गोष्टी पाहिल्या.

[५०]**आणि बघा, योसेफ नावाचा** एक मनुष्य न्यायसभेचा सभासद होता; तो चांगला आणि नीतिमान मनुष्य होता. [५१]त्याने त्यांच्या विचारास व कृतीस आपली संमती दिली नव्हती. तो यहुद्यांच्या अरिमथाई नगरातला होता; आणि तोही स्वतः देवाच्या राज्याची प्रतीक्षा करीत होता. [५२]तो पिलाताकडे गेला व त्याने येशूचे शरीर मागितले. [५३]त्याने ते खाली काढले व ते तागाच्या वस्त्रांत गुंडाळले; आणि त्याने त्याला एका खडकात खोदलेल्या थडग्यात ठेवले. त्यात कोणाला त्याआधी ठेवलेले नव्हते. [५४]तो दिवस तयारीचा दिवस होता, आणि शब्बाथ सुरू होणार होता. [५५]तेव्हा ज्या स्त्रिया त्याच्याबरोबर गालिलातून आल्या होत्या त्याही त्याच्या मागोमाग गेल्या, आणि त्यांनी ते थडगे आणि त्याचे शरीर कसे ठेवले ते पाहिले. [५६]मग त्या परत गेल्या आणि त्यांनी

सुगंधी द्रव्ये व सुवासिक तेले तयार केली; आणि
आज्ञेप्रमाणे शब्बाथ दिवशी विसावा घेतला.

२४ मग आठवड्याच्या पहिल्या दिवशी,
सकाळी फार लवकर, त्यांनी आधीच तयार
केलेली, सुगंधी द्रव्ये त्यांनी घेतली आणि त्या थडग्याकडे
आल्या. २तेव्हा त्यांना थडग्यावरील शिळा लोटलेली
आढळली. ३आणि त्या आत गेल्या, तेव्हा त्यांना तेथे
येशूचे शरीर आढळले नाही. ४आणि असे झाले की, त्या
ह्या कारणांवरून भांबावल्या असता, बघा, त्यांच्याजवळ
चमकत्या वस्त्रांत दोन पुरुष उभे राहिले, ५आणि त्या
भयभीत झाल्या व त्यांनी जमिनीकडे तोंडे वळवली, तेव्हा
ते त्यांना म्हणाले,

"तुम्ही जो जिवंत आहे त्याला मेलेल्यांत का
शोधता? ६तो इथं नाही, पण उठला आहे. तो गालिलात
असताना तुम्हाला काय म्हणाला होता त्याची आठवण
करा. ७तो म्हणाला होता की, मनुष्याचा पुत्र पाप्यांच्या
हाती दिला जावा, त्याला वधस्तंभावर खिळण्यात यावं,
आणि तिसऱ्या दिवशी त्यानं पुन्हा उठावं ह्याचं अगत्य
आहे."
८आणि त्यांना त्याचे शब्द आठवले. ९तेव्हा त्या
थडग्याकडून परत गेल्या, आणि त्यांनी अकरा जणांना व
इतर सर्वांना ह्या सर्व गोष्टी सांगितल्या. १०त्या मग्दाली
मरिया, आणि योहान्ना व याकोबाची आई मरिया ह्या
होत्या, आणि त्यांनी व त्यांच्याबरोबर ज्या दुसऱ्या होत्या
त्यांनीही ह्या गोष्टी प्रेषितांना सांगितल्या. ११पण त्यांना
त्यांच्या गोष्टी निरर्थक बोलण्याप्रमाणे वाटल्या व त्यांनी
त्यांवर विश्वास ठेवला नाही.

१२-१३**आणि बघा, त्याच दिवशी,** त्यांच्यातले
दोघे जण यरुशलेमपासून साडे सात मैल दूर असलेल्या
अम्माऊस नावाच्या खेड्याकडे जात होते १४व ते ह्या
घडलेल्या सर्व गोष्टींविषयी एकमेकांशी बोलत होते.
१५आणि असे झाले की, ते एकमेकांशी बोलत आणि
वादविवाद करीत असता येशू स्वतः जवळ आला आणि
त्यांच्याबरोबर जाऊ लागला. १६पण त्यांनी त्याला
ओळखू नये म्हणून त्यांचे डोळे झाकलेले होते. १७आणि
तो त्यांना म्हणाला,

"तुम्ही चालताना एकमेकांशी बोलत आहा त्या काय
गोष्टी आहेत?"
तेव्हा ते थांबले आणि म्लानमुख झाले, १८आणि क्लयपा
नाव असलेल्या त्यांच्यातल्या एकाने उत्तर देऊन त्याला
म्हटले,

"तुम्ही यरुशलेमात एकटे प्रवासी म्हणून राहता
काय? आणि ह्या दिवसांत इथं घडलेल्या गोष्टी तुम्हाला
कळल्या नाहीत?"
१९तेव्हा तो त्यांना म्हणाला,

"कोणत्या गोष्टी?"
आणि ते त्याला म्हणाले,

"नासरेथकर येशूविषयी! तो देवापुढं आणि सर्व
लोकांपुढं, कृतीनं आणि उक्तीनं, एक पराक्रमी संदेष्टा
झाला. २०आणि वरिष्ठ याजकांनी आणि आमच्या
अधिकाऱ्यांनी त्याला मरणाच्या शिक्षेसाठी धरून दिलं
आणि वधस्तंभावर खिळलं. २१पण आम्ही आशा केली
होती की, इस्राएलाची सुटका करील असा हा होता. आणि
तरी, ह्या सर्व गोष्टींशिवाय, ह्या गोष्टी झाल्यास आज
तिसरा दिवस आहे. २२शिवाय आमच्यातल्या कित्येक
स्त्रियांनी आम्हाला चकित केलं; त्या पहाटेस थडग्याकडे
आल्या होत्या. २३आणि त्यांना त्याचं शरीर सापडलं
नाही, तेव्हा त्या आल्या आणि त्यांनी सांगितलं की,
त्यांना देवदूतांचं दर्शन घडलं, आणि ते त्यांना म्हणाले, तो
जिवंत आहे. २४तेव्हा जे लोक आमच्याबरोबर होते
त्यांच्यातले कित्येक जण थडग्याकडे गेले आणि त्यांना
त्या स्त्रियांनी सांगितल्याप्रमाणं आढळलं; पण त्यांनी
त्याला बघितलं नाही."
२५तेव्हा तो त्यांना म्हणाला,

"अहो अज्ञानी! आणि संदेष्ट्यांनी सांगितलेल्या, सर्व
गोष्टींवर विश्वास ठेवायला मनाचे मंद असलेले तुम्ही!
२६ख्रिस्तानं ह्या गोष्टी सोसाव्यात आणि आपल्या गौरवात
जावं ह्याचं अगत्य नव्हतं काय?"
२७मग त्याने मोशे व सर्व संदेष्टे ह्यांच्यापासून सुरुवात
करून त्यांना सर्व शास्त्रलेखांतील स्वतःविषयी असलेल्या
गोष्टी विशद केल्या.

२८मग ते जिकडे जात होते त्या खेड्याजवळ आले,
तेव्हा तो पुढे जाणार असावा असा वागला. २९तेव्हा ते
त्याला थांबवून म्हणाले,

"आमच्याबरोबर रहा, कारण संध्याकाळ होत आहे
आणि दिवस पार सरला आहे."

आणि तो त्यांच्याबरोबर रहायला आत गेला. ३०आणि
असे झाले की, तो त्यांच्याबरोबर भोजनास बसला
असता, त्याने भाकर घेतली आणि आशीर्वाद मागून
मोडली आणि त्यांना दिली. ३१तेव्हा त्यांचे डोळे उघडले
आणि त्यांनी त्याला ओळखले; आणि तो त्यांच्या
दृष्टीपुढून नाहीसा झाला. ३२तेव्हा ते आपआपल्यात
म्हणाले,

"तो वाटेत आपल्याशी बोलत असता, आणि आपल्याला शास्त्रलेखांचा उलगडा करीत असता आपल्यात आपलं अंतःकरण पेटलं नव्हतं काय?"

३३आणि ते त्याच घटकेस उठले व यरुशलेमला परत
आले, आणि त्यांना अकरा जण व त्यांच्याबरोबर राहणारे
एकत्र जमलेले आढळले. ३४आणि ते म्हणत होते,

"प्रभू खरोखर उठला आहे आणि शिमोनाला दिसला आहे."

३५तेव्हा वाटेवर काय झाले आणि त्यांनी त्याला भाकर
मोडताना कसे ओळखले हे त्यांनी सांगितले.

३६**आणि ते ह्या गोष्टी बोलत** असता तो स्वतः
त्यांच्यात उभा राहिला. ३७पण ते घाबरले आणि भयभीत
झाले आणि त्यांना वाटले आपण भूत पाहिले. ३८तेव्हा तो
त्यांना म्हणाला,

"तुम्ही अस्वस्थ का झालात? आणि तुमच्या मनात
का विचार येत आहेत? ३९तुम्ही माझे हातपाय पहा की,
मी स्वतः आहे; मला चाचपा आणि पहा! कारण तुम्ही
पहात आहा की, मला मास आणि हाडं आहेत तशी
भुतांना नसतात! ४०-४१आणि तरीही त्यांनी आनंदामुळे
विश्वास न ठेवता आश्चर्य केले; तेव्हा तो त्यांना
म्हणाला,

"तुमच्याजवळ काही खायला आहे का?"

४२आणि त्यांनी त्याला एक भाजलेल्या माशाचा तुकडा
दिला. ४३आणि त्याने तो घेऊन त्यांच्यासमोर खाल्ला.

४४**आणि तो त्यांना म्हणाला,**

"मी तुमच्याबरोबर असताना तुमच्याशी बोललो, ती माझी वचनं ही आहेत की, मोशेच्या नियमशास्त्रात, संदेष्ट्यांत आणि स्तोत्रांत, माझ्याविषयी ज्या गोष्टी लिहिल्या आहेत त्या सर्व पूर्ण झाल्या पाहिजेत."

४५मग त्यांना शास्त्रलेख समजावेत म्हणून त्याने त्यांचे मन
उघडले. ४६आणि तो त्यांना म्हणाला,

"हे असं लिहिलं आहे की, ख्रिस्तानं सोसावं, आणि
तिसऱ्या दिवशी मेलेल्यांतून पुन्हा उठावं; ४७आणि
यरुशलेमपासून प्रारंभ करून सर्व राष्ट्रांत त्याच्या नावानं
पश्चात्ताप आणि पापांची क्षमा ही गाजविण्यात यावीत.
४८आणि ह्या गोष्टींचे तुम्ही साक्षी आहा. ४९आणि बघा, मी
तुमच्यावर माझ्या पित्याचं वचन पाठवतो, पण तुम्ही
वरील सामर्थ्यानं पेहरवले जाल तोपर्यंत ह्या नगरात रहा."

५०मग त्याने त्यांना बेथानीपर्यंत बाहेर नेले आणि
आपले हात उभारून त्यांना आशीर्वाद दिला. ५१आणि
असे झाले की, तो त्यांना आशीर्वाद देत असता
त्यांच्यापासून वेगळा झाला. ५२आणि ते मोठ्या आनंदाने
यरुशलेमला परत आले. ५३आणि ते सतत मंदिरात देवाचा
धन्यवाद गात असत.